म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. २७९५
१५६२

# एका क्रांतीच्या प्रकाश रेखा

नारायण देसाई

REFBK-0018445

S.A.DESAI

૧૮૦૪૫
૭૯૨૭૬ / ૧૨।૧।૮૨
निबंध / ૨૧૯ ૬

संग्रहालय ठाणे
१८८४५
REFBK-0018445

# समाजक्रांतीच्या प्रकाशरेखा

# समाजक्रांतीच्या प्रकाशरेखा

लेखक

**नारायण देसाई**

**लोकशिक्षण प्रकाशन**

मडगाव–गोवा

प्रकाशक :

**प्रभाकर घोडगे**

लोकशिक्षण प्रकाशन

२३० फातोर्डा

मडगाव–गोवा

●

C. R. सौ. कुमुदिनी देसाई

●

मे १९७२

●

मुद्रक :

सदाशिव हुंद्रे

रवि मुद्रणालय

कडोलकर गल्ली,

बेळगांव.

●

प्रमुख विक्रेते :

वामन विष्णु भट

५३, गुरु नानक मार्केट

डॉ. आंबेडकर रोड,

मुंबई १४

★ किंमत पाच रुपये

¤ प्रस्तावना ....

¤ दत्ता बाळांचा अतिव्यक्तिवाद .... १

¤ चमत्कारवाद्यांचा गोंधळ .... १९

¤ पतीतांचीच अतीताकडे धांव .... २९

¤ ईशावास्योपनिषदाचा अर्थ :
खरा आणि खोटा .... ३८

¤ सिद्धार्थाचा बुद्धिवाद आणि नीतीवाद .... ४८

¤ जैनमताचा उद्‌बोधक अभ्यास .... ५७

¤ गुरु नानकांची शिकवणूक आणि
नवभारताचा राष्ट्रधर्म .... ६६

¤ युगधुरंधर कार्ल मार्क्स .... ७४

¤ लोकयुगाचे आरंभकर्ते
लोकमान्य टिळक .... ८१

¤ मॅक्झीम गॉर्की .... ९१

¤ गांधी–लेनिन .... ९६

¤ लेनिन : सजीव, सर्वव्यापी .... १०२

¤ स्त्री–पुरुषसंबंध आणि समाजविकास .... ११०

¤ भारत राष्ट्राचे वैरी .... ११८

¤ कशासाठी ? धार्मिक खुळेपणा
कशासाठी ? .... १२४

# प्रस्तावना

माणसांचें सुख हेंच पूर्वी आणि आजही साऱ्या मानवी प्रयत्नाचें उद्दिष्ट मानलें जातें व सुख लाभण्यासाठीं माणसांनी माणुसकीचें किंवा विवेकी वर्तन केलें पाहिजे असेंच आज सर्वसाधारणपणे समजण्यात येतें. या दृष्टीने माणसांचें वर्तन सुधरावें म्हणून तयार करण्यात आलेल्या अनेक प्रकारच्या सुधारणावादी शिकवणुका पूर्वापार चालत आलेल्या आहेत. तसेच आधुनिक काळात नवीन सुद्धा तयार झालेल्या आहेत. यांपैकी बऱ्याचशा शिकवणुका ईश्वरनिष्ठ किंवा धार्मिक स्वरुपाच्या आहेत तर कांही विवेकनिष्ठ किंवा वैज्ञानिक स्वरुपाच्या आहेत. ह्या सर्व शिकवणुकांमध्ये विश्व, व्यक्ती, ईश्वर यांचाच प्रामुख्याने विचार केलेला असतो किंवा व्यक्ती, विवेक, विज्ञान यांचा तरी विचार केलेला असतो.

परंतु, मनुष्यांच्या वर्तनातील माणुसकी, विवेक ह्या गोष्टी निसर्ग, मनुष्यांचीं अंत:करणे, विवेकबुद्धी यांवर जेवढ्या अवलंबून आहेत त्यापेक्षां कितीतरी अधिक प्रमाणात त्या समाजावर अवलंबून आहेत. व्यावहारिक जीवनात घडोघडी या सामाजिक सत्याची प्रचिती येत असते. तथापि, व्यक्तिवादी–सुधारणावादी शिकवणुकांमध्ये सामाजिक सत्याचा मागमूसही आढळत नाही.

मनुष्यजीवनाशीं संबधित असलेल्या सर्व अस्तित्वांपैकीं एक प्रकारचें सातत्य, सर्वसमावेशकत्व आणि अमृतत्व जर कोणत्या एका अस्तित्वाला असेल तर तें समाजाच्या अस्ति-

त्वालाच होय. परंतु, मनुष्यांच्या जीवनावर परिणाम करणारा समाज किंवा मनुष्यांची जीवने घडवणारा समाज म्हणजे प्रामुख्याने त्या त्या कालांतील विशिष्ट समाजरचना हें मात्र ध्यानात ठेवणे आवश्यक आहे.

इतिहासकालांतील कोणत्याही कालखंडाविषयी बोलावयाचें झाल्यास त्या त्या काळांतील मनुष्यांना विशिष्ट समाजरचनेचे घटक म्हणूनच वावरावें लागलें हें स्पष्ट आहे. तसेंच, त्या त्या काळांतील छोटे मोठे संघर्ष त्या त्या समाजरचनेच्या पोटांतलेच होते हेंही स्पष्ट आहे. समाजरचनेच्या पोटांत संघर्ष निर्माण झाल्याशिवाय विचारवंतांच्या किंवा महापुरुषांच्या डोक्यांत ते संघर्ष येणे शक्य नसतें.

महान विचारवंत आणि महापुरुष हे त्या त्या समाजरचनेचे अपत्यच असतात. त्यांपैकीं कांहींना वर्गीय किंवा अन्य कारणांमुळें संघर्षाची पुरोगामी दिशा दिसलेली असते, रुचलेली असते व कांहींनी प्राणपणानें ती पुढे नेलेली असते, तर कांहींनी संघर्षाची प्रतिगामी बाजूच उचलून धरलेली असते.

आपण जेव्हां गतेतिहासाकडे वळून पहातो व कांही विचारवंत आणि महापुरुष काळाच्या पुढें होते व कांही मागे होते असें म्हणतों तेव्हां त्याचा अर्थ एवढाच होतो, की विशिष्ट समाजरचनेच्या पोटीं निर्माण झालेल्या संघर्षातील पुरोगामी बाजू ज्यानी घेतली ते काळाच्या पुढे होते व ज्यांनी प्रतिगामी बाजूचाच पाठपुरावा केला ते काळाच्या मागे होते.

मनुष्यांचीं सुखदुःखें त्या त्या काळांतील समाजरचनेनुसार ठरलीं जातात. ज्याला आपण माणुसकी, विवेकबुद्धी, अंतःकरणाचा धर्म म्हणं, त्या गोष्टी सुद्धा विशिष्ट समाजरचनेप्रमाणेच ठरत असतात. मनुष्यांच्या अंतःकरणात्मक भावांचे तसेंच त्यांच्या बौद्धिक निर्णयांचें सनातनत्व किंवा सर्वकालीनत्व

असें कांहीही अस्तित्वांत नाहीं. कारण समग्र जीवनमूल्यें समाजजन्य, कालजन्यच आहेत.

बुद्धिविकासाच्या इतिहासांतील एवढया दिग्गज प्रश्नेचा तत्ववेत्ता ॲरिस्टॉटल. परंतु गुलामगिरीशिवाय समाजविकास अशक्य आहे असेंच त्याची विवेकबुद्धी सांगे.

तीच गोष्ट भारतीय अर्थशास्त्राच्या जनकाची– कौटिल्याची. कौटिल्य संपूर्णपणे इहलोकवादी, वास्तववादी, विवेकवादी होता. तो आपल्या अर्थशास्त्रामध्यें शुक्र व बृहस्पती या लोकायत तत्वज्ञानाच्या आचार्यांना अभिवादन करतो आणि आन्वीक्षिकी ( योग, सांख्य, लोकायत ) या बुद्धिनिष्ठ विद्येला प्राधान्य देतो. परंतु, आधुनिक काळांतील न्यायव्यवस्थेंत सर्वमान्य झालेलें 'कायद्याचें राज्य' म्हणजे सर्वांना समान कायदा, समान अपराधाबद्दल समान शिक्षा हें तत्व त्याची विवेकबुद्धी मानीत नाहीं. कौटिल्याच्या अर्थशास्त्राची प्रशंसा करताना त्याने जन्मश्रेष्ठत्व मानलें होतें, त्याचा न्याय धर्मावर व धर्म चातुर्वर्ण्यावर अवलंबून होता हें विसरतां नयें.

मनूची विवेकबुद्धी तर ब्राह्मणांना त्यांनी केलेल्या कोणत्याही घोर गुन्ह्याबद्दल देहदंड वर्ज्य मानी. कौटिल्य मनूच्या आधीचा व मनूच्या मानाने सौम्य होता. प्रायः मनुष्यांची विवेकबुद्धी कालाने हळूहळू सुधरत जाते असें समजण्यात येतें. पण सत्ताधारी आणि संपत्तीवान वर्गाची विवेकबुद्धी भारतांतच काय पण जगांत कुठेही केवळ कालांतराने हळूहळू सुधारल्याचें उदाहरण नाही. भारतामध्यें तर सत्ता–संपत्तीवाल्या वर्गाची विवेकबुद्धी कौटिल्यानंतर अधिकच बिघडलेली दिसते. इतिहासामधील वरवर विपरीत वाटणाऱ्या या सामाजिक घटनांचा अर्थ वर्गीय संघर्ष आणि क्रांति-प्रतिक्रांतीचा संदर्भ याविना लागत नाही.

जर्मन महाकवी गटे महान जीवनद्रष्टा ! तो कवींचा मुकुटमणी आणि शास्त्रवेत्ता सुद्धा ! पण सरंजामदारांच्या रक्तांत कांही विशेष गुण असावेत असें त्यालाही वाटे.

ॲरिस्टॉटल गुलामगिरीवर अधिष्ठित अशा ग्रीक नगरराज्यांशीं संबंधित होता. त्यामुळे 'पाळीव जनावरें गोठयांत राहिलीं तर त्यांचें बरें चालतें त्याप्रमाणे गुलामाचेंही स्वामीच्या आज्ञेत राहिल्याने कल्याणच होतें' असें तो म्हणतो. गुलाम ह्या 'जिवंत अवजारा' विना ग्रीक कुटुंबव्यवस्था चालणार कशी ? महान ग्रीक संस्कृती टिकणार कशी ? ग्रीक धनवानांना 'मी जनतेचा शत्रू होईन आणि त्यांना सतत अपाय करीत राहीन' अशी मुळीं शपथच घ्यावी लागत असे. स्पार्टा या ग्रीक नगरराज्यांत 'हेलॉटांना' ('शेतकऱ्यांना') वर्षांतून एकदा ठरलेल्या दिवशीं ठार मारुन त्यांची संख्या कमी करण्यात येई. अर्वाचीन युरोपांतील धनवानांना स्पार्टाचें आकर्षण अजूनही वाटतें. हिटलरने तर स्पार्टाची विचारसरणी शिरोधार्य मानली होती. बोला, केवळ माणुसकी व विवेकबुद्धी ह्याविषयी आतां तुम्हाला काय वाटतें ?

आपले कौटिल्य आणि मनुसुद्धा दासपद्धतीवर आधारलेल्या शासनाशीं निगडित होते. ध्वजाहृत, आत्मविक्रयिन्, उदरदास अथवा गर्भदास, आहितिक आदि निरनिराळ्या प्रकारच्या गुलामांचा कौटिल्यानें उल्लेख केलेला आहे. कोणत्याही काळांतला किंवा संस्कृतींतला केवळ कल्पनावाद पाहून त्या कालाबाबत किंवा संस्कृतीबाबत निर्णय करावयाचा नसतो. त्याचप्रमाणे कोणत्याही संस्कृतीचें मूल्यमापन त्या संस्कृतीमध्यें व्यक्त झालेल्या भावना विचारांवरुनही करतां नये. संस्कृतीच्या मूल्यमापनाची शास्त्रशुद्ध पद्धतीच वापरणे आवश्यक आहे.

गटे एका संस्थानिकाकडे नोकरीला होता. त्याचा प्रतिगामीत्वाशी असलेला बेंबीचा संबंध पूर्णतया तुटलेला नव्हता. तथापी, असामान्य प्रतिभेच्या या कवीला तत्कालीन संघर्षातील पुरोगामित्वाचें दर्शन मात्र घडलें होतें. त्याच्या ' फाउस्ट ' या विख्यात नाटचकाव्यातील डॉ. फाउस्टच्या आकांक्षेला सीमनसते. तो बंधारे घालतो, सागर हटवून नवी भूमी निर्माण करतो आणि व्यापाराबरोबर लुटमारीतही सांपडतो. नव्या भांडवली युगाच्या महत्वाकांक्षेचा आणि भांडवली समाजारचनेतील अंतर्विरोधांचा तो प्रतिनिधी असतो. त्याचा परमेश्वर सांगतो ' राहिलें पाहिजे मानवाने प्रयत्नशील आणि प्रयत्न करतांना पाहिजे चुकलेंही ' आणि तो म्हणतो 'रचणार रास माझ्या छातीवर माणसांच्या दुःखाची आणि बेहोषीची '

माणुसकी, विवेक हीं श्रेष्ठ तत्वे आहेत याविषयी वाद असू शकत नाही. परंतु तीं सनातन, स्वयंभ् नसून त्या तत्वांचा व्यवहार निर्णित करणारें समाजजीवनातील सर्वोपरी तत्व म्हणजे समाजक्रांतीचें–युगपरिवर्तनाचे तत्व.

युगाबरोबर सर्व बदलतें. पण युग कसें बदलतें ? काळ कसा बदलतो ? कालपरिवर्तनाचें कारक काय ? अवनीतलावर अधूनमधून अवतीर्ण होणारे महापुरुष का काळाला बदलतात ? की बदलता काळ नवसर्जनाच्या शक्ति अंगी असलेल्या महापुरुषांना जन्म देतो ?

समाज ही एक सामाजिक–आर्थिक रचना आहे. आर्थिक चौकट हा प्रत्येक समाजाचा पाया. या पायावर समाज–जीवनाचा इमला उभा असतो, शासन, कायदे, धर्मसंस्था, तत्वज्ञान, नैतिक कल्पना, कला, सामाजिक विचार आदि म्हणजे हा इमला होय. समाजाच्या आर्थिक चौकटींतील उत्पादन–साधनें, उत्पादन–संबंध आणि मालकी हक्कांचे प्रभावी

स्वरूप यावरुन समाजातील सामाजिक विभागणी, वर्गीय रचना ठरते. आणि वर्गीय रचनेवरून राजकीय संघटना व कायद्याची स्थिती यांचे स्वरूप ठरतें.

प्रयेक लोकसमूहाचा इतिहास अंतिम रीत्या समान अंतर्गत नियमांनी बदलत असलेल्या उत्पादन-शक्तींच्या प्रगतीवर अवलंबून असतो. निश्चित नियमानुसार एकामागोमाग एका सामाजिक-आर्थिक रचनेची जागा दुसऱ्या सामाजिक-आर्थिक रचनेने घेणे याच पद्धतीने समाजाची प्रगती होत असते. तसेंच, जास्त प्रगत सामाजिक-आर्थिक रचनेच्या अवस्थेंत पदार्पण केलेला देश इतर देशांना त्यांच्या भविष्यकालाचें दर्शन घडवित असतो. एक सामाजिक-आर्थिक रचना बदलून त्याची जागा दुसऱ्या सामाजिक-आर्थिक रचनेने घेणे म्हणजेच समाजक्रांती किंवा युगपरिवर्तन होय.

सामाजिक-आर्थिक रचनेच्या आणि वर्गीय संघर्षाच्या सिद्धांतामुळे मानवी इतिहासातील गूढत्वाचें धुके नाहीसें झालें. तसेच, ज्यांना हेतुहीन जीवन जगायचें नाहीं, ज्यांना परिस्थितीचे दास न होतां जगात ज्या घटना घडत आहेत त्या घडविण्यात आपण जागृतपणे, क्रियाशीलपणे भाग घ्यावा असे वाटतें त्यांना इतिहासाचें मैदान मोकळे झालें.

आजवर बहुतेक इतिहास-मीमांसकांनी राजपुरुषांच्या शौर्याला इतिहासाचें कर्तृत्व बहाल केलें आहे. हे लोक वीर सावरकरांप्रमाणे नेहमी शस्त्रपाठ म्हणत पराक्रमी नायकांच्या शोधात असतात. श्रमवीर जनता त्यांना कधीं दिसतच नाही. राजपुरुषांनी केलेले राजसूय यज्ञ ! काय अलौकिक ! अश्वमेध यज्ञ ! वा ! राष्ट्रीय पौरुषाचा गगनचुंबीं कळस ! पण बहुजन समाजाकडून होणारा दैनंदिन श्रमयज्ञ ? छे ! त्यात काय अलौकिक ? त्याने कधी इतिहासाचा केसही हालला नाही.

ह्या लोकांना समाजाच्या, देशाच्या आर्थिक परिस्थितीच्या विश्लेषणाशीं कर्तव्य नसतें. त्यांचा इतिहास म्हणजे वीरश्रीची लाट. त्यांचा शिकंदर वीरश्रीचा सागर. त्यांचा चंद्रगुप्त सवाई शिकंदर, कारण तो वीरश्रीचा परमावधी ! ह्या अकाटय आकलनाच्या इतिहासज्ञांना झारच्या राजवटीत रशियन वीरश्रीची लाट कां उसळली नाही आणि प्रथम जपानकडून व नंतर जर्मनीकडून रशियाला पराभव कां पत्करावा लागला तें विचारूं नका. स्तालिनग्रादच्या रणसंग्रामात रशियन क्षात्रतेज कां चमकलें तें विचारूं नका. तसेंच, तथाकथित सर्वश्रेष्ठ जर्मनवंशाच्या क्षात्रतेजाची लाट बर्लिनच्या संरक्षणाला सुद्धा का पुरली नाही तेंही त्याना विचारूं नका.

पृथ्वीवरील सर्व मानव परस्परांशी निगडित असल्यामुळें मानवांच्या मनाची, अंतःकरणाची विभागणी करतां येत नाही. कारण मानवता सलग आहे. त्याचप्रमाणे भूत–वर्तमान–भविष्याचीही विभागणी करता येत नाही. कारण कालाचीही सलगता पक्की आहे. एका कालातून दुसऱ्या कालाची उत्पत्ती. परंतु त्या त्या कालाची भर स्वीकारुन व धूप अव्हेरून.

निसर्गांत, समाजजीवनात आणि मानवी विचारांत विकासाच्या मार्गक्रमणाने वस्तूंतील परस्परविरोधी अंगें वा प्रवृत्त्या आपोआपच दृश्यमान होतात. आणि विरोधांचा असा एक संघर्ष सुरु होतो की ज्याचा शेवट जुन्या प्रकारांच्या किंवा स्वरुपांच्या अस्तांत आणि नव्या प्रकारांच्या उदयांत होतो.

समाजजीवनात नव्यासाठी झगडणाऱ्या शक्ती आणि जुन्याचें संरक्षण करणाऱ्या शक्ती यामध्यें जो अंतर्विरोध आहे तो सामाजिक अंतर्विरोधांपैकी प्रमुख अंतर्विरोध असून समाजक्रांतीच्या कालांत तो तीव्र होतो. समाजक्रांतीच्या संदर्भातच जुन्यानव्याचा प्रश्न उद्‌भवतो.

जुन्यातून नवें म्हणून तें सलग आहे. पण जुन्याला विरोध करुन नव्याची निर्मिती म्हणून तें अलग आहे. परंतु या परस्परविरोधी संबंधांना जोडणारा विकासाचा नवा संबंध फक्त शास्त्रशुद्ध साम्यवादी क्रांतीच प्रस्थापित करूं शकते.

हीच गोष्ट समाजक्रांतीच्या साध्याची, साधनांची आणि सिद्धींची. केवळ साध्य घेऊन साधनांचा विचार पुरा होत नाही. आपल्या परिचयाचा जुना साध्य–साधन विचार हा अपुरा विचार आहे. साध्य-साधनावरोबर सिद्धींचा विचारही करावा [illegible]तो. शास्त्रशुद्ध साम्यवादी क्रांतीच्या संदर्भात साध्य–साधन-[illegible]द्धींची एक नवी एकतानता किंवा साध्य–साधन–सिद्धी[illegible] त्रयीचें एक नवे ऐक्य प्रस्थापित होते.

तीच गोष्ट उत्क्रांति–क्रांतीची. शास्त्रशुद्ध साम्यवादी क्रांतीच्या प्रक्रियेमध्यें उत्क्रांति–क्रांतीचाही एक नवा मेळ साधला जातो. राष्ट्रीय–बहुराष्ट्रीय–आंतरराष्ट्रीय अंतर्विरोधांच्या बाबतींतही साम्यवादी समाजक्रांतीनंतर या वेगवेगळ्या अस्तित्वांमध्यें एक नवें सुसंवादित्व प्रस्थापित होतें.

'राष्ट्रीय' म्हणजे काहीं तरी स्वयंभू, स्वयंपूर्ण, स्वयंमेव, अद्वितीय,अपरिवर्तनीय असें मुळींच नव्हे.प्रत्येक अस्तित्वाप्रमाणे 'राष्ट्रीय' अस्तित्वही परिवर्तनशील, विकसनशील असून इतर राष्ट्रांच्यां सहवासाने, सहकार्याने 'राष्ट्रीय' अस्तित्व एक नवरुप, नवआशय, धारण करीत असतें. भक्कम 'राष्ट्रीय' ऐक्य साधत असताना भक्क[illegible] आंतरराष्ट्रीय ऐक्यही साधत जाते. अशा प्रकारचें राष्ट्र[illegible]–आंतरराष्ट्रीय नवऐक्य हीच अभूतपूर्व समाजविकासाची [illegible] ठरते.

संपूर्ण मानवी इतिहासांत फक्त लेनिनच्या आचार-विचारांनीच वर उल्लेखिलेल्या परस्पर विरोधांची ऐक्यें निर्माण केली व मानवजातीसमोर आज विश्वशांती-सौख्य-समृ-

द्धीचीं नवीं क्षितिजें दिसूं लागलीं आहेत. म्हणून आम्हाला लेनिन हा आमच्या काळांतील समाजक्रांतीचा प्रकाशपुंज वाटतो. त्याच्या आचारविचारांच्या प्रकाशात आम्ही लिहिल्या त्या केवळ 'प्रकाशरेखा'!

जगताकडे पहाण्याचा शास्त्रशुद्ध दृष्टिकोन प्रस्थापीत करण्यासाठी दत्ताबाळांचा कल्पनाविलास खोडून काढणे आवश्यकच होते. त्याचबरोबर क्रांतिकारक नवीन ऐक्यांच्या आकलनाचा प्रयत्नही या 'प्रकाशरेखांत' आम्ही केलेला आहे. याबाबतच्या आकलन-साकल्यांत जें मागे पुढें झालें असेल, आगळें उणे राहिलें असेल त्याबद्दल सर्वस्वी दोषी आम्हीच आहोंत. 'सत्य असत्याशी मन ग्वाही' करुन प्रसंगानुरुप या 'प्रकाशरेखा' लिहिल्या गेल्या एवढेंच आम्ही सांगू इच्छितों.

पणजी, गोवा. नारायण देसाई
१-५-७२

जुन्यातून नवें म्हणून तें सलग आहे. पण जुन्याला विरोध करुन नव्याची निर्मिती म्हणून तें अलग आहे. परंतु या परस्परविरोधी संबंधांना जोडणारा विकासाचा नवा संबंध फक्त शास्त्रशुद्ध साम्यवादी क्रांतीच प्रस्थापित करूं शकते.

हीच गोष्ट समाजक्रांतीच्या साध्याची, साधनांची आणि सिद्धींची. केवळ साध्य घेऊन साधनांचा विचार पुरा होत नाही. आपल्या परिचयाचा जुना साध्य-साधन विचार हा अपुरा विचार आहे. साध्य-साधनाबरोबर सिद्धींचा विचारही करावा लागतो. शास्त्रशुद्ध साम्यवादी क्रांतीच्या संदर्भात साध्य-साधन-सिद्धींची एक नवी एकतानता किंवा साध्य-साधन-सिद्धीच्या त्रयीचें एक नवे ऐक्य प्रस्थापित होते.

तीच गोष्ट उत्क्रांति-क्रांतीची. शास्त्रशुद्ध साम्यवादी क्रांतीच्या प्रक्रियेमध्यें उत्क्रांति-क्रांतीचाही एक नवा मेळ साधला जातो. राष्ट्रीय-बहुराष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय अंतर्विरोधांच्या बाबतींतही साम्यवादी समाजक्रांतीनंतर या वेगवेगळ्या अस्तित्वांमध्यें एक नवें सुसंवादित्व प्रस्थापित होतें.

'राष्ट्रीय' म्हणजे काहीं तरी स्वयंभू, स्वयंपूर्ण, स्वयंमेव, अद्वितीय,अपरिवर्तनीय असें मुळींच नव्हे.प्रत्येक अस्तित्वाप्रमाणे 'राष्ट्रीय' अस्तित्वही परिवर्तनशील, विकसनशील असून इतर राष्ट्रांच्यां सहवासाने, सहकार्याने 'राष्ट्रीय' अस्तित्व एक नवरुप, नवआशय धारण करीत असतें. भक्कम 'राष्ट्रीय' ऐक्य साधत असताना भक्कम आंतरराष्ट्रीय ऐक्यही साधत जाते. अशा प्रकारचें राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय नवऐक्य हीच अभूतपूर्व समाजविकासाची हमी ठरते.

संपूर्ण मानवी इतिहासांत फक्त लेनिनच्या आचार-विचारांनीच वर उल्लेखिलेल्या परस्पर विरोधांची ऐक्यें निर्माण केली व मानवजातीसमोर आज विश्वशांती-सौख्य-समृ-

द्धीचीं नवीं क्षितिजें दिसूं लागलीं आहेत. म्हणून आम्हाला लेनिन हा आमच्या काळांतील समाजक्रांतीचा प्रकाशपुंज वाटतो. त्याच्या आचारविचारांच्या प्रकाशात आम्ही लिहिल्या त्या केवळ 'प्रकाशरेखा'!

जगताकडे पहाण्याचा शास्त्रशुद्ध दृष्टिकोन प्रस्थापीत करण्यासाठी दत्तावाळांचा कल्पनाविलास खोडून काढणे आवश्यकच होते. त्याचबरोबर क्रांतिकारक नवीन ऐक्यांच्या आकलनाचा प्रयत्नही या 'प्रकाशरेखांत' आम्ही केलेला आहे. याबाबतच्या आकलन–साकल्यांत जें मागे पुढें झालें असेल, आगळें उणे राहिलें असेल त्याबद्दल सर्वस्वी दोषी आम्हीच आहोंत. 'सत्य असत्याशी मन ग्वाही' करुन प्रसंगानुरुप या 'प्रकाशरेखा' लिहिल्या गेल्या एवढेंच आम्ही सांगू इच्छितों.

पणजी, गोवा. नारायण देसाई

१–५–७२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. ...
... ७९२७८ ... निबंध
... २१९५ ... १२।८।८२
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १७७४
शाखा

(श्री. दत्ता बाळ आणि लेखक यांच्यामधील तत्त्वज्ञानाच्या कांही महत्वाच्या प्रश्नांसंबंधीचा गंभीर वादविवाद 'दैनिक गोमंतकां'त [ जानेवारी-फेब्रुवारी १९६९ ] छापून आला होता या वादविवादांत दत्ता बाळांच्या वतीने प्रा. सुभाष देसाई यांनीही भाग घेतला होता. लेखकाने उत्तरादाखल लिहिलेले तीन लेख प्रस्तुत पुस्तकांत दिलेले आहेत. पैकी पहिला लेख प्रथम 'नवाकाळ' मध्ये आलेला होता.)

# दत्ता बाळांचा अतिव्यक्तिवाद

सध्या चमत्कारांची मीमांसा करण्याच्या निमित्ताने म्हणून दत्ता बाळ-सारख्यांकडून जे तत्वज्ञान मांडण्यात येत आहे त्यात भले जरी काही नामवंत वैज्ञानिकांच्या मतांचा हवाला दिलेला असला तरी कल्पनाविलासाचे मंडन करून अंतीं अतिव्यक्तिवादाचाच फैलाव ते करीत आहेत.

व्यक्तीला समाजाबाहेर कोणतीही सत्यें प्रतीत होणार नाहीत. व्यक्तीच्या कल्पना, विचार, भाषा, संस्कृती व नीतीमूल्यें त्याला मुळांत

समाजाकडूनच उचलावीं लागतात व तसें झाले तरच हे सारे संस्कार व्यक्तीकडून योग्य तऱ्हेने जोपासले जाऊन वृद्धिगत होऊ शकतात. व परत समाजाकडे संक्रमित होतात. समाजाकडून व्यक्तीकडे व व्यक्तीकडून समाजाकडे अशी ही अन्योन्याश्रयी क्रिया सतत चालू असते. समाज-निष्ठ व्यक्तिस्वातंत्र्य हाच या क्रियेचा सरळ अन्वयार्थ आहे.

## समाजविकास अधिक निर्णायक

व्यक्तीचे बरेवाईट वर्तन, रागलोभ, भयमत्सरादि विकारांचा व्यवहार, भवबाधेचा बंदोबस्त, सुखदुःख आणि भवितव्य अंतीं समाजविकासाशीच निगडीत असतात.

म्हणून कार्ल मार्क्सने कांही व्यक्तींच्या मनोविकासाहून बहुजनांचा समाजविकास अधिक निर्णायक मानून समाजविकासाच्या जागतिक इति-हासाचें मंथन केले व त्यातून समाजविकासाचे नियम शोधून काढले. त्याच-बरोबर तत्वज्ञानाचे समाजविकासातील योग्य ते स्थान जाणून त्याला हितसंबंधी वर्गाच्या कल्पनाविलासी अध्यात्मापासून सोडविण्यासाठीं त्याचा वस्तुनिष्ठ भौतिकवादी पाया मजबूत केला.

## संबंध जीवनदर्शन

तत्वज्ञानाच्या प्रारंभापासून अध्यात्माबरोबरच भौतिकवादही चालत आला आहे. वास्तविक भौतिकवादाची परंपरा अध्यात्मवादाहून जुनी आहे. भारतीय तत्वज्ञान प्रामुख्याने भौतिकवादीच आहे.

परंतु चार्वाकादिकांचा पुराणा भौतिकवाद हा जड, प्राथमिक आणि स्वयंस्फूर्त होता तर युरोपांतील मार्क्सपूर्वकालीन भौतिकवाद यांत्रिक परि-सरांत वाढल्यामुळें यांत्रिक भौतिकवाद होता. मार्क्सने या दोन्ही प्रकारच्या भौतिकवादांवर हल्ला चढविला आणि भूततत्वाच्या ( Matter ) कल्पने-मध्यें विकासशीलता आणि नवनवोन्मेषशालिनी गती ओतून त्याला गत्या-त्मक भौतिकवादाचे ( Dialectical Materialism ) स्वरूप दिलें.

भांडवलदारी प्रवृत्तीचे तत्वचिंतक मार्क्सच्या गत्यात्मक भौतिकवादाचें वैशिष्ट्य आणि शास्त्रशुद्धता जाणून न घेता उगाच गोंधळ माजवीत असतात.

महाराष्ट्रातील एक विद्वान अभ्यासक श्री. दादा धर्माधिकारी याविषयीं म्हणतात 'हा जो यांत्रिक जडवाद तो निराळा आणि मार्क्सचा भौतिकवाद निराळा. या दोहोंची गल्लत करता कामा नये. यांत्रिक जडवादाच्या मुळाशीं कुठल्याही प्रकारचे भौतिकवादाचे तत्वज्ञान नव्हतें. परंतु मार्क्सच्या भौतिकवादांत एक सबंध दर्शन आहे. जशी जुन्या काळची षड्दर्शनें.' ( पहा. सर्वोदय दर्शन पृ. ७५ )

## गतिमान जड कसें ?

दत्ता वाळ यांनी मार्क्सच्या तत्वज्ञानावर घसरुन त्याला जड ठरविण्याचा प्रयत्न केला आहे. समाजपरिवर्तनाची गती पारखून त्याला क्रांतिकारी परिमाण प्राप्त करून देणारें नवयुग. निर्मितें तत्त्वज्ञान जड कसें ?

कार्लमार्क्सच्या कालापर्यंत कल्पनाविलासी अध्यात्म जें डोक्यावर चालत होतें व डोकें आहे म्हणून जगत् आहे म्हणत होतें त्याला मार्क्सने जगत् आहे म्हणून डोकें आहे याची जाणीव करून दिली व तत्वज्ञानाला जगाचे वास्तव प्रश्न सोडवण्याच्या कामाला जुंपलें.

या विश्वामध्यें जें जें आहे तें तें भौतिक आहे, गतिमान आहे व जें भौतिक नाहीं आणि म्हणून गतिमान नाही त्याला अस्तित्व नाहीं तें केवळ काल्पनिक किंवा केवळ जाणीवेच्या प्रांतातलें. तें सत् नव्हे तर चित्. चित् जेवढे सत्चे नियम शोधून काढून त्या नियमाप्रमाणे वागेल तेवढी आनंदप्राप्ती अधिक असा मार्क्सवादाचा पूर्ण वास्तववादी व सच्चिदानंदस्वरूपी फलितार्थ आहे. ज्ञानयोग आणि कर्मयोगाचा तो अभूतपूर्व संयोग आहे.

## भौतिकवाद अबाधितच

आपलें विश्व कितीही परिमाणांचें असो, पण तें वस्तुतः अस्तित्वांत आहे ही आमची धारणा. या विश्वाची पदार्थविषयक रचना व गुणधर्म

पदार्थविज्ञानाच्या अभ्यासात येतात आणि विज्ञानाच्या विकासावरोबर भौतिकतत्वाच्या पदार्थात्मक रचनेबाबत आमची मतेंही बदलतात. ही मतें आइनस्टाइननेच बदलली असें नव्हे, तर आइनस्टाइननंतर झालेल्या संशोधनानेही ह्या प्रांतांत बराच थारेपालट घडून आलेला आहे. हॉइल–नारळीकरांनीही फार मोठा पल्ला गांठला आहे. तरीहि त्यांचे निष्कर्ष अजून सर्वमान्य झालेले नाहीत. सोविएत आणि अमेरिकन अवकाशशास्त्राने टाकलेल्या भरीतून योग्य निष्कर्ष काढावयास अजून फार मोठा काळ जावा लागेल. परंतु हे बदल कितीही मोठे असले तरी वस्तुनिष्ठ असे जगत् असून जाणीव ही त्या वास्तविक जगाचे प्रतिबिंब आहे या भौतिकवादाच्या विधानाला त्यामुळे मुळीच धक्का पोहोचत नाही.

## अतिभौतिक भौतिकाचेच अंगभूत

विश्वाचे खरे आकलन विश्वाच्या एकात्मतेत किंवा अद्वेतात आहे व जगाची खरी एकात्मता त्याच्या भौतिकतेत आहे. दत्ताबाळांचा अतिभौतिक 'अहं' हें या जगतावर ताबा ठेवणारे सर्वदर्शी वेगळे तत्व नसून आपण ज्या जगात रहातो त्याचाच अंगभूत भाग आहे; परलोकाचा भाग नव्हे. अतिभौतिक हेहि आधीं आणि अंती भौतिकच. आणि भौतिकतेच्या मूलभूत नियमांनुसार ते चालणार !

## नियमानुसारी म्हणून अद्वैत

वास्तविक विश्व हे भौतिक आहे, अद्वैत आहे, एकात्म आहे हे जाणण्यापेक्षां विश्वाचे सारे नियम मानवाला अजून अवगत झाले नसले तरी ते अवगत होऊ शकतात आणि जग हे विश्वनियमानुसारी (Law Abiding किंवा Cosmos) असून विश्वाच्या या नियमानुसारीत्वामुळेच विज्ञान आणि सामंजस्य शक्य झाले आहे. हें जाणणे अधिक महत्वाचें आहे. जगतात सामंजस्य नसते तर दत्ता बाळचे म्हणणे मला व माझे दत्ता बाळाना कसे बरे समजले असते ? सामंजस्य हे विश्वाच्या नियमानुसारित्वाचे फलित

आहे. नियमाच्या अभावी सामंजस्य असंभव आहे आणि सामंजस्याच्या अभावी तत्वज्ञान असंभव आहे.

## परिमाण नव्हे परिणाम

विश्वाचे मूलभूत आकलन दत्ताबाळ ठरवतात त्याप्रमाणे विश्वाची परिमाणे ठरविण्यात नसून, विश्वाच्या नियमानुसारित्वाच्या जाणीवेत आहे. विश्व हे नियमानुसारी असून, कालानुक्रमाच्या दृष्टीने ते मानव आणि त्याची जाणीव यांच्या अगोदरचे आहे. त्यामुळे ते मानवनिरपेक्षच नव्हे तर जाणीव–निरपेक्षही आहे. जाणीव, आत्मा. परमात्मा, ईश्वर, आदि खऱ्याखोट्या संमिश्र कल्पना विश्वाला परिणामस्वरुप आहेत व जे परि–णाम आहे ते कदापी परिमाण ठरुच शकत नाही. दत्ता बाळ मानतात त्याप्रमाणे कल्पना विचार हे विश्वाचे स्वतंत्र परिमाण नसून तो विश्वाच्या अस्तित्वाचा परिणाम आहे.

## विज्ञान आणि चमत्कार

विश्वाच्या नियमांपैकी जे समजले त्याचे विज्ञान बनत जाते. न समजलेले ते चमत्कारात मोडते. चमत्कारांचे प्रथम अध्यात्म बनत असते व आजही दत्ता बाळ तेच करू पहात आहेत. पण सारे चमत्कार कालौघाने कळणारे व कळत जाणारेच आहेत व अनादि काळापासून ते कळत गेलेले आहेत, कळत चालले आहेत. कोणत्याच चमत्कारांतून आत्मा–पर–मात्मा, ईश्वर व दत्ताबाळ यांचे चौथे परिमाण मुळीच सिद्ध होत नाही.

## अज्ञेय अमान्य

विज्ञान आणि चमत्कार यांमध्ये द्वंद्व आहे. पण ते कोणत्या प्रकारचे 'द्वंद्व' आहे ? विज्ञान चमत्काराला ग्रासीत सुटलेले आहे. तसेच ज्ञात आणि अज्ञात यामध्येही द्वंद्व आहे. ज्ञात अजून अज्ञात असलेल्या क्षेत्रांवर सतत आक्रमणामागून आक्रमणे करतच आहे व अज्ञाताचे किल्ल्यामागून किल्ले भुईसपाट करीत चालले आहे. विज्ञान आणि चमत्कार, ज्ञात आणि अजून

अज्ञात यांमध्ये द्वंद्व असले तरी अंतर्विरोध नाही. तसेच विज्ञानाचे आणि चमत्कारांचे शास्त्रशुद्ध आकलन यांमध्येही अंतर्विरोध नाही. अंतर्विरोध आहे तो ज्ञेय आणि अज्ञेयाच्या कल्पनांमध्ये. कारण त्या कल्पनांप्रमाणे ज्ञेय हे कायमचे हतप्रभ ठरुन अज्ञेय हे कायमचे विजयी ठरते. गतिमान, विकासमान, चैतन्यशाली समाजाला हे आकलन मान्य नाही !

## सामाजिक अंतर्विरोध

मग अंतर्विरोध आहे कोठे व कशाला ? अंतर्विरोध आहे तो विज्ञानाच्या प्रकाशांत येऊन आपले भवितव्यजे आपणच निश्चित करुं पहातात त्या बहुजन–समाजाला अध्यात्मिक निद्रेत झोपविणारे व त्याविरुद्ध हातीं लागेल तो बुद्धिवाद घेऊन बहुजनसमाजाला आपल्यावरील घोर अन्याय दूर करून घेण्यासाठी जागविणारे यांमध्येच आहे. हाच सामाजिक अंतर्विरोध दत्ता बाळ आणि बाळ ठाकरे यांना एका ठराविक बाजूला उभे करून भाई बागल आणि भाई डांगे यांना विरुद्ध बाजूला उभे करीत आहे.

आज एका बाजूला मानवाने चंद्रावर पोहोचण्याइतपत विज्ञानाची किमया वाढलेली असताना यावेळीच चमत्कारांच्या निमित्ताने ईश्वरकल्पनेची बुरशी चढलेले आत्मा–परत्म्याचे विचार सुचतात ही कांही वैयक्तिक लहर नव्हे. समाजजीवनांतील अंतर्विरोधांचा तो परिणाम आहे.

## मृर्तपिंड पुजारी आणि लोकभ्रम

विज्ञानाच्या प्रत्येक विजयावरोबर हादरुन गेलेल्या युरोपांतील प्रतिगामी वर्गाने आपल्या मृर्तपिंड पुजाऱ्यांमार्फत लोकभ्रम पसरविण्याच्या कोणकोणत्या बौद्धिक चलाखी केल्या ते युरोपच्या सांस्कृतिक इतिहासांत कोणालाही सांपडेल.

सध्या तर विज्ञानाच्या विजयावरोबरच समाजवादाच्या प्रचंड विजयाचे तडाखे प्रतिगामी वर्गाला बसत आहेत. सारे जगच आज विज्ञान आणि समाजवाद यांच्या प्रभावात आलेले आहे. आपला भारत त्याला अपवाद

नाही. आणि म्हणूनच इथले प्रतिगामित्व पूर्वी कधीहि नव्हते इतके कडवट बनून आजवर जोपासलेली बुद्धिवादी मूल्येही पायदळी तुडवू लागलेले आहे. याबाबतीत बॅड्रांड रसेल या तत्ववेत्त्याचे पुढील शब्द किंचित निराशावादी असले तरी अभ्यसनीय वाटतात.

"कम्युनिझमच्या मूलभूत कल्पना मुळीच अशक्य कोटींतल्या नाहीत आणि त्या जर अंमलात आल्या तर मानवतेचे अपरिमित हित साधणार आहे. परंतु याबाबतींत मुख्य अडचण कम्युनिझमच्या मुलभूत तत्वाविषयीची नसून भांडवलदारांच्या विरोधाबाबतची आहे. हितसंबंधी लोक आपल्या फायद्यासाठी उग्र लढा देतील व या लढ्याच्या कालापुरती कम्युनिझममध्ये अंतर्भूत असलेली मूलतत्वे नष्ट होण्याबरोबरच आधुनिक संस्कृतीची मूल्येही नष्ट करण्यास हितसंबंधी लोक मागेपुढे पाहणार नाहीत." (पहा. दी प्रॅक्टिस एँड थिअरी ऑफ बोल्शोविझम पृ. ५०)

## भोंगळ युक्तिवाद.

'मार्मिक'मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'कम्युनिस्टांनो याचा विचार करा' या मथळ्याखालील दोन लेखात दत्ताबाळ आम्हाला सुनवितात ते हे की, 'चमत्कार खरे तर भौतिक खोटे, अतिभौतिक खरे तर भौतिकवादाच्या पायावर अधिष्ठित असलेला समाजवाद खोटा.'

शेवटी भांडवलवाद झिंदाबाद असे दत्ता बाळानी लिहिले नाही इतकेच! त्याचबरोबर हेहि कबूल केले पाहिजे की, दत्ताबाळाकृत एखादे अतितर्कशास्त्र जोवर हातीं येत नाही तोवर आम्ही काय किंवा आमचे बिचारे वाचक काय जुन्या तर्कशास्त्रावरच या भयानक युक्तिवादाची पारख करणार व इच्छा असती तर जग जाणण्याची ज्यांची कुवत आहे त्यानी जागतिक श्रमजीवीं वर्गाच्या आंदोलनाचा पाया असलेल्या तत्वज्ञानाविरुद्ध भोंगळ युक्तिवाद पुढे करावा याबद्दल खेदच प्रकट करणार.

## विज्ञानावर विश्वास

चमत्काराचे काय घेऊन बसलात एवढे ? चमत्कार कांही खरे तर

कांही खोटे. सगळेच चमत्कार खरे, असे डांगे यांनी म्हटलेले नाही. जे चमत्कार खरे असतील त्यांची कारणे काही समजली आहेत. काही समजलेली नाहींत. जशी भाई डांगे यांना तीं समजलेली नाहीत तशीच ती दत्ता बाळ यांनाही समजलेली नाहीत. पण दत्ता बाळ मात्र विज्ञानाला विश्वासांत घेण्याऐवजी चवथ्या परिमाणाला उराशी घट्ट धरुन बसले आहेत. याउलट भाई डांगे यांचा विज्ञानावर विश्वास आहे. कारण त्यांचा स्वतःच्या बुद्धीवर, समाजावर, समाजातील पुरोगामी वर्गावर विश्वास आहे.

दत्ता बाळ फक्त विज्ञानाला छेडण्यापुरतेच विज्ञान मानतात. आणि बुद्धीला हतप्रभ करण्यासाठीच बुद्धीचा वापर करताहेत व शेवटी तुम्हा आम्हा सर्वांना आध्यात्मनिद्रेत झोपविणे हेच त्यांचे जीवनकार्य झालेले आहे.

## ईश्वर असिद्धे :

आजवर आत्मा, परमात्मा, ब्रह्म, ईश्वर आदी भ्रमिष्ट कल्पनांची जी गत झाली तीच दत्ताबाळ यांच्या चवथ्या परिमाणाची होणार. यापैकी एकही गोष्ट कोणी कधी सिद्ध केलेली नाही. अर्थात वैयक्तिक आणि सामुदायिक भ्रमाचे ( Collective Hallucinations ) अनेक प्रकार प्रत्यहीं घडत असतातच. एवढा थोरला कर्तुमअकर्तुम परमेश्वर पण तो तरी कोणी सिद्ध केला आहे काय ? 'कपीलमुनीनी ईश्वर असिद्धेः ' असाच मुळी शेरा मारला आहे. तर ज्या जगात विषमता आणि नैघृण्य आहे त्या जगाचा कर्ता सवरता ईश्वर असणे शक्य नाही असे दुसऱ्या मुनीने सांगितले. 'नेश्वरो जगतः कारणम् उपपद्यते वैषम्य नैघृण्य प्रसंगात्.' दत्ताबाळ सारख्यांनी आईन्स्टाईन व इतर पाश्चात्य वैज्ञानिकांचे कांही अवैज्ञानिक उद्‌गार गांठीला बांधून बसण्यापेक्षा भारतीय तत्वज्ञानाची भौतिकवादी परंपरा पुढे नेण्याचा विचार करणें कांही गैर ठरले नसते.

## आम्ही सिद्ध करतो

आम्ही आमच्या पुरते एवढे जरुर सांगू शकतो की, आम्हीं जे जे

मानतो ते ते सिद्ध करतो. आम्ही भौतिकता मानतो. आम्ही गतिपरिवर्तन मानतो. भांडवलशाही आहे असें मानतो. पिळवणूक मानतो. वर्गलढा मानतो. आणि हे सर्व वाटेल तेव्हा सिद्ध करावयास तयार असतो. दत्ता बाळ यांच्या भाषेतच सांगावयाचे तर आमच्या आजोबाने म्हणजे मार्क्सने हे सारे सिद्ध केले आहे. पण

## सगळे अतीत अंती भौतिकच

पण दत्ता बाळ जें मानतात व जनतेसमोर ठेवतात त्यापैकी बहुतेक सर्वच्या सर्व अती जुनाट असूनही त्यांच्या अध्यात्मवादी आजोबा–पणजोबांना त्यापैकी कांहीही सिद्ध करता आलेलें नाहीं. आणि जे ते अति-नूतन व सापेक्षतावादाच्या नंतरचे म्हणून समजतात तें त्यांचे अतिभौतिक, अतिमानसिक, वगैरे वृथा पोकळ असून त्यानी अजून काहीही भरीव असे सिद्ध केलेले नाही. ज्याना ज्ञानतंतूव्यवस्थेच्या कार्याच्या आणि सेंट्रल कॉर्टेक्स व सब् कॉर्टेक्सच्या कार्याची माहिती आहे किंवा पावलोव यांची शरीरमानस-शास्त्रातील महनीय कामगिरी माहिती आहे, त्यांना अतिमान-सिक हें अंतीं मानसिकच आहे व त्याचे नियम असून चवथ्या परिमाणाच्या प्रमेयाची तेथे मुळीच गरज नाहीं हेही ठाऊक आहे. श्रापाने सुद्धां माणूस मरूं शकतो हे पावलोवच्या शब्द आणि आत्मसंस्करणाच्या ( Word Signalisation and auto suggestion ) विश्लेषणावरून सिद्ध झालेलें आहे. ( पहा– वर्ड-अॅज ए थेरपेवटीक फॅक्टर. ले. :– के. प्लातोनोव.)

## अंधश्रद्धाळूंचे दाखले कुचकामी

युरोपमध्ये ग्राफोलोजी, फिजियोनोमिक्स आदी अनेक खुळचा विज्ञा-नांचा ( Pseudo Sciences ) सुळसुळाट गेल्या दोनशे वर्षाइतका जुना आहे. 'साइकीकल रिसर्च' ही संस्थाही अशीच जुनी आहे. या संस्थेचे प्लँचेटविषयींचे निष्कर्ष महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध तत्वचिंतक दिवंगत वामन मल्हार जोशी यांनी तपासून त्याज्य ठरविले होते हे कदाचित दत्ता बाळ यांना ठाऊक नसावें. त्याचप्रमाणे आलटून पालटून ज्या वैज्ञानिकांचा

ते भलत्या ठिकाणी उल्लेख करतात त्या सर ऑलिव्हर लॉजना त्यांच्या मृतपुत्राचा आत्मा दाखवितो म्हणून सांगून कांही मंडळींनी रात्रीच्या वेळी लाल प्रकाश परिप्लुत खोलीत नेले व फोटो दाखवून फसविले. पण सर ऑलिव्हर लॉजनी त्यांना आपण आपल्या मुलाचा आत्मा पाहिल्याचे शास्त्रीय सर्टिफिकीट दिले होते. जेव्हा त्या मंडळींपैकी कांही अमेरिकेंत पकडले गेले तेव्हां त्यांच्या कोर्टांतील साक्षीमुळें सारें बिंग बाहेर आले. अशी असतात शास्त्रज्ञांची कांही अशास्त्रीय मतें !

लॉजसारखे अंधश्रद्धाळू शास्त्रज्ञ जेव्हां विज्ञानबाह्य गोष्टींच्या नादीं लागतात तेव्हां ते विज्ञानाची पद्धती ( Scientific method of investigation ) सोडून चालत असतात. म्हणून वैज्ञानिकांच्या अवैज्ञानिक व्यवहारांकडे जाणकारांनी साशंक दृष्टीने पाहिले पाहिजे.

अगदी जवळचेच उदाहरण दत्ता बाळना हवे असल्यास त्यानी गोव्यांत जाऊन संत झेवियरचे चमत्कारपूर्ण शव पाहून घ्यावे. पोपसाहेबांच्या खास वरिष्ठ कौन्सिलच्या काही महापुरोहितांनीसुद्धां देवशास्त्राच्या ( Theology ) दृष्टीनेही ते शव प्रदर्शनाच्या लायकीचे नसल्यामुळे तेथून हलवावे असे प्रतिपादन केलें आहे. तरी देखील युरोपांतील मोठमोठाले वैज्ञानिक हे शव पहाण्यासाठी गोव्यांत येऊन 'वैज्ञानिक' दृष्टयाही हे शव हा एक चमत्कार आहे अशी 'वैज्ञानिक' सर्टिफिकिटे देऊन जातात.

## वैज्ञानिक मूल्यमापन हवे

दत्ता बाळ यांना विज्ञान व तत्वज्ञान या प्रांतांमध्यें कोणाला किती किंमत द्यावयाची तें समजलेले दिसत नाहीं. एडिंग्टन, जेम्स जीन्स, वगैरे शास्त्रज्ञांची मते ते विज्ञानविषयक प्रायोगिक मते म्हणून सांगतात. परंतु जेम्स जीन्स व एडिंग्टन यांची प्रयोगाबाबत विशेष ख्याती नव्हती. वैज्ञानिक विषयांना धरून व्यक्तिवादी तत्वज्ञानाचे मंडन करणारे चुरचुरीत ग्रंथलेखन त्यानीं केलें आहे. डॉ. राधाकृष्णन यांनी त्यांच्या नावाचा आपल्या ग्रंथांतून फार उदोउदो केला आहे एवढेच. परंतु डॉ. राधाकृष्णन यांच्या तत्व-

ज्ञानाच्या परिसीमा आणि परिमाणें ज्याना ठाऊक आहेत, त्यांनी तोल सांभाळून लिहिणे आवश्यक वाटते.

जेम्स जीन्स, एडिंग्टन व त्याच धर्तीवर ग्रंथलेखन करणाऱ्या इतर बऱ्याच शास्त्रज्ञांच्या विज्ञानातील प्रायोगिक कामगिरीविषयीचे वैज्ञानिक मूल्यमापन जर दत्ता बाळाना पहावयाचे असेल तर त्यांनी शास्त्रज्ञ प्रो. जे. बी. हाल्डेन, प्रो. बर्नाल, प्रो. मार्सेल प्रेना, प्रो. डी. डी. कोसंबी यांचे ग्रंथ अभ्यासावे.

●●●

# चमत्कारवाद्यांचा गोंधळ

प्रा. सुभाष देसाई यांनी आमच्या लेखाला दिलेल्या उत्तराचे (गोमन्तक दि. १६–२–६९) नमनच ल कॉम्ते द नॉय यांच्या पुढील शब्दांनी केलेले आहे.—

> "अनाकलनीय अशा इवल्याशा जागेंतील ऋणकणाचे परिभ्रमण बुद्धिनिष्ठ मानव मान्य करतो. ऋणकण एकतंत्ररूपी परिणाम आहे हेंही तो मान्य करतो. गणिततज्ञानी स्वतः गणिती पद्धतीने अस्तित्वांत आणलेल्या पण अजूनही अदृश्य असलेल्या न्यूट्रीनो कणालाही तो मान्यता देतो. परंतु परमेश्वराला प्रत्यक्ष पहाता येत नाही म्हणून त्याला मात्र तो अमान्य करतो."

वास्तविक परमेश्वराचा भाव किंवा अभाव हा आमच्या किंवा श्री. दत्ताबाळ यांच्याही लेखांचा मुख्य मुद्दा नव्हता. त्याचप्रमाणे प्रस्तुत वाद

हा साम्यवाद श्रेष्ठ की भांडवलवाद श्रेष्ठ हे ठरविण्याचाही नाही. खरा वाद आहे तो आधुनिक चमत्कारवादी आणि आधुनिक बुद्धिवादी यांमध्ये. म्हणून अवांतर गोष्टी बाजूला सारून मूळ मुद्याला हात घालतो.

## असिद्ध म्हणून अमान्य

प्रारंभीच दिलेल्या ल कॉम्ते द नॉय यांच्या शब्दांत त्यानी म्हटल्या–प्रमाणे बुद्धिनिष्ठ मानव परमेश्वराचे अस्तित्व मानीत नाही ही गोष्ट अगदी खरी आहे. याबाबतीत 'सत्य असत्याशी मन केले ग्वाही मानियेले नाही बहुमता' अशा मनस्वी भावनेनेच बुद्धिनिष्ठ वागत असतात. परंतु ईश्वराला पहाता येत नाही म्हणून त्याचे अस्तित्व बुद्धिनिष्ठ लोक मानीत नाहीत हे मात्र खरे नाही.

आमच्या चमत्कारवादी मित्रांनी तर तसे समजण्याची मुळीच गरज नव्हती. कारण माझ्या लेखांत ईश्वराची कल्पना सिद्ध होत नाही. (ईश्वरा सिद्धे :–) म्हणून तर ईश्वरकल्पना अमान्य असे स्पष्ट म्हटलेले आहे.

## वस्तुत्व संपले नाही

कोणतीही वस्तु दाखविता न येणे आणि सिद्ध करतां न येणे या दोन गोष्टी भिन्न आहेत. आधुनिक विज्ञानाने विज्ञानाच्या जुन्या कल्पनेमध्ये बराच बदल केला आहे हे खरें असले तरी वस्तुत्व म्हणून आता कांही उरले नाही असे समजणे चूक होईल. रेडिओ ॲक्टिविटीच्या शोधानंतर शास्त्रज्ञ लबेदेव यानी प्रकाश पृथःकरण करून भूततत्वाच्या अस्तित्वाचा सबळ पुरावा मिळविला आहे. प्रकाशकणाच्या (Photons) दाबाचा शोध हा तो पुरावा होय.

## सत्व आणि भूततत्व

भूततत्व (Matter) म्हणजे सत्व (Substance) असे मानण्याचा प्रघात आहे. परंतु ते चूक आहे. कारण सत्व हा भूततत्वाचा फक्त एक

प्रकार आहे. वस्तुमान असलेल्या ( Mass of rest ) किंवा स्थिर जड-त्वाच्या प्रत्येक पदार्थाला सत्व म्हणतात. परतु भूततत्वाच्या प्रत्येक पदार्थांमध्ये क्षेत्रेसुद्धा अंतर्भूत होतात. कारण क्षेत्र हाही मूलभूत पदार्थ आहे हे सिद्ध झालेले आहे.

पादार्थिक क्षेत्र (Nuclear field ) ही भौतिक वस्तूंना जोडणारी आणि एकाची क्रिया दुसरीला देणारी भौतिक रचनाच आहे. विद्युत चुंबकीय क्षेत्रांतील प्रकाशकणांना (Photons) स्थिर जडत्व नसले तरी वस्तुत्व आहेच.

सत्व आणि क्षेत्र हें भौतिकतेचे गुणधर्म आहेत. ते परस्परांशी संबंधित असतात, त्यांची एकमेकांवर प्रतिक्रिया होते आणि कांही वेळां एकमेकांत रूपांतरही होते.

## समस्या म्हणजे अंत नव्हे

पोलिमरच्या शोधानंतर मानवी मनाने खरे पहाता अतिसूक्ष्म आणि अतिविशाल अशा दृश्य जगाच्या सीमेवर असलेल्या क्षेत्रांत पदार्पण केले आहे. अनेक पोलिमेरिक मिश्रणे विशेषत: प्रोटीन्स, जिवंत कणाच्या रचनेस सहाय्यभूत होत असल्याने त्यांचा यशस्वीपणे अभ्यास केल्यास सजीवतेचे सार समजणे शक्य आहे.

तथापि प्रत्येक विज्ञानशाखेपुढे अडचणी आहेत, समस्या आहेत याचा फायदा वैज्ञानिक ज्ञानाचे खरेखोटे शत्रू नेहमीच उठवू पहात असतात. ते नेहमीच असे जाहीर करीत आले आहेत की पहा, विज्ञानामध्ये आली आपत्ती; आतां विज्ञान इथे संपले. तेव्हा गूढापुढे मान तुकवा. चमत्कार माना. अंधश्रद्धा माना. म्हणा बुद्धि हरली. म्हणा ईश्वरांची जीत झाली. परंतु ना विज्ञान कधी हरलेलें ! ना अंधश्रद्धा कधी जिंकलेली !

## भौतिकांतून अधिभौतिक

जैन दर्शनाच्या परिभाषेंत ज्याला सद्वस्तु (Reality) म्हणतात त्या

वास्तवाची कल्पना आणि भौतिकवादी दर्शनामध्ये ज्याला भूततत्व म्हणतात ( Matter ) त्या भौतिकाची कल्पना विज्ञानाला कधी खोडून काढता आलेली नाही. कारण 'आमच्या मनापासून स्वतंत्र अस्तित्वांत असणे आणि संवेदनाद्वारे ते आम्हाला प्रतीत होणे' ही भूततत्वाच्या अस्तित्वाची कसोटी आहे. भूततत्व अखंड गतिमान आहे व जगांतील यच्चयावत प्रक्रिया मूलतः भौतिक असून अधिभौतिक हे तद्भव (भूतेस्य चैतन्यम्).

## सिद्ध करणे महत्वाचे

भौतिक प्रक्रिया दाखवण्या–पहाण्यापेक्षां सिद्ध करता येणे अधिक महत्वाचे असते. विवक्षित प्रक्रिया आहे असे मानण्यापूर्वी ती सिद्ध झालेली असावी लागते. त्याशिवाय ती मानू नये असा वैज्ञानिक विचारसरणीचा दंडकच आहे; व मानवाच्या बुद्धिनिष्ठेची कसोटी लागते ती तिथेच !

## लाखो प्राण खर्ची

बुद्धिनिष्ठेपायीं सबंध इतिहासकालांत हजारों लाखों प्राण खर्ची पडलेले आहेत. मध्ययुगीन युरोपांतील अंधविश्वासाविरूद्ध लढा देताना कोपर्निकस, गॅलिलिओ व ब्रुनोसारख्या अव्वल दर्जाच्या बुद्धिनिष्ठाना अनन्वित छळ सोसावा लागलेला आहे.

## बुद्धाचे व्यक्तिमत्व

परंतु बुद्धिनिष्ठेची पताका जगामध्ये पहिल्याप्रथम उंच फडकविण्यात बुद्धाचे विशाल कर्तृत्वच अधिक कारणीभूत झाले आहे. बुद्धापूर्वी नास्तिक बार्हस्पत्य दर्शनाचे आद्यप्रवर्तक बृहस्पति (देवगुरु ?) होऊन गेले. जैनांचे वर्धमान महावीरापूर्वीचे तेवीस तीर्थंकर आणि अनेक सिद्धही होऊन गेले.

त्याचप्रमाणे भृगु, चार्वाक आणि लोकायत दर्शनाचे पूरण कश्यप, अजित केशकंबल, आचार्य मख्खली गोसाल आणि पकुद्ध कत्यायनादि बुद्धिप्रामाण्याचे समर्थ प्रतिपादक भारतामध्ये होऊन गेले. तथापि 'यत् भव तत् क्षणिकम्' म्हणजे जे जे अस्तित्वांत आहे ते ते नाशिवंत(परिवर्तनीय)

आहे व जे शाश्वत म्हणून परिवर्तनीय नाही ते अस्तित्वांत नाहीं असे प्रतिपादन करून ईश्वराची कल्पना फेटाळून लावणारे जगातील महापरिवर्तनकारी व्यक्तिमत्व म्हणजे बुद्धाचेंच.

## अंतीं दुःखदायी

शंकराचार्यांनीहि 'निरिश्वरोहं निरहंच निर्ममः' 'मी निरीश्वर आहे. कारण मी निरहंकार व निर्भय बनलो आहे' असे म्हटले आहे. तसेच पुरेशा पुराव्याने सिद्ध न झालेली गोष्ट अंतिम हिताच्या दृष्टीने परिणामी दुःखदायी ठरते असेही त्यानी शिकविले आहे. ( सूत्रभाष्य १–१ पहा. हिंदुधर्माची रुपरेखा. ले. :– टी. एम. पी. महादेवन्, पृ. १४४ )

असिद्ध गोष्टी जेव्हां मानल्या जातात तेव्हां त्या आपआपल्या मनाप्रमाणेच मानल्या जातात. श्वेताश्वतर उपनिषदातील ईश्वर स्त्रीही आहे, पुरुषही आहे, तसेंच तरुण वृद्ध सर्वकांही आहे. परमेश्वर मानीव वस्तू आहे म्हणूनच परमेश्वराला कोणी निर्गुण, निराकार, निष्कल्प ठरवितात; तर कोणी त्याला साकार बनवून विटेवर उभा करतात; तर दुसरे कोणी त्याला काळभैरव–देवचार ठरवितात. तर पंचमकारवादी म्हणजे मद्य–मांस–मत्स्य–मुद्रा–मैथुनपूजक शाक्तपंथीय सुसंस्कृत आचाराविरूद्ध जो जो अनाचार त्यालाच परमेश्वराची पूजा ठरवितात !

## गैरवाजवी प्रकार

आधुनिक विज्ञानाच्या नावाने उभे रहाणारे हान्स ड्रीशसारखे जीवनशक्तीवादी ( Vitalists ) या असिद्धालाच जीवशक्ती म्हणून आळवतात आणि हांरी बर्गसोंसारखे या असिद्धाचेच जीवप्रेरणा ( Elan Vitale ) म्हणून रसाळ वर्णन करतात. या लोकांचे प्रस्थ गैरवाजवी आहे अशी टीका करून सुप्रसिद्ध विचारवंत वामन मल्हार जोशी यांनी हा प्रकल्प केवळ गूढ आहे म्हणून बर्गसोनला आदरणीय झाला की काय, अशा शब्दांत बोळवण केली आहे. ( नीतीशास्त्र प्रवेश : पृ. ३३३)

अंगा जे मुळांतच असिद्ध त्याची जाणीव, गुण, लक्षण, ठरणारच कसे ? त्याला दत्ताबाळकृत 'केंद्र सर्वांठायी पण परिघ कोठेची नाही' हे चतुर्थ परिमाणात्मक वर्णन जितके लागू होईल तितकेच त्याच्या उलट असलेले 'परिघ कोणा ना दिसे, कमळकेंद्र कोठेंची नोहे' हे आमचे वर्णनही लागू होईल.

## एकवाक्यता नाही

वेदांतसूत्राने परब्रह्माचे वर्णन इंद्रियातीत आणि मूळ प्रकृतीच्या पलीकडले म्हणून अचित्य ( प्रकृतिभ्य: परं यत्युयद तदचित्यस्य लक्षणम ) असे जे केलें आहे त्याचा अर्थ परब्रह्म असिद्ध असल्यामुळें मानवी जाणीवेचा आणि चिंतनाचा विषय होण्यास अपात्र आहे असाच घेतला पाहिजे.

भारतापुरतेच आणि तेही भारतांतील फक्त वैदिक प्रणालीविषयी बोलणाऱ्या ऋषीमुनीतही एकवाक्यता नाही. 'वेदाविभिन्नाः स्मृतयोर्विभिन्ना नेकोमुनिर्यस्य वचः प्रमाणम्'

असिद्धाची स्थिती भारताबाहेर तरी कशी वेगळी असणार ! जर्मन महाकवी गटेने त्याचे मोठे मार्मिक वर्णन केले आहे. 'ग्रीक देवता ग्रीकां– सारख्या, तर हबशी देवताचे ओठ हबशासारखे !'

## नेती नेतीचे कारण

जे असिद्ध आणि काल्पनिक त्याचे वर्णन एकाने एका तऱ्हेने केले तर दुसरा 'ते तसे नाही, त्याच्या पलीकडचे आहे' असे म्हणणारच. 'नेति नेति' उद्भवण्याचे कारण ईश्वराच्या अस्तित्वाची असिद्ध परिस्थिती. प्रयोग– सापेक्ष सत्याच्या बाबतींत असा प्रश्न निर्माणच होत नाही. म्हणून बुद्धि– निष्ठ मानव ऋणकणाचे आणि न्यूट्रिनो कणांचेही अस्तित्व सरळ मान्य करतो; परंतु ईश्वरकल्पना मान्य करावयास कुरकुरतो. ल कॉम्ते द नॉयना काही कारणामुळे हे समजले नसले तरी दत्ता बाळना का समजू नये ?

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. ५९२५८ नि. निबंध २९८५ ता. १३।१०।७८

## वस्तुनिष्ठ सापेक्षता

आइन्स्टाइनच्या कालसापेक्षतेच्या शोधामुळे माणसाच्या सृष्टिविषयक कल्पना आमूलाग्र बदलून गेल्या. जोपर्यंत आपला संबंध प्रकाश वेगाच्या मानाने अगदीच क्षुद्र अशा वेगाशीच येत असे तोपर्यंत दोन गोष्टी एकाच क्षणाला घडतात असेच आपण मानीत होतो; पण ते चूक आहे असे सापेक्षतावादाने सिद्ध केले आहे. एकसमयावच्छेद केवळ दोन घटनांवर अवलंबून नसतो तर त्या दोन घटना ज्या चौकटीत आपण पहातो त्या चौकटीवरही अवलंबून असतो जर दोन चौकटी एकमेकींच्या दृष्टीने चल असतील तर एकीत एकाच वेळी घडलेल्या गोष्टी दुसरीत कांही कालांतराने घडतात असेच मानावे लागते व एकसमयावच्छेदाची कल्पना सापेक्ष बनते.

## बिनबुडाचे अध्यात्म

दिक्कालाचे सापेक्ष अस्तित्व सिद्ध करुन सापेक्षतावादाने अध्यात्मवादाचे बूडच उखडले आहे. बर्कले, ह्यूम, कान्ट, माख किंवा हेगेल कोणीही घ्या. कमीअधिक फरकाने दिक्कालाची निरपेक्षतताच त्यानी प्रतिपादली आहे. अत्मनिष्ठ अध्यात्मवादी (Subjective idealists) दिक्काला जाणीवेची निष्पति मानतात तर वस्तुनिष्ठ अध्यात्मवादी (Objective idealists) दिक्काल्ला सर्वोच्च विचाराची, वैश्चिक आत्म्याची निष्पत्ती मानतात. जडाव्यतिरिक्त चेतना–चलन, इंद्रियांच्या आधाराविना विचारांचे अस्तित्व, त्रिकालातीत ज्ञान आदी श्री. दत्ताबाळ यांच्या कल्पना या वस्तुनिष्ठ अध्यात्मवादी मालिकेतल्याच आहेत.

दिक्काल आणि भूततत्व या दोन्ही गोष्टी केवळ मानवी बुद्धीने निर्माण केल्या किंवा मानवी जाणीवेंतून निर्माण झाल्या असे मानावयाचे तर मानव अस्तित्वांत येण्याअगोदर कोट्यवधि वर्षे अंतरिक्षांत पृथ्वी आणि इतर ग्रह-तारे अस्तित्वांत होते या विज्ञानाने सिद्ध केलेल्या वादातील सत्याचे काय ?

## गतिमान भौतिक

मानवी मनावर अवलंबून न रहातां अस्तित्वांत असणे हा दिक्कालाचा

अत्यंत महत्वाचा गुण आहे. भूततत्वाच्या अस्तित्वांचे स्वरुप या नात्याने अवकाश (दिक्) तीन परिमाणाचा असतो. याचाच अर्थ प्रत्येक भौतिक वस्तूला लांबी, रुंदी आणि उंची असते. तर कालाला केवळ एकच परिमाण असते. म्हणून कालाच्या दृष्टीने सर्व वस्तू केवळ एकाच दिशेने भूतकालापासून भविष्यकाळाकडे विकसित होतात.

आइन्स्टाईनने प्रतिपादन केलेला सापेक्षतावादाचा सिद्धांत हा निसर्गविज्ञानांतील दिक्कालाविषयींचा आधुनिक सिद्धांत असून या सिद्धांताने दिक् आणि काल यांचा परस्परांशी आणि गतिमान भूतवस्तूशी असलेला अभेद्य संबंध दाखवून दिला आहे.

विज्ञान दिक्कालाची वस्तुनिष्ठा आणि गतिमान वस्तूंशी असलेल्या त्याच्या अविभक्त संबंधाची प्रमाणे अधिकाधिक उपलब्ध करीत चालल्यामुळें विज्ञानाची अध्यात्माकडे झुकण्याची वेडी आशा आता संपल्यासारखीच आहे. वस्तुतः 'जगत म्हणजे गतिमान भूततत्वाचा पसारा' (World is Matter in motion) या मार्क्सवादी व्याख्येचा पायाच सापेक्षतावादाने भक्कम केला आहे.

पदार्थाचे जडत्व हे तितक्याच शक्तीच्या संग्रहाशी सतत संबंधित असते या नियमाचा शोध लावून आइन्स्टाईनने भूततत्वाव्यतिरिक्त गति असू शकते म्हणणाऱ्या शक्तिवादाची दिवाळखोरी उजेडात आणली आहे. अध्यात्मवाद्यांच्या अपरिवर्तनीय निरपेक्ष कालाला सापेक्षतावादाने केव्हांच मूठमाती दिली आहे. प्रकाशवेगानिकटच्या वेगाने हालचाल करणाऱ्या वस्तूची लांबी स्थिर अवस्थेंतील वस्तूच्या मानाने वेग वाढताना त्या प्रमाणात कमी होते.

मेसॉनचे (अणुकेंद्राच्या विभाजनात उत्पन्न होणारे द्रव्य) आयुष्य फार कमी असते. पण त्याचा वेग जर वाढवला तर त्याची 'आयु–मर्यादा, वाढते. विज्ञानाची प्रत्येक सिद्धी दिक्कालाची वस्तुनिष्ठा आणि त्याचा भौतिकतेशी अभेद्य संबंधच दृढ करीत चालली आहे.

## भाबडेपणा आणि चातुर्य

फॅसिझमच्या कारवायांना बळी पडूं नये म्हणून स्वदेश त्याग करून अमेरिकेमध्ये जीवन कंठणे भाग पडलेल्या आइनस्टाईनसारख्या कनवाळू ज्यूने कधी कधी भावडेपणाचे किंवा व्यावहारिक चातुर्याचे उद्गार काढले असतील तर तत्वप्रतिपादनात त्याची विशेष किंमत नाही.

प्रसिद्ध फ्रेंच क्रांतिकारक विचारवंत व्होल्तेर तर बुद्धिप्रामाण्यवादीच होते. पण तेही भूदास शेतकऱ्यांकडून चापून काम करून घ्यावयाचे असल्यास ईश्वरकल्पनेइतकी दुसरी जादू नाही असे म्हणत असत व ईश्वरकल्पना मानीत असत. आणि रशियन शास्त्रज्ञ पावलोव तर चर्चमध्येही जात असत.

समाजजीवनांतील वैषम्य आणि नैघृण्य यामुळे निपजलेल्या वैयक्तिक भावडेपणाच्या किंवा व्यावहारिक चातुर्याच्या या गोष्टी असून सत्याकडे पोहोचण्याच्या वैज्ञानिक पद्धतीमध्ये त्या क्षुल्लक महत्वाच्या बाबी ठरतात.

## महान सांख्यसूत्र

सांख्य दर्शनाचे महामुनी कपील यांच्याविषयी 'सिद्धानां कपिले मुनिः' (गीता १०–२६) म्हणजे सिद्धांपैकी कपीलमुनी मी आहे असे खुद्द भगवंतानी म्हटले आहे. त्या कपीलमुनीच्या सांख्य सूत्रांपैकी ९२ वे सूत्र 'ईश्वरासिद्धे' आम्ही आमच्या लेखांत दिले होते. आचार्य धर्मकीर्ती तर त्याही पुढे जाऊन ईश्वराला सृष्टीचा कर्ता मानणे हे जड बुद्धीच्या पंच लक्षणांपैकी एक लक्षण मानतो (ध्वस्त प्रज्ञानां पंच लिंगानि जाडचे).

## फसवे निष्कर्ष

अनेक वैज्ञानिक जडबुद्धीला बळी पडलेले आढळतात. सर ऑलिव्हर लॉजची जी गत झाली तीच मायर्सची पण झाली. मिस्टर मायर्स हे एका मानस संशोधन मंडळाचे अध्यक्ष होते. ते मेल्यावर आपणास 'मायर्स' म्हणविणाऱ्या एका भूताकडून मिसेस व्हेराल, मिसेस हॉलंड, वगैरे बायांच्या द्वारे कांही लेख लिहिले जात होते. हे बिंग मग फुटले हे जगजाहीर

आहे. ( पहा– Spiritualism by Podmore, P. 200–346).

वैज्ञानिकांची त्यांच्या त्यांच्या क्षेत्राबाहेरील मते अवैज्ञानिक असूं शकतात, मूर्खपणाची असू शकतात, अंधश्रद्धाळूपणाची असूं शकतात, तशीच ती कळत न कळत वैयक्तिक किंवा वर्गीय आप्पलपोटेपणाचीही असू शकतात.

## सामाजिक हेतू

वैज्ञानिकांनाच कशाला, ही गोष्ट सर्वांनाच लागू आहे. सामाजिक तत्वज्ञानाचा इतिहास तर अनर्थकारक मतांनी भरलेला आहे. आजवरच्या तत्वज्ञानाचे सिंहावलोकन करताना प्रसिद्ध अमेरिकन तत्ववेत्ते जॉन ड्युई 'तत्वज्ञानाचा प्रारंभसुद्धा पूर्वग्रहरहित अशा परिस्थितीत झालेला नाही' असे सांगून पुढे म्हणतात, 'प्रतिस्पर्धी विचारवंतांमध्ये सत्याच्या स्वरुपा–विषयीं आजवर जो वाद चालू आहे त्यामध्ये सामाजिक हेतु आणि सामा–जिक आकांक्षांच्या संघर्षाचे चित्रच अधिक दिसते.' ( तत्वज्ञानाची पुनर–उभारणी. पृ. ४०–४४–४५.)

## बुद्धिनिष्ठाच सर्वश्रेष्ठ

अशा परिस्थितीत प्रत्येकाने आपआपल्या बुद्धीनेच खऱ्याखोट्याचा निवाडा करणे आवश्यक असते. आणि हे साधण्यासाठी आपली बुद्धी किती लायक आहे हेही बुद्धीनेच ठरवावे लागते. म्हणून शेवटी बुद्धिनिष्ठा हीच सर्वतोपरी ठरते. या बुद्धिप्रामाण्यावर घासूनच श्री. दत्ता बाळ यांनी उप–स्थित केलेल्या परामानसिक आणि त्यांच्या दृष्टीने अतीताच्या प्रांतांतील घटनांचे शास्त्रशुद्ध विश्लेषण आवश्यक आहे.

●●●

# पतीतांचीच अतीताकडे धांव !

बुद्धिनिष्ठा भारतांत आजची नाही. नवीन नाही. भारतीय समाजाच्या जातीय–वर्गीय स्वरुपामुळें अंधविश्वासाला नेहमीच राजाश्रय मिळाला आहे. व बुद्धिनिष्ठेला आतांपर्यंत चेपणाखालींच वावरावें लागले आहे.

तथापि बुद्धिनिष्ठेने या देशांत कधीच हार खाल्लेली नाही. बृहस्पती, लोकायत, चार्वाक, जैनबौद्धादि प्रमुख अवैदिक दर्शने सोडाच पण वैदिक षडदर्शनापैकीं जेमतेम एकदोन दर्शने सोडल्यास बाकी सारीं कमी अधिक प्रमाणांत निरीश्वरवादी आणि बुद्धिनिष्ठ दर्शनेच आहेत. तीच गोष्ट समाजनिष्ठेची.

## समाजनिष्ठा अटळ असते

प्राचीन भारतीय विचारांत तसेच अर्वाचीन भारतीय उज्जीवन आंदोलनात (Indian Renascence) समाजनिष्ठा पुरेपूर मानली गेली म्हणूनच भारत स्वतंत्र होऊन लोकशाही पर्यंत मजल मारुं शकला.

मध्ययुगीन भारतामध्यें वैष्णव साधुसंतांनी व दक्षिणेकडील अलवार आणि नयनमांर साधूनी सामाजिक समतेचा बावटा उभारुन जातीय विषमता दूर करण्याचा प्रयत्न केला. सामाजिक विषमतेची आणि जीवनातील नैघृण्याची उग्रता ईश्वरकल्पनेच्या कैफांत बुडवण्याचा अवास्तव मार्गच त्यानी-ही सांगीतला हें खरें असलें तरी त्यानी सुद्धां बुद्धिनिष्ठा आणि समाजनिष्ठा संपूर्णतया सोडलेली नव्हती.

## अकर्ता विधाता !

'नवसे कन्यापुत्र होती तरी का करणे लागे पती' असा रोखठोक सवाल तुकाराम करतात. तर 'पृथ्वीचा झाला गळाठा, एक लहान एक मोठा,

कोण खरा कोण खोटा, कोण जागे ; माणसा खावया धान्य नाही, अंथरुण तेंही नाही, घर कराया सामुग्री नाही काये करीती' एवढाच प्रश्न करुन समर्थ रामदास थांबत नाहीत. त्याहीपुढें जाऊन 'कार्यकारण कर्तृत्वे हेतुः प्रकृतीरुच्यते ।। छ ।। हे उघड बोलता नये । मोडों पहातों उपाये। येरवीं हें पाहतां काये । साच आहे' असें सांगतात,

म्हणजे 'कार्यकारणसंबंध' सारा प्रकृतीकडे आहे. हीच मूळमाया. मुख्य कर्तृत्व परमेश्वराकडे नाही. हें सांगीतल्यास अर्धवटाला साधनमार्ग निरर्थक वाटेल' (सूक्ष्म आशंकानाम समास तृतीय–श्रीदासबोध)

## दरिद्र नारायण

दत्ता बाळ योगी अरविंद, आल्फ्रेड व्हाइटहेड. जेम्स जीन्स आदींचा उल्लेख करतात. परंतु योगी अरविंद भारतीय उज्जीवन–आंदोलनाचे अध्वर्यु होते व त्यांची समाजनिष्ठा जाज्वल्य होती. मी एक व्यक्ती स्वर्ग चढावयास तयार नाही. मला ईश्वराचें अवतरण (Descent Of God) नको आहे. मला मानवतेचें उन्नयन (Ascent of God) हवें आहे असें अरविंद सांगतात.

विवेकानंदांनी शंकराचार्यांचे तत्वज्ञान स्वीकारले होते पण त्यामध्यें दरिद्र नारायणाच्या सेवेचा अंतर्भाव करून त्यांनी फार महत्वाची सुधारणा केली याची अरविंद आठवण करून देतात. इतकेंच नव्हे तर भारतीय स्वरूपाच्या साम्यवादाला आपला आक्षेप नाही असेंही ते सांगत असत.

## अरविंदांची व्याकुळता

अरविंदांची समाजनिष्ठा पाहून ज्याला ते 'पूर्णयोग' अथवा 'अतिमानसाचा विज्ञानयोग' म्हणत तो योग असफल ठरला या गोष्टीचें दुःख वाटत नाही. बारिद्राला लिहिलेल्या पत्रांत अरविंदांची समाजजीवनाबद्दलची आस्था, चिंता आणि व्याकुळता स्पष्ट होते. "दृश्य जगाचा या योगद्रष्टयांनी ईश्वराची ती लीला आहे, माया आहे असें म्हणून निकाल लावला. परि-

णामी भारतीय जीवनातील उत्साह व सामर्थ्य हीं विरुन गेलीं. भारताचा ऱ्हास झाला." ते पुढे म्हणतात "आपल्या स्वतःच्या प्रदेशांत बंगाली माणसाची काय स्थिती झाली ? खायला पुरेसें अन्न नाही व ल्यायला वस्त्र नाही. सारी संपत्ती, उद्योगधंदे, जमीन मिळकत इतकेंच काय शेतीची भूमीसुद्धा इतरांच्या घरांत जाऊन राहिली आहे.... ( महायोगी अरविंद, ले. रं. रा. दिवाकर पृ. १८४–१९८ )

## सदोष युक्तिवाद

आल्फ्रेड व्हाइटहेड हा गतिवादी गणितशास्त्रज्ञ आणि तत्त्ववेत्ता होता. निसर्ग हाच त्याचा ईश्वर. निसर्ग ही कोणी केलेली स्थिर वस्तु समजणे हा महामूर्खपणा आहे असें त्याने निक्षून सांगितलें. त्याचप्रमाणे धर्मप्रणीत ईश्वराची कल्पना अनिश्चित आणि तर्कविसंगत आहे असेंही त्याने म्हटले आहे. ( जीवन, विज्ञान, तत्वज्ञान पृ. १६१ )

व्हाइटहेडने ईश्वरापाशीं कसलीच शक्ती ठेवली नाही. जसा दत्ता बाळांचा ईश्वर क्रमविकासाला बांधलेला व म्हणून नियमानुसारी असावयाला हवा तसाच व्हाईटहेडचा ईश्वरही नियमानुसारी आणि नियमाच्या बाहेर निष्क्रीय आहे. परंतु या विचारवेत्त्यांचा हा असला आळशी, अकर्मी ईश्वर कोणाच्या काय कामाचा ? तो भजकांना आरोग्य, सुख, संपत्ती, धनदौलत कसा काय देणार ?

रोगराई आरोग्य शास्त्राच्या नियमानुसार होणार. सुसंतती सुप्रजाजनन शास्त्राच्या नियमाप्रमाणे निपजणार. धनदौलत राजकीय अर्थशास्त्रानुसार जमा होणार व सुखदुःखभोग प्रपंचाच्या नियमानुसार प्राप्य वा अप्राप्य. मग ईश्वरकल्पनेसारखी असिद्ध, अनिश्चित अजागलवत कल्पना मानाच कशाला ?

या प्रश्नाचे मार्मिक उत्तर दिवंगत तत्वचिंतक वामन मल्हार जोशी यांनी पुढील शब्दांत दिलेलें आहे. "खरी स्थिती अशी आहे की ईश्वर असावा असें आपणास वाटत असतें म्हणून ईश्वर आहे असें सिद्ध करून

दाखवणारे सदोष युक्तिवाद देखील बऱ्याच लोकांना पटतात." (नीतीशास्त्र प्रवेश पृ. ३८ )

## बादशहाचा पोपट

व्हाइटहेडसारख्या वस्तुनिष्ठ अध्यात्मवाद्यांनी ईश्वराची दशा बिलकुल बिरबलाच्या गोष्टींतील बादशहाच्या पोपटासारखी करून टाकली आहे. बादशहाचा पोपट सरळ मेला म्हणावयाची कोणाची छाती नव्हती. मग तो आडवा पडला जनाब ! तो काही खात पीत नाही जनाब ! पण तो मेला नाही जनाब ! अशा प्रकारचा मामला आहे हा सारा.

## श्रांताची साऊली

या प्रतारणेची कारणे तत्वज्ञानात शोधूनही सांपडावयाची नाहीत. या तत्वज्ञानातील उणीवा नव्हेत किंवा हे तार्किक अंतर्विरोधही नव्हेत. परंतु तत्वज्ञानात उमटणारे विषम समाजजीवनातले ते अंतर्विरोध आहेत. अंती लोकांचा ईश्वर म्हणजे तरी काय ? ईश्वर म्हणजे श्रांतांची सावली अनाथ–जीवाची माउली' (ज्ञानेश्वर) हेच खरें आहे. आणि जोवर समाजजीवन बदलून श्रांतांना विश्रांती व अनाथांना वास्तवांतला नाथ मिळणार नाहीं किंवा समाजजीवनाच्या यंत्रणेचें पुरेसें स्पष्ट ज्ञान होणार नाहीं तोवर जन–मानसांत ईश्वर आणि चमत्कार तग धरुन रहाणार हें निःसंशय आहे.

## ईश्वरावर व्यर्थ भडिमार !

केवळ ज्ञान विज्ञानाच्या प्रसाराने, तसेच केवळ परिस्थिती सुधारल्याने लोकभ्रम दूर होणार नाहींत. या दोन्ही गोष्टी ज्या वर्गरहित समाजरचनेमध्येच शक्य आहेत ती वर्गरहित अवस्थाच मानवजातीला लोकभ्रमातून मुक्त करू शकेल. म्हणून तोवर फुकट ईश्वरावर तोफा डागूं नका. पृथ्वीवरील विषमता आणि नैघृण्य नष्ट करावयाच्या कामाला लागा अशी रास्त शिकवणूक मार्क्सने दिली आहे.

ईश्वरकल्पनेच्या उगमस्थानाचा निर्देश करताना मार्क्स म्हणतो, "आजवरचें जग उलट्या दिशेने चाललेलें आहे. या उलट्या जगाची उलटी (खोटी) जाणीव म्हणजे धर्मप्रणीत ईश्वर ! अंतःकरणशून्य जगाचें तें अंतःकरण ! आत्मभ्रष्ट जगाचा तो आत्मा !" ( पहा. हेगेल भाष्य )

## विश्वनाशाची धास्ती !

जेम्स जीन्स या ज्योतिर्विद तत्ववेत्त्याने आपल्या दृष्टीने विज्ञानाशीं सुसंवादी असें बहुत अध्यात्म सांगितलें आहे. परंतु त्यानी प्रतिपादन केलेल्या प्रमुख उपपत्त्या खोट्या ठरल्या आहेत. सूर्यमालेच्या उद्‌भवासंबंधी त्यानी दिलेलें सूर्य आणि दुसऱ्या एका ताऱ्याचे संघर्षण हें कारण विज्ञान आतां मानीनासें झालें आहे. तसेंच तापक्षण सिद्धांतांतून विश्व तप्त होऊन तें नष्ट होण्याचा त्यांनी काढलेला निष्कर्षही ( Thermal death of universe ) विज्ञानाने आतां खोटा पाडला आहे.

## मी व विश्व मिळून शून्यच !

श्री. दत्ता बाळ 'मी व विश्व' असें प्रत्यही म्हणत असतात. व्यक्तीची कोणत्याही पातळीवरची समस्या त्याना एकदम विश्वमाया वाटते. पण समाज ना ? तो कःपदार्थ. पण विश्व धुंडण्याचे, जाणण्याचे व व्यक्तीच्या कामी लावण्याचे सामर्थ्य फक्त समाजातच असते हे ते विसरतात.

दहा हजार वर्षांपूर्वीच्या मानवाचे विश्व किती चिमुकलें होतें. त्याला पृथ्वी सपाट आणि चतुर्भुज वाटे. त्यावेळचा समाज फार मागासलेला होता. वर्तमान समाजाच्या विश्वसंचारी शक्तीमुळेंच आजच्या व्यक्तीचे विश्व व्यापक बनत चाललें आहे.

व्यक्तीला समाजाने जर विश्व उपलब्ध करुन दिले नाही किंवा विश्व व्यक्तीच्या जाणीवेच्या आणि व्यवहाराच्या कवेत आणून जर सोडलें नाही तर व्यक्तीचें विश्व म्हणजे वृथा पोकळ पोकळम. दत्ता बाळाचें समाज-

बाह्य विश्व ही केवळ हवा आहे. विश्वात जें तथ्य आहे तें समाज कर्तृत्वा-मुळेंच व्यक्तीला प्रतीत होते. समाजच अर्थ, तथ्य व मूल्यें निर्माण करतो. समाजबाह्य व्यक्ती तथ्यशून्य. केवळ व्यक्ती आणि विश्व ही अलग अलग घेतल्यास शून्यें आहेत. कारण समाज हाच तथ्य-विधाता, अर्थ-विधाता-मूल्य-विधाता आहे.

माणूस सामाजिक प्राणी आहे. अरस्तूने (Aristotle) माणसाची व्याख्याच मुळी राजकीय प्राणी (Homo Zoon Politicon) अशी केली आहे. व्यक्ती कितीही प्रज्ञा प्रतिभा संपन्न असो ती आहे समाजावलंबीच.

## गटे एक समुदाय !

विख्यात जर्मन महाकवी गटे आपल्या अभिजात प्रतिभेविषयी म्हणतो "अभिजात प्रतिभा, अभिजात प्रतिभा म्हणजे काय ? माझे ग्रंथ मूर्खा-पासून शहाण्यापर्यंत नानाविध लोकांच्या जीवनातून स्फुरलेले आहेत. या लोकांचे बाळपण, यौवन, वार्धक्य, त्यांच्या भावना, विचार, बुद्धि, आशा आकांक्षा, जीवन दृष्टि या सर्वांनी मला शिकवले आहे. इतरांनी जे पेरलें त्याचीच मी कापणी केली. माझे म्हणजे समुदायाचे कार्य होय. आणि या समुदायाचें नांव गटे" ( 'गटे आणि आधुनिक दृष्टिकोन' ले. हर्मान डंकेर पृ. २०७ )

## वॉल्ट व्हिटमनची दृष्टी

समाजात न रहाता जन्मापासून पशुसंगतीत राहिलेल्या रामू (Wolf Boy) व इतर मुलांची उदाहरणे आमच्या समोर आहेत. प्रथम पासून माणसांत न राहिल्यामुळें मग त्यांना माणसांत आणणे कठीण जाते.

व्यक्ती समाजाला जें देते त्या मोबदल्यांत समाज व्यक्तीला अर्थ, भाषा, तर्क, ज्ञानविज्ञान, संस्कृती, तत्वज्ञान व सर्वात महत्वाचें तें मनुष्यपण देतो. प्रख्यात अमेरिकन कवी वॉल्ट व्हिटमनचे शब्द किती सूचक आहेत पहा. "आम्ही भाषा म्हणतो. पण भाषा केवळ पंडितांच्या आणि भाषा-शास्त्रज्ञांच्या डोक्यातून निघते काय ? मानवजातीच्या असंख्य पिढ्यांच्या

परिश्रमातून, प्रश्नांतून, वासना विकारांतून, हर्षखेदांतून भाषा उमटते".

## निसर्ग एकजिनसी नव्हे

दत्ता बाळ निसर्गाने माणसाला विकासाचें बहुमोल स्वातंत्र्य दिलें आहे असें म्हणतात. पण निसर्ग एकजिनसी नव्हे तर विरोधजिनसी आहे हे ते विसरतात. निसर्गाने परस्परविरोधी प्रवृत्ती दिल्या आहेत. समाज-विकासाच्या अवस्थेनुसार विरोधी प्रवृत्तींचा ठराविक संवाद साधला जातो. वात्सल्य, कारुण्य जशा नैसर्गिक तसेंच अपत्यभक्षण आणि क्रौर्य हेंही नैसर्गिकच. मातृगमनापासून नानाविध संभोग लालसा आणि त्याचबरोबर चक्रवाक पक्षाची एकनिष्ठा पण नैसर्गिकच. एडिपस-इलेक्ट्रा आदि मनोगंडही ( Edipus Complex and Electra Complex ) नैसर्गिकच.

मोठ्या माशाने लहान माशाला खाणे व सशक्ताने दुर्बलाला मारणे हेंहि नैसर्गिकच. म्हणूनच आम्ही म्हणतो कीं निसर्ग मानवाला मूल्यें देऊं शकत नाही. त्याला ती मिळवावीं लागली आहेत. आणि आपल्या सामाजिक सहजीवनातून त्याने ती मिळवली आहेत. म्हणून नैसर्गिक (Natural) आणि बौद्धिक (Rational) यांचे स्थान, व्याप्ती व अन्योन्यसंबंध सूक्ष्मतेने जाणून घ्यावा लागतो. त्याचबरोबर नैसर्गिक हेंच बौद्धिकाचे मातृवत आहे हेंही विसरतां नये.

निसर्गमातेशीं बांधला गेलेला बेंबीचा संबंध तोडून टाकून मनुष्य-जीवनाला दीर्घकाळ लोटला आहे. आपला स्वतंत्र बौद्धिक सामाजिक प्रपंच थाटून तो केव्हांच मोकळा झाला आहे. अर्थात विकासक्रमाचाच तो एक परिणाम आहे. म्हणूनच मानव म्हणजे केवळ निसर्ग नव्हे. समाज हेंच मानवाचें निर्णायक महत्वाचें माध्यम आहे.

## विषम समाजरचना

वास्तविक व्यक्तिविकास आणि समाजविकास यामध्यें अंतर्विरोध का असावा ? ज्यात व्यक्तीचे हित त्यांतच समाजाचें हित. ज्यांत समाजाचे

हित त्यांतच व्यक्तीचें हित. पण आजच्या समाजांत तसे दिसते काय ?

मूठभर लोक जेव्हां शेष समाजाने उत्पन्न केलेल्या धन दौलतीवर आपला ताबा मिळवतात तेव्हांच मूठभरांचा अतिविकास आणि मूठभर सोडून राहिलेल्या व्यक्तींचा किमान विकास यामध्यें अंतर्विरोध निर्माण होतो व तो मगमग वैरात्मक स्परुपही धारण करू शकतो. अशा वेळी जळो तो मूठभरांचा अतिविकास असेच सच्च्या बुद्धिवंतालां वाटावयाला नको काय ?

## स्वातंत्र्य आणि मर्यादा

स्वातंत्र्य ? स्वातंत्र्य म्हणजे काय ? व ते कुणाला, कुणापासून, कशासाठी हे प्रश्न उद्‌भवतात. या प्रश्नांच्या संदर्भाबाहेर अमूर्त स्वातंत्र्य हा फक्त ध्वनी आहे. त्याला नेमका अर्थ नाही.

अब्राहम लिंकनने १८६४ मध्यें आपल्या बाल्तमोर येथील ऐतिहासिक भाषणाच्या प्रारंभीच स्वातंत्र्याची योग्य व्याख्या जगाने अजून केलेली नसून अमेरिकन लोकांना त्याची फार उणीव भासते असें म्हटलें होते.

स्वातंत्र्य हा व्यक्तिमर्यादा, सामाजिक परिसर व उत्पादन शक्तींच्या विकासाची अवस्था यांचा परिणाम असतो. केवळ व्यक्तीच्या इच्छाशक्तींची ती बाब नसते. व्यक्तींनी स्वतःवर घालून घेतलेल्या मर्यादांमुळेंच मानवी संस्कृती घडली आहे.

संघटित समाजामध्यें एका व्यक्तीचे कोणतेही वर्तन दुसऱ्या व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर गदा आणणारे असेल तर समाजाच्या प्रतिनिधीक संस्थेला त्यावर प्रतिबंध घालणे अगत्याचेंच असतें.

समाजांतर्गत व्यक्तीस्वातंत्र्याचे अधिकार हे मूल्यांधिष्ठित, मूल्यानुगामी आणि मूल्याना सार्थ करण्यासाठींच असतात. खरें स्वातंत्र्य म्हणजे अपरिहार्यतेपासून ( Necessety ) मुक्ती होय. ही मुक्ती ( Freedom from Necessity) ज्ञानविज्ञानयुक्त आणि शक्तीसंपन्न झालेला पूर्ण विक–

सित समाजच व्यक्तीला देऊं शकतो. निसर्गाच्या काबूतील जंगली अराजकी समाज व्यक्तीला मूल्यांधिष्ठित मुक्ती देण्यास असमर्थ असतो. त्याचबरोबर काही मूठभर व्यक्तींच्या अतिव्यक्तीवादी स्वातंत्र्यांना बळी पडलेला विज्ञान संपन्न आणि धनसंपन्न समाजही शेष समाजांतील व्यक्तींना खरें स्वातंत्र्य देऊ शकत नाही.

## अतीताचें व्यर्थ दास्य

पाश्चात्यांच्या अनुकरणातून आपल्याकडे आलेल्या लिंगवादी, अराजकी आणि अतिव्यक्तिवादी प्रवृत्तीपैकी अतिव्यक्तिवाद माणसाला अधिक दुबळा आणि पतीत बनवतो. अंतर्यामीच्या या दौर्बल्यामुळेंच अतिव्यक्तिवाद अतीताकडे धाव घेतो.

अतिव्यक्तिवादाने पोखरलेल्या पतीतांना अतीताच्या दास्याविना गत्यंतरच नसते, कारण अतिव्यक्तिवादामुळें मर्त्य व मर्यादित शक्तीच्या व्यक्तीने अमरत्वाचा आणि शक्तीचा सतत पुरवठा करणाऱ्या अमर समाजाशीं असलेला आपला मानसिक संबंध व आधारच तोडलेला असतो.

निसर्गाची गूढें उत्तरोत्तर उकलत जाऊन समाजाला नि व्यक्तीला शक्तीशाली बनवण्याच्या बाबतीत म्हणाल तर पतीतांच्या दास्यवृत्तीला अतीत कधीच दाद देत नाही. निसर्गाची आणि अतीताची कवाडे पतीतांसाठी कधींच उघडी नसतात.

दत्ताबाळ परामानसशास्त्राच्या गोष्टी बोलतात. मनाच्या काही अतिमानवी शक्ती असून त्या मानसशास्त्राच्या पलीकडे आहेत हा त्यांचा दावा आहे. ह्या विषयीं विख्यात फ्रेंच प्रायोगिक परामानसशास्त्रज्ञ रेने सूद्र ह्यांचें मत काय आहे पहा. "मनाच्या काही अतिमानवी शक्ती आहेत व त्या बुद्धीच्या पलीकडे असून आत्म्याचें अमरत्व सिद्ध करतात हें मत पूर्वग्रहदोषामुळें निर्माण झालेले आहे.... सारें मानसशास्त्रीय संशोधन ह्या पूर्वग्रहदोषामुळें दूषित झालेले आहे" हाच लेखक पुढे म्हणतो "विज्ञानाला धार्मिकतेच्या कोंडवाड्यांत फुलवण्याकरता... या लोकांचा विक्षिप्तपणा कुठल्याही थराला पोहोचू शकतो" (पहा–त्रेते द पारासिको ग़ोजी. ले. रेने सूद्र पृ. ४००)

●●●

# ईशावास्योपनिषदाचा अर्थ : खरा आणि खोटा

प्ताह होतेपचे अंशमात्र उपलब्ध असलेले ग्रंथ सोडून दिले तर उप-निषदे हेच मानववंशाचे प्राचीनतम आणि सखोल विचारांचे ग्रंथ मानावे लागतील.

उपनिषदें ही वेदानंतर झाली. वेदांमध्यें आलेल्या तत्कालीन जीव-नाच्या माहितीवरुन वैदिक आर्यांनी आपल्या विचाराला मुळापासून आरंभ केलेला दिसतो. सिंधु संस्कृतीपासून किंवा ज्या ठिकाणापासून आर्य सप्त-सिंधु प्रदेशांत आले त्या ठिकाणच्या संस्कृतीचा विशेष वारसा त्याना मिळा-लेला दिसत नाही.

## किरकोळ प्रार्थनामंत्र

ईश्वराच्या अस्तित्वाविषयी संशय व्यक्त करणारे 'नासदीय सूक्त' आणि 'अस्यवामीय सूक्त' जमेला धरूनही ऋग्वेदातील प्रार्थना-मंत्र वैचा-रिक दृष्टया अगदीच किरकोळ म्हटले पाहिजेत.

सोम कसा तयार करावा, सोमविद्येतील ब्राह्मणांचे स्थान, सोम कोणत्या विशिष्ट भांड्यांतून प्यावा आणि उन्मत्तावस्थेत गावे, नाचावें, प्यावें, मारामारी करावी इत्यादी वर्णनावरून ऋग्वेदाला सोमवेद म्हणणे अधिक सयुक्तिक ठरले असते.

सामवेद हा तर गानवेद आहे. शुक्ल यजुर्वेद बोलून चालून कर्म-कांडाचा वेद. बुद्धकाळापर्यंत वेद तीनच होते. चौथा आणि नंतरचा वेद जो अथर्ववेद तो म्हणजे खिचडी वेद. मुले होण्यासाठी, गर्भपात टाळण्या-साठी, शत्रूचें निर्दालन करण्यासाठीं मंत्रपठन आणि जादूटोणा त्यात आहे. (पहा अथर्ववेद ६.१३८ आणि ७.३५,९०) महापंडित राहुल सांकृत्यायनने या वेदाला जारण-मारण-मोहनाचा वेद म्हटले आहे.

## भोंगळ कल्पना

वेदकालीन जीवन सामुदायिक पद्धतीचे मुक्त जीवन होतें. ते प्राणमय आणि प्रतिभा-उन्मेषाने ओतप्रोत भरलेले होतें. वर्णव्यवस्था निर्माण होण्याआधीची जनव्यवस्था त्यावेळी अस्तित्वांत होती. पुरुषसूक्तांत आलेला चार वर्गांचा उल्लेख अपवादभूत असून पुरुषसूक्त ऋग्वेदामध्यें नंतरच्या ब्राह्मण वर्चस्वाच्या काळांत घुसडले गेले असावे.

आर्य जनतेंतून म्हणजे 'विशां'तून प्रथम ब्राह्मण वर्ग वेगळा झाला आणि आर्यांमध्यें दोन वर्ग (वर्ण) 'ब्राह्म' आणि 'क्षत्र' निर्माण झाले. वर्ण म्हणजे वर्ग हें उघड आहे. वर्ग म्हणजे रंग ही कल्पना भोंगळ आहे. कारण आरंभी तरी सर्व आर्यांचा रंग एकच होता. (पहा. Hindu Society-an Interpretation ले. इरावती कर्वे पृ. ५१)

आर्य वैश्य हा तिसरा वर्ग उशिरा निर्माण झाला. काही लोकांच्या मताप्रमाणे 'विश'-वैश्य म्हणजे सर्वांआधीचा एकवर्ण असून तो सर्वांचा आधार होता (पहा. 'समाज विज्ञान, सिद्धांत और प्रयोग' ले. राजाराम शास्त्री पृ. २९२)

शूद्र हा प्रथम अनार्यवाची शब्द होता. ऋग्वेदांत तो शब्द फक्त पुरुषसूक्तात येतो व पुरुषसूक्त मागाहून घुसडले गेलें हे निःसंशय आहे. खूपच उशीरा 'शूद्र' म्हणजे चौथ्या दर्जाचा वर्ण असे ठरवले गेले. देशाच्या कांही भागांत 'पंचम वर्ण' व 'अंत्यज' असे दर्जेही ठरवले गेले व अशा रीतीने भारतीय समाजाची उंचनीच कल्पनानी भरलेली शिडी तयार झाली.

परंतु भारतीय समाजांतर्गत बहुसंख्य जनता या वर्णव्यवस्थेंत कधी सामावलेलीच नाही. वर्णव्यवस्थेच्या विचाराइतकी संकुचित विचारप्रणाली मानवी समाजाने क्वचितच जन्माला घातली असेल.

## महत्वाचा फरक

वेद आणि उपनिषदें यामधील एक महत्वाचा फरक म्हणजे उपनिषद-कालीन समाजजीवनातून उदभवलेली पुनर्जन्माची आणि तसेच वैराग्याची कल्पना वेदांत आढळत नाही. पुनर्जन्म, वैराग्य, प्राक्तनवाद, अवतार-वाद आदि कल्पनांचा प्रभाव उपनिषदकालाच्या अखेरीस वाढत गेला. स्मृति-काल हा ह्या कल्पनांच्या विस्ताराचा काळ मानावा लागेल. भगवद्गीता सर्व स्मृतींची महाराणी असल्यामुळे भगवदगीतेत वरील कल्पनांचा सुकाळ असल्यास नवल नाही !

कांही लोकांच्या मतानुसार ऋग्वेदांतील अस्यवामीय सूक्तांतील 'द्वा सुपर्णा' या ऋचेमध्यें पुनर्जन्मविषयक तत्वज्ञान आलेले आहे. पण ती गोष्ट खरी नव्हे. पुनर्जन्माची कल्पना छांदोग्य उपनिषदांतच प्रथम आली आहे. 'द्वा सुपर्णा सयुजा सखाया' हा मंत्र मुंडक उपनिषदामध्यें असून त्याचा अर्थ वेगळा आहे.

उपनिषदांमध्ये सुद्धा मंत्रतंत्रवादी विचार घुसलेले आहेतच. बृहदारण्यक उपनिषदामध्यें मंत्र म्हणून स्त्रीवर बलात्कार करण्याची व संभोग करूनही गर्भधारणा होऊ न देण्याची रीत सांगीतली आहे. ( पहा. बृहदारण्यक उपनिषद ६१·२ )

## कवने का तयार झाली ?

ऋग्वेदातील कवने यज्ञसंस्थेच्या व्यवहारासाठीं तयार झाली. यज्ञ-प्रक्रिया डोळयांसमोर ठेऊनच पाराशर्य व्यासांनी वेदविभाजन केलें आहे. 'वेदाहि यज्ञार्थमभिप्रवृत्ता' सायण भाष्यांतील अर्थही यज्ञीय प्रक्रियानुगामीच आहे.

प्रथम यज्ञ ही आर्यांच्या सामूहिक उत्पादनाची वास्तव क्रिया व जीवनपद्धती होती. नंतरच्या काळांत यज्ञ हें आर्यांच्या भूतकाळाच्या उत्पादनक्रियेचें व जीवनपद्धतीचें प्रतिबिंबात्मक धार्मिक कार्य ठरलें. गोपालन, कृषि, मृगया, वसाहतीकरणाचा संघर्ष या गोष्टी त्यावेळीं सामूहिक किंवा कबिला पद्धतीने चालत.

परंतु वेदांतील अग्नी, इंद्र, वरुण, विष्णु आदि साध्या देवतांवरचा विश्वास जेव्हां पुढच्या लोकांच्या विकसित बुद्धीचें समाधान करीनासा झाला तेव्हा त्यानी काही मार्मिक प्रश्न विचारण्यास सुरवात केली. अशा तऱ्हेचा पहिला संशयी प्रश्न ऋग्वेदांतील नासदीय सूत्रांत विचारला गेला. 'जगाचा पसारा कशापासून झाला हें खरे कोण सांगेल ? निश्चयात्मक कोण जाणतो ? कोणी नाहीं'. असे अनेक संशयी प्रश्न उपस्थित करण्याचा काळ म्हणजे उपनिषदांचा काळ होय.

उपनिषद काळामध्यें दुसरी एक फार महत्वाची गोष्ट घडून आली होती. ती म्हणजे कृषिउत्पादनाच्या विकासातून कारागीर वर्गांच्या निर्मिती-बरोबरच ग्रामनायकांचा वर्गही उदयाला आलेला होता. म्हणजे समाज-रचनेचे सामुदायिक स्वरूप (कबिलेशाही) जाऊन नायकशाही उद्भलेली होती.

## कबिलेपद्धती नष्ट झाली

राज्यें, वैराज्यें, साम्राज्यें, जनपदें, महाजनपदें इतकेंच कशाला वि-राट (राजा नसलेलीं) जनराज्यें व अराज्येसुद्धा नव्या नायकशाहीवरच

आधारलेली होतीं. यादवांमधले 'वीतिहोत्र' किंवा 'वैत्रहव्य' हें प्रसिद्ध अराजक सुद्धा नायक संघटनेवरच आधारलेलें होते. ह्या काळांत आणि पुढेंही नायक संघटनेचे विविध प्रकार विकसलेले दिसले तरी समाजरचनेची कबीले पद्धती एकदा नष्ट झ.ली ती कायमचीच.

भारतीय समाजक्रांतीचा तो एक विशिष्ट टप्पा होता. एक नवा वर्ग नायक वर्ग (राजन्य किंवा क्षत्रीय) उदयाला आलेला होता. ह्या वर्गाचा प्रभाव उपनिषदांमध्यें जाणवतो. जैन आणि बौद्ध विचारामध्यें तर क्षत्रीय पहिल्या दर्जाचा वर्ण म्हणून पुढे येतो; पण ह्या वर्गाबरोबरच कारागीर वर्गांचा आणि वैश्यांचा प्रभावही वाढलेला दिसतो.

ब्राह्मण वर्गाला आपले वर्गप्रभुत्व कायम टिकवण्यासाठीं वेदप्रामाण्याचा आधार नेहमीच घ्यावा लागलेला आहे व वेदप्रामाण्य वज्रलेप करण्यासाठींच त्याना बहुसंख्य जनतेला वेदांपासून दूर ठेवावे लागलें आहे. कारण जनतेची वेदांशीं सलगी झाली की वेदप्रामाण्य टिकणार कसें ?

उपनिषदकालापर्यंत यज्ञसंस्था व कर्मकांड मागें पडून ज्ञानकांड पुढें आलें होतें. (पहा. मुंडकोपनिषद) आणि खुद्द ब्राह्मणवर्गामध्येंच कर्मकांडाचे विरोधक पैदा झाले होते. हे विरोधक कर्मकांडीय 'कर्मा'ला अज्ञानमूलक कर्म किंवा 'अविद्या' मानून केवळ जाणण्याला 'विद्या' मानीत होते. यावरूनच कर्मकांडाच्या मीमांसेला 'कर्ममीमांसा' आणि जाणण्याच्या मीमांसेला 'ब्रह्ममीमांसा' असे शब्द रुढ झाले.

## वेदांतलें ब्रह्म

वेदांतील 'ब्रह्म' हे क्रिया करणारे पुल्लींगी कर्तें 'ब्रह्म' होतें. तर उपनिषदांतील 'ब्रह्म' हें केवळ चिंतनात्मक नपुंसकलिंगी अकर्तें ब्रह्म बनलें.

विचारांत हा एवढा बदल घडून येण्याचें मुख्य कारण म्हणजे समाजात नव्याने पुढे आलेला राजन्य वर्ग हा हळूहळू विलासी आणि उत्पादनकार्यात निरुपयोगी बनत चाललेला होता हें होय.

समाजात एका बाजूला राजेशाहीचे वैभव आणि दुसऱ्या बाजूला जनतेचे अठरा विश्वे दारिद्र्य अशा परिस्थितीतील नायकवर्गाला व समाजाला केवळ चिंतनात्मक 'ब्रह्मा'ची गरज भासणे साहजिक होतें.

अशा करुण परिस्थितीची एक प्रतिक्रिया म्हणून बुद्धाचा दुःखवाद–नीतीवाद पुढे आला होता. पण समाजरचनेतील बळकट नायकशाहीपुढे तो फार काळ टिकू शकला नाही.

वस्तुस्थिती अशी आहे की प्रारंभी सुद्धा बुद्धाचा प्रभाव नायकशाहीला वाकवूं शकला नव्हता. मालकांच्या परवानगीशिवाय गुलामांना बुद्धसंघांत प्रवेश मिळत नसे. बुद्धाला सुद्धा गुलामांच्या मालकांचा धाक बाजूला सारतां आला नाही यावरून विशिष्ट समाजरचनेच्या विशिष्ट काळातील मजबूतीचे महत्व स्पष्ट होते. नायकशाहीला बगल देऊनच बुद्धाचें धर्मचक्रप्रवर्तन विस्तारलें होतें.

बुद्धाच्या क्रांतींत आर्थिक क्रांतीचे तत्व अनुस्यूतच नव्हतें व त्याचें मुख्य कारण म्हणजे उत्पादन शक्तींचा विकासच त्याला अनुकूल नव्हता. म्हणजे काळाच्या उदरांत वास्तविक क्रांती पैदा झालेली नव्हती. यंत्रनिर्मितीनंतरच ही अवस्था येणार होती.

## आड आणि विहीर

ईशावास्योपनिषदाच्या वेळी 'विद्या' आणि 'अविद्या' 'व्यक्त' आणि 'अव्यक्त' त्याग आणि भोग 'कर्म' आणि कर्मफळाचें बंधन अशा इकडे आड आणि तिकडे विहीर असलेल्या बौद्धिक द्वंद्वाच्या कचाट्यांत ब्राह्मण परंपरेतील भारतीय चिंतन सांपडले होते. या काल्पनिक बौद्धिक पेंचांतून तत्कालीन भारतीय चिंतनाची सोडवणूक करण्याचा एक प्रयत्न ईशावास्योपनिषदांत दिससो. ईश्वरवादाच्या चौकटीतच ईशोपनिषदकाराने हा प्रयत्न केलेला आहे हे विसरता नये.

पहिला मंत्र 'ईशावास्यमिदं सर्वं' ईश्वराच्या मालकी विषयीचा

हवाला देणारा आहे. या मंत्राविषयी गांधीजी म्हणतात 'सांप्रत मी अशा निष्कर्षाप्रत पोहोचलो आहे की यदाकदाचित सर्व उपनिषदे आणि इतर धर्म ग्रंथ भस्मीभूत होऊन जर का ईशोपनिषदाचा हा पहिला मंत्र हिंदूंच्या स्मरणात राहिला तर तेवढयावरही हिंदुधर्म अजरामर राहू शकेल. ('हरिजन,' ३० जानेवारी १९३७)

या संदर्भात ही गोष्ट लक्षात ठेवणे आवश्यक आहे कीं गांधीजींच्या नंतरच्या लिखाणातील हिंदुधर्मविषयक आणि विशेषतः चातुर्वण्यविषयक उल्लेख जेवढे धर्मनिरपेक्षतेच्या तत्वाला पोषक वाटतात तेवढे त्यांच्या प्रारंभी प्रारंभीच्या लिखाणातील उल्लेख वाटत नाहीत.

ईशावास्योपनिषदाच्या दुसऱ्या मंत्रामध्ये कर्मे सतत करून शतायुषी व्हा; कर्मबंधनाची नसती काळजी करू नका असे स्पष्ट सांगितले आहे.

तिसऱ्या मंत्रामध्ये अनार्य लोक अंधारांतच खितपत पडतील अशी अनार्यनिंदा असून मग चौथ्या, पांचव्या, सहाव्या, सातव्या व आठव्या मंत्रांत आत्मवादी चिंतन सांगितले आहे.

नवव्या मंत्रामध्यें यज्ञ-कर्मात (अविद्येंत) जे गुंतून पडतात ते गाढ अंधारांत वावरतात आणि पुस्तकी पोपटपंचीचे (विद्येचे) उपासक त्याहून गाढ अंधारांत वारतात असें सांगितले आहे.

ईशउपनिषदकाराला कर्मकांड आणि ज्ञानकांड हे दोन्ही मार्ग मान्य नसून शहाण्यांनी या दोन्ही पर्यायांपलिकडे जाऊन कर्मे करावीत अशीच या उपनिषदाची शिकवणूक होती. (पहा. मंत्र अकरा)

## सोन्याचें झाकण

तीच गोष्ट व्यक्त आणि अव्यक्ताच्या उपासनेची. ईशाच्या मते दोन्ही त्याज्य. भोग आणि त्यागाविषयी ईशाची शिकवणूक दोन्ही स्वीकारा अशी आहे.

सत्यान्वेषण हेंच माणसाचें कर्तव्य असलें तरी सत्य हें सोन्याच्या नाण्यांखाली झाकलेले असल्यामुळे हे देवा, हे सोन्याचे झांकण दूर कर अशी प्रार्थना हें उपनिषद करते. हिरण्मयेन पात्रेण सत्यस्यापिहितं मुखं (मंत्र १५) समाजांतील सत्याविषयीचें महातत्वच हें उपनिषपद बोलून गेले आहे.

## सरळ नि साधा अर्थ

या उपनिषदाचा इतका सरळ अर्थ असून सुद्धा अजूनपर्यंत एकाच्याही हाती तो धड का लागू नये याचे सखेदाश्चर्य वाटते; पण विचाराअंती त्यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाहीं.

कारण जुन्या चाकोरीतच अर्थ चपखल बसले पाहिजेत अशी बुद्धीची शब्दप्रामाण्यवादी ठेवण एकदा बनली की शब्दांचाही नीट बोध होईनासा होतो. सरळ रेषाही वाकडी दिसायला लागते. तीच गत उपनिषदांचा अर्थ लावणाऱ्यांची झाली आहे. कोणत्याही शिकवणुकीवाबतींत स्थल, काल आणि परिस्थिती या त्रयीकडे न पहाता फक्त प्रस्थानत्रयीकडे ( उपनिषदे, भगवद्गीता, ब्रह्मसूत्रे ) पाहून अर्थ लावण्याचा जो महादोष आमच्या भाष्यकारांमध्यें शिरला तोच भारतीय प्रतिभेच्या मार्गातील मोठी घोंड ठरली आहे.

'सूर्यसिद्धांता'चा कर्ता दिनकर याला वराहमिहिर यानी 'दिनकर मुनिंद्र' म्हणून प्रणाम केला परंतु पुढे त्यालाच सूर्याचा अवतार मानल्यामुळे त्याने सांगितलेल्या गणितात सुधारणा कोणी करायची ? ही झाली विज्ञानाची गोष्ट.

जी गोष्ट विज्ञानाची तीच इतिहासाची. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे लिहितात, "पाणिनी, यास्क, कात्यायन पतंजलि, व्यास व वाल्मिकी याना वृत्र, शुष्ण, इला, सूर्य असुर्य इत्यादी शब्द देशनामे आहेत ही जाणीव बिलकूल राहिली नाही. गंगायमुनेचे पाणी पिणाऱ्या यास्क-

पाणिनीच्यामध्ये आणि कश्यप प्रदेशात ( कॅस्पियन समुद्र प्रदेशात ) रहाणाऱ्या देव व ऋषी यांच्यामध्ये किती सहस्त्र वर्षे लोटून गेली होती त्याची साक्ष ही भयंकर विस्मृती देते. कंबोजाल्लुक सूत्र रचताना पाणिनीला व 'कंबोजादिभ्य इति वक्तव्यम' हे वार्तिक रचताना कात्यायनाला वृत्र शब्द देशवाचक, लोकवाचक असा ऋग्वेदात येतो या बाबीचे स्वप्नही नव्हते. सायणाची तर गोष्टच नको ! ( पहा– भारतीय इतिहासाची मूलतत्वे ले. वि. का. राजवाडे. )

## विचारवंतांमधील तीव्र मतभेद

ईशावास्योपनिषदाच्या खऱ्या अर्थाबाबत शंकराचार्यापासून तो लोकमान्य टिळकापर्यंत व नंतरच्या विचारवंतांमध्येही तीव्र मतभेद आहेत. लो. टिळक लिहितात, 'ईशाच्या अकराव्या मंत्रावर व्याख्यान करताना शंकरभाष्यांत ' विद्या ' शब्दाचा अर्थ ज्ञान असा न करिता उपासना असा केलेला आहे. विद्या या शब्दाचा अर्थ उपासना होत नाही असे नाही. शांडिल्य विद्या वगैरे ठिकाणी त्याचा उपासना हाच अर्थ विवक्षित आहे. पण तो मुख्यार्थ नव्हे.... शंकर सांप्रदायाच्या मुख्य सिद्धांताविरुद्ध हा मंत्र जाऊ नये एतदर्थ विद्या शब्दाचा गौणार्थ स्वीकारून सर्व श्रुतिवचनांची आपल्या संप्रदायानुरूप एकवाक्यता करण्यासाठी शांकर भाष्यात अकराव्या मंत्राचा वर लिहिलेल्याप्रमाणे अर्थ केला आहे हे उघड होते. ( गीतारहस्य पृ. ३३३–३३४).

उवटाचार्यांनीही 'अविद्या', 'विद्या' यांचे अर्थ कर्म आणि ज्ञान असेच घेतले आहेत. उपनिषदांचे प्रसिद्ध अर्थविवेचक डॉ. के. ल. दफ्तरी म्हणतात, "श्रीशंकराचार्यांनी हा जो विशिष्ट अर्थ घेतला तो संन्यास–प्रतिपादक 'जाबालोपनिषदाशी' समन्वय करण्याकरिता घेतला हे उघड आहे. (पहा– 'औपनिषदिक जीवन सौख्य,' ले. डॉ. के. ल. दफ्तरी, पृ. ९१)

भय्यासाहेब पंतांनी या उपनिषदातील विद्या–अविद्या शब्दाचा अर्थ अगदीच वेगळा केला आहे. ब्रह्मक्षत्र संघर्षांचा ऐतिहासिक आधारही त्याला

आहे. त्यांच्या मते 'अविद्या' म्हणजे क्षत्रियांची शस्त्रास्त्र किंवा राजकारण विद्या आणि 'विद्या' म्हणजे ब्राह्मणांची पुस्तकी विद्या. (पहा– ईशावास्योपनिषत मराठी श्लोकांसह पृ. १०)

वाजसेनीय संहितेत शतपथ ब्राह्मण हा भाग आहे. शतपथ ब्राह्मणाच्या आरण्यकात बृहदारण्यकोपनिषद आलेले असून त्यातसुद्धा नुसत्या विद्येत म्हणजे ब्रह्मज्ञानात गढून जाणारे पुरुष जास्त अंधारात वावरतात असे म्हटलेले आहे. (पहा बृ. अध्याय ४ ब्राह्मण ४–१०)

●●●

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
[illegible]
[illegible]

# सिद्धार्थाचा बुद्धिवाद आणि नीतीवाद

तब्बल अडीच हजार वर्षांपूर्वी म्हणजे ख्रिस्ती आणि इस्लाम हे दोन प्रमुख धर्म अस्तित्वात येण्यापूर्णी सिद्धार्थ गौतम बुद्धाने या जगामध्ये संपूर्णतया नवीन असे धर्मचक्र प्रवर्तन घडवून आणले.

हे धर्मचक्रप्रवर्तन एवढे व्यापक आणि सर्वसमावेशक होते की भारताचा आसमंत बुद्धाच्या धर्मघोषाने दुमदुमून गेला. हां हां म्हणता दाही दिशा त्याने व्यापून टाकल्या. नेपाळ, तिबेट, ब्रह्मदेश, सिलोन, सयाम, व्हिएत-नाम, लाओस, कंबोडिया, थायलंड, कोरिया, मंगोलिया, जपान, इंडोनेशिया, चीन त्याचप्रमाणे इराण, अफगाणीस्तान आणि रशिया धरुन मध्यआशियात व इतरत्रही बुद्धाच्या विजयपताका पोहोचल्या.

तथापि बुद्धाचे धर्मविषयक विचारपरिवर्तन एवढे मूलगामी आहे कीं बुद्धविचाराला धर्म म्हणावे की नाही हा वाद जगामध्ये अजूनही चालूच आहे. कारण बुद्धांच्या काळीच नव्हे तर आजही धर्म म्हटला म्हणजे

त्यामध्ये परमेश्वर, आत्मा, परमात्मा. परलोक, पाप-पुण्य, स्वर्ग, नरक इत्यादि कल्पना असल्याच पाहिजेत अशी समजूत प्रचलित आहे.

कांहींच्या मते तर मी कोठून आलो ? या जगताचे आदिकारण काय ? या पसाऱ्याचा कर्ता कोण ? आदि प्रश्नांचा आणि उत्तरांचा खल ज्यात नाही तो धर्मच होऊं शकत नाही. परंतु बुद्धाने ह्या व असल्या प्रश्नांना व तदनुसारी उत्तरांना आपल्या विचारप्रणालीतून अजिबात फाटा दिला. ह्या प्रश्नोत्तरांना त्याने अकथनीय, अव्याकृत संबोधून त्याज्य ठरवले.

बुद्धाच्या मते मी गतयुगांत होतो काय ? मी गतयुगात नव्हतो काय ? तसेच मी काय होतो ? मी काय नव्हतो ? मी भविष्य काळांत नसेन काय ? मी कोठुन आलो ? आज मी आहे काय ? आज मी नाही काय ? आदि प्रश्न विकृत बुद्धीचे लोकच विचारु शकतात. आणिं तसल्या कृत्रिम प्रश्नांच्या उत्तरांवर आधारलेला धर्म धर्मच नसून अधर्म आहे असे बुद्धाने स्पष्ट सांगितले आहे व भलत्याच अनुमानांचा माणसामाणसाच्या संबंधांत उपयोग काय असें प्रतिपादन करुन कांहीच नाही असे साफ उत्तरही बुद्धाने दिलें आहे.

अनाथपिंडिकाला धम्मदिक्षा देतांना बुद्ध म्हणाले "आपण ईश्वर-पूजेच्या आणि त्याच्या प्रार्थनेच्या थोतांडाचा त्याग करुया. ज्याच्यापासून काहीही फायदा नाही अशा गूढ गोष्टीविषयी निष्फळ कल्पना करीत बसून आपण स्वतःचेच नुकसान करुन घेऊ नये. आत्मा आणि स्वार्थीपणा यांचा आपण त्याग करू या आणि कुशल कर्म करु या, म्हणजे त्याचे फलही आपणास चांगले मिळेल." ( पहा 'भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म, ले. डॉ. आंबेडकर पृ. १२२ )

या बुद्धप्रणित कर्मकौशल्याच्या संदर्भात 'योगःकर्मसु कौशलम' हा गीतोपदेश कुणाला आठवला तरी भगवद्गीतेची भूमिका मूलतः वेगळी आहे. आपणाला पापपुण्य लागू नये म्हणून कुशल कर्मे करा असे गीता सांगते.

खास ईश्वर शब्दाचा उल्लेख अंगुत्तर निकायाच्या तिकनिपातांत आणि मज्झिम निकायांतील देवदह सुत्तांत आला आहे. बुद्ध म्हणतो ,' भिक्षुहो, कांही सुखदुःख किंवा उपेक्षा मनुष्यप्राणी भोगतो ते सर्व ईश्वर निर्मित आहे (इस्सर निम्मान हेतु) असें प्रतिपादणाऱ्याना मी विचारतो की तुम्ही प्राणघातकी, चोर, चहाडखोर, दुसऱ्याचे धन लुवाडणारे, द्वेष्टे आणि मिथ्या दृष्टीचे लोक ईश्वराने निर्मिल्यामुळेच झाला की, काय ? भिक्षुहो, हे सर्व ईश्वराने निर्माण केले असे सत्य मानले तर सत्कर्माविषयी छंद आणि उत्साह रहणार नाही. अमुक करावे किंवा अमुक करु नये हे देखील समजणार नाही'' (पहा 'भगवान बुद्ध' ले. धर्मानंद कोसंबी पृ. १८५).

ईश्वर आणि आत्म्याच्या विश्वासावर बुद्धाने आघात केला. त्याचें आणखी एक कारण म्हणजे ईश्वराच्या व आत्म्याच्या अस्तित्वावरील विश्वास सम्यक दृष्टीला (सम्मादिठ्टीला) बाधक असतो हे होय. म्हणजे यामुळे भ्रामक समजुती फैलावतात आणि पुरोहित वर्ग निर्माण होतो. व या वर्गाला प्रत्येक माणसावर त्याच्या जन्मापासून तो मृत्यूपर्यंत सत्ता गाजविण्याचा अधिकार प्राप्त होतो. परिणामीं पुरोहितांचा आणि सामान्य-जनांचाहि अधःपात होतो.

मूर्ख, ढोंगी आणि धंदेवाल्या पुरोहित लोकांशी बोलतांना उपरोल्लेखित मुद्दे उपस्थित करुन बुद्ध आत्मा आणि ईश्वराची कल्पना उडवून लावीत असत, परंतु उच्च पातळीवरील प्रज्ञायुक्त चितनासाठी कार्यकारणभावाचा सिद्धांत ते पुढे करीत. तत्वज्ञानाच्या इतिहासात 'प्रतीत्य समुत्पाद' या नावांने तो सिद्धांत ओळखला जातो. 'अस्मिन सति इदं भवति' अमुक झाले की अमुक होते अमुकातून अमुक. एकाच्या जाण्यातून दुसऱ्याचे येणे. एकाच्या विनाशातून दुसऱ्याचा विकास–दुसऱ्याची उत्पत्ति.

सर्व वस्तुमात्र प्रतीत्य समुत्पन्न असून त्यामधील आत्मवृत्त अनित्य आहे. अशाश्वत आहे. म्हणजे अविनाशित्वाच्या संदर्भात तें शून्य, क्षणिक आहे अशा प्रकारचा अस्तित्व विचार बुद्धाने प्रतिपादिला. अर्थात बुद्धाचा

दा. क्र. १६०६५

प्रतीत्य समुत्पन्नवाद म्हणजे अनस्तिवाद किंवा नास्तिवाद मात्र नव्हे. तसेंच पुरण कश्यपाचा अक्रियवाद, मक्खलि गोशालाचा नियतीवाद, अजित केशकंबलाचा उच्छेदवाद, पकुध कच्चायनाचा अन्योन्यवाद, वेलट्ठ पुत्तचा विक्षेपवाद निगंठ नापुत्त किंवा महाविराचा चातुर्याम संवरवाद यामध्ये खूपच अंतर आहे.

बुद्धाच्या काळांतील सामाजिक संघर्ष फार जबर होता. एका बाजूला आदिम साम्यवादाच्या स्मृति जनमानसांत अजूनही ताज्या होत्या. एकत्र बसूं या. एकत्र जेवूं या खाऊं या. एकत्र काम करु या. एकत्र गाऊं या. नाचूं या. सर्वच सुखी होऊं या. ( ॐ सहनाववतु, सहनौभुनक्तू. सर्वेसन्तु निरामयः ) वगैरे समुदायवादी आदर्श तर दुसऱ्या बाजूला गुलामांच्या आर्त वेदना आणि गणराज्याना बसणारे जबरदस्त हादरे यांमुळे भयानक असंतोष धुमसत होता. कुठें कुठें सामंतशाहीच्या उदयाबरोबर जनपदांचा नाश आणि साम्राज्यांचा उदयही दिसत होता. दारुण शोषण, निघृण युद्धें आणि खूनखराबी नित्याच्याच बाबी होत्या.

व्यापारी वर्गाच्या वाढत्या धनराशीबरोबर भोगविलासांची कमान चढती होती. वेदप्रामाण्य, वर्णवाद, पुरोहितवाद, सत्तावाद, भोगवाद आणि यज्ञहिंसेबरोबरच युद्धहिंसा बुद्धकालीन समाजजीवनाच्या कणाकणात भरलेली होती. सारांश, गंगेच्या प्रवाहांतून जलाहून जाड मानवी रक्तच अधिक वाहत होते. हीच होती बुद्धाने या भूमीत छेडलेल्या सामाजिक संघर्षाची पार्श्वभूमी !

तात्विक क्षेत्रांत एका टोकाला उपनिषदांचा आत्मवाद तर दुसऱ्या टोकाला देव, धर्म, अस्तित्व, नीति कांहीच न मानणाऱ्या अनेक विचारसरणी. लोकांना ठार मारण्यांत ना दोष, ना लोकांचें भले करण्यांत कांही गुण. बरें वाईट सब झूट. सगळे सारखेंच. ईश्वर आणि आत्म्याबाबतच्या उदासीनतेबरोबरच सदाचाराबद्दलही उदासीन बनलेल्या एकांगी अराजकवाद्यांचा आणि उत्स्फूर्त किंवा कच्च्या भौतिकवाद्यांचा सुळसुळाट होता. अशा प्रकारच्या ६२ विचारसरण्या त्यावेळी मैदानात होत्या.

अशा वेळीं बुद्धानेंच निश्चितपणे भौतिकवादाकडे झुकणारा पण बुद्धिपूर्वक नीतिवादाला उचलून धरणारा असा अनात्मवाद सांगितला. ह्यालाच बुद्धाचा मध्यम मार्ग असे म्हणतात. परंतु ईश्वराचें अस्तित्व आणि आत्म्याचें अविनाशित्व या बाबतीत मात्र बुद्धानें मध्यम मार्ग स्वीकारला नाही.

वस्तुस्थिती अशी असून सुद्धां देवधर्माचे होयबा असलेले अनेक भारतीय आणि पाश्चात्य लेखक बुद्धांचें बुद्धत्व ( बुद्धिवादित्व ) भंग करण्याच्या हेतूने तोही आपल्यांतलाच एक अशी खातरजमा करुन घेतात. अशा प्रकारचा गोंधळ करणाऱ्या महाभागांमध्यें डॉ. राधाकृष्णन्, विनोबा भावे, आचार्य काका कालेलकर आदि प्रमुख आहेत.

बुद्धाचे चिंतन हे भारतात तसेच अखिल जगांत संपूर्णतया गुणपरिवर्तन होते. त्याच्या पासंगालाही पुरणारे दुसरे कांही आधुनिक विज्ञानयुगाचा उदय होईपर्यंत कुठेच दिसले नाहीं. तेवढे प्रभावी तर नाहीच नाही.

बुद्धाच्या आर्यसत्यांचा प्रारंभच मुळी माणसांच्या दुःखाने होते. माणसांचें दुःख हे त्याने मुख्य सत्य मानले आणि दारिद्र्य अनेक दुःखांचा उगम मानला. अविद्या म्हणजे माणसांच्या दुःखाविषयीचे अज्ञान असा अविद्येचा त्याने अर्थ सांगितला. पण काही लोक समजतात त्याप्रमाणे दुःख-सत्याला त्याने शाश्वत सत्य मानले नाही. कारण बुद्धाला शाश्वत काहीच नाही. बुद्धाच्या चारही आर्यसत्यांचा सुसंगत अर्थ लावल्यास सब्बं दुखंःचा अर्थ निराशावादी दिशेकडे जाऊंच शकत नाही. कारण बुद्धाने नागरिकांचीं सुखेही सांगितली आहेत. पहिले सुख योग्य मार्गांनी केलेल्या धनार्जनाचे, दूसरे सुख उपभोगाचे, तिसरें सुख ऋणमुक्तीचें, चवथें सूख निर्दोषतेचे.

माणसाचे दुःख हें माणसांमाणसांमधल्या अकुशल व्यवहाराचा परिपाक असते. माणसांनी कुशल कर्मे केल्यास मानवी दुःखे संपू शकतात अशा धारणेतून बहुजनहिताय बहुजन सुखाय अशा सदाचार धर्माचा अष्टांगिक मार्ग बुद्धाने शिकवला.

बुद्धाच्या प्रज्ञेला माणसांच्या सुखदुःखाचे नियम दिसले ही एकच गोष्ट त्याच्या आधीच्या सर्व विचारवंतांपासून त्याला वेगळें काढण्यास पुरेशी आहे. माणसांच्या सुखःदुखाचे नियम त्याने माणसांबाहेर कुठेंतरी आभाळांत किंवा मागल्या जन्मांत न कल्पितां माणसांच्या स्वतःच्या बऱ्या वाईट कर्माच्या परिणामात म्हणजे माणसांच्या समष्टि व्यवहारांत अनभवले. या दुःख नियमांना कर्मनियम (कम्म नियम) अशी संज्ञाही त्याने दिली.

कुठें माणसाच्या मागे लागलेला जन्म जन्मांतरींचा कर्मविपाक आणि कुठें माणसांच्या व्यष्टि–समष्टि व्यवहारावर आधारलेले कम्मनियम. एक आकलन मानवी व्यवहार आणि इतिहासज्ञान यांच्या बाबतींत अंधाराच्या खोल दरीतले तर बुद्धप्रणीत आकलन खूप वरचें आहे.

धर्माचरणाने दुःख निरोध हा बुद्ध विचाराचा गाभाच आहे. मनुष्य–मात्रासाठी सांगितलेले निर्वाणाचे महातत्त्व ते हेंच.

निब्बाण (निर्वाण) म्हणजे रागलोभादि विकारांचा निग्रह. निब्बाण आणि मोक्ष यांत जमीन अस्मानाचे अंतर आहे. वाण म्हणजे अग्नी. बुद्धाच्या मते जीवनांत रागाग्नी, द्वेषाग्नी, आणि मोहाग्नी सदैव पेटते असतात. ह्या पेटत्या अग्नींना इंधन न पुरवणे म्हणजे निब्बाण.

निब्बाण म्हणजे हे अग्नी पुरते मालवणे नव्हे हें बुद्धाच्या अष्टांगिक मार्गाच्या शिकवणुकीवरून स्पष्ट होते. या विषयी त्रिपिटकाचार्य महापंडित राहुल सांकृत्यायन म्हणतात 'बुद्धानें निर्वाण अशा अवस्थेला म्हटले आहे, जेथें तृष्णा क्षीण झालेली आहे आणि भोग उरलेले नाहींत यापेक्षां अधिक सांगणे म्हणजे बुद्धाच्या अव्याकृत प्रतिज्ञेची अवहेलना करणे होय." ( पहा. 'दर्शन दिग्दर्शन' ले. राहुल सांकृत्यायन पृ.५३५ )

डॉ. आंबेडकरानी केलेले निर्वाण–विवेचन अत्यंत शास्त्रशुद्ध आहे, ते म्हणतात "बुद्धाच्या निर्वाण–कल्पनेत प्रामुख्याने तीन विचारांचा अंतर्भाव होतो. आत्म्याच्या मोक्षाऐवजीं प्राण्याचें सुख हा पहिला विचार. जिवंतपणी

ह्या सर्व संसारांत असतांना मिळणारें सुख हा दुसरा विचार. आणि सदैव प्रज्वलित असणाऱ्या विकारांच्या ज्वालांवर निग्रह साधणे हा तीसरा विचार. आत्म्याचा मोक्ष आणि मृत्यूनंतर आत्म्याला मोक्ष मिळणे हे विचार बुद्धाला अमान्य आहेत" ('भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म' पृ. १८७ )

पुनर्जन्माच्या कल्पना आणि कर्मसिद्धांताला बुद्धाने अतिदुष्ट सिद्धात मानले आहे. जन्म हा मातापितरांपासून असल्यामुळे बालकांना जन्मतः जो वारसा लाभतो तो आईबापांकडूनच असे बुद्ध मानतो. चालू शिक्षण–विज्ञान मानते त्या प्रमाणे मुलांचे भवितव्य भोवतालच्या परिस्थितीवर अधिक अवलंबून असते असें बुद्धही मानीत होता.

जो पुनर्जन्म बुद्धाला अभिप्रेत होता तो माणूस निर्वतल्यानंतर जे भौतिक द्रव्य उरते त्या द्रव्याचा पुनर्जन्म होय. त्यामध्ये एका जन्माचे संसरण दुसऱ्या जन्मात होण्याचा प्रश्नच नाही.

बुद्धि म्हणजे मनाची विचारात्मक, भावनात्मक, आणि निश्चयात्मक शक्ती. ही शक्ती सगळयाची सगळी वैयक्तिक बाब नाहीं हे अनेक बुद्धि–वादी विसरतात आणि तेथेच ते फसतात. समाजात समष्टि बुद्धितत्व कार्य–रत असून ते इतिहासात्मक आहे. त्यातूनच शक्य तितकी बुद्धि प्राप्त करुन घेऊन आणि एकमेकांची बुद्धि वाढवून म्हणजे अन्योन्याश्रयाने समष्टि बुद्धितत्वात आम्ही भर घालीत असतो.

बुद्धिचा निव्वळ वैयक्तिकपणा विवेकानंदानाही मान्य झाला नाही. ते म्हणतात "विश्वात समष्टि बुद्धितत्व असून त्यांतून आवश्यक तितकी बुध्दि काढून घेऊन आपण ती वापरीत असतो" (पहा 'धर्मांचे विज्ञान आणि तत्व-ज्ञान' ले. विवेकानंद पृ. ३९)

बुद्धाला बुद्धींच्या समष्टितत्वाचा योग्य बोध झालेला होता. त्यांच्या बौद्धिक आकलनातील ही फार मोठी आणि खुपच पुढची झेप होती. पण बुद्धीची इतिहासात्मकता हा सत्याचा आणखी एक पैलू किंवा दिशा बुद्धाला

दिसलेली नव्हती. त्यामुळें त्यांच्या कर्मनियमाना समाज विकासाच्या नियमांची जोड मिळूं शकली नाही. या बाबतीत बुद्धाचें आकलन सदोष राहिले. डॉ. आंबेडकरांनाही हा दोष दिसलेला नाही. ज्ञानविज्ञानाच्या नंतरच्या विकासामुळें कार्ल मार्क्स यालाच ती दिशा दिसली आणि त्यानेच समाज–विकासाचे नियम शोधून काढले.

बुद्धाचा धम्म म्हणजेंच सदाचरण, पण एका व्यक्तीला धम्म किंवा सदाचरण असूंच शकत नाही. कारण सदाचरण म्हणजें एकाचे अनेकांशी कुशल आचरण. हे आचरण ही बुध्दिपूर्वक अमलांत आणण्याची बाब असल्यामुळें विचारधम्म बुद्धाने प्रमुख मानला. योग्य विचार करण्याच्या पद्धतीला त्याने प्रज्ञा म्हटले. प्रज्ञा, करूणा, आणि शील ह्या बुद्धविचाराच्या कोनशिलाच होत. शीलहीन प्रज्ञा तशीच करूणाहीन प्रज्ञा त्याने भयकारी मानली आहे.

वास्तविक अशा तत्वज्ञानाचा भावी परिपोष आणि योग्य विकास भारतांतच होणे क्रमप्राप्त होते. पण ते घडले नाहीं. तसे घडले असते तर भारतीय जनता आपल्याच नव्हे तर जगाच्या विकासाला चालना देण्यांत सर्वाआधी यशस्वी झाली असती.

विख्यात पाश्चात्य तत्ववेत्ता फ्रान्सिस बेकन याने आपल्या तर्कपद्धतीने ( A Posteriori Method ) युरोपांतील ज्ञान–विज्ञानाला चालना दिली म्हणूनच यंत्रविज्ञान, भांडवलदारी संघटन आणि समाजवादी तत्त्व-प्रणाली निर्माण होऊन सामर्थ्यशाली युरोपचा जन्म होऊं शकला.

बेकनच्या पद्धतीपेक्षा अधिक सुसंगत तर्कपद्धती आणि शिवाय निसर्ग व सदाचार यांची योग्य सांगड घातलेला अष्टांगिक मार्ग बेकनच्या कितीतरी आधी सिद्धार्थाने जगाला सांगितला होता. परंतु हजारों वर्षांपासून भारताची प्रज्ञा जखडून ठेवणाऱ्या ब्राह्मणवादाने वेदांना ' स्वतः प्रामाण्य ' बहाल करून महान भारताला लहान केले आहे. भारताचे उन्नत भाल मलिन केले आहे.

परंतु ही वस्तुस्थिती आता इतिहास जमा होऊ लागली आहे. पुनः या भूमीत बुद्धाचा स्वीकार आणि तोही दलित पीडित वर्गाकडून होत असून, आतां नव्याने बुद्धविचाराचे आलोडन आकलन चालू आहे. दारिद्र्य आणि दुःख यातून मुक्त होऊ पहाणाऱ्या भारतीय जनतेच्या समाजवादी संग्रामाला ही गोष्ट उपकारकच ठरणार आहे.

नव्या प्रकाशासाठी नवे चिंतन करणारा बुद्ध हा पहिला भारतीय पुरुषोत्तम. प्रयत्ना, प्रयोगा नि प्रकाशा, तुझें नांव सिद्धार्थ ! जगांतही तू पहिलाच. बर्ट्रांड रसेल या सुविख्यात तत्ववेत्त्याचे पुढील उद्गार किती सूचक आहेत पहा. तो म्हणतो "जगातले सारे धर्म म्हणजे निव्वळ थोतांड आहेत. तथापी एखाद्या धर्माची निवड करणे जर मला भागच पडले तर मी बुद्धाची शिकवण निवडीन"

जगतामध्ये ईश्वराचे नांव न घेता, आत्म्याचे अमरत्व न मानता, स्वर्गाचे विलोभन आणि नरकाची भींती न दाखवता फक्त केवळ बौद्धिक आवाहनाने समजुतीचा नि सदाचाराचा मार्ग जर कोणी दाखवला असेल तर तो बुद्ध मानला गेलेल्या सिद्धार्थ नावाच्या माणसाने.

●●●

५८२५६ निबंध
१२।६।५२
२१९५

# जैनमताचा उद्बोधक अभ्यास

धर्मपंथांचा अभ्यास करण्याच्या अनेक पद्धती प्रचलित आहेत. पैकी दोन प्रमुख मानल्या जातात. एक म्हणजे ज्या विभूतींच्या आचारविचारांवर आणि नावारूपावर धर्म पुढे आलेले असतात त्यानाच धर्मप्रवर्तक किंवा धर्मनिर्मितीचे सर्वेसर्वा मानून त्यांच्याच आचार-विचारांचा अभ्यास करणे. या पद्धतीला विभूतीवादी अभ्यासपद्धती म्हणतात. ही पद्धती आज शास्त्रशुद्ध मानली जात नाही.

दुसरी अभ्यासपद्धती म्हणजे धर्मप्रवर्तक मानल्या गेलेल्या व्यक्तींचे कोणते आचारविचार कोणत्या अनुकूल प्रतिकूल आर्थिक-सामाजिक परिस्थितीमुळे उद्भवले ते पहाणे व त्याचबरोबर त्या आचार-विचारांची बीजें त्या काळांत किंवा तत्पूर्वी कोणत्या जनसमूहांच्या आचार-विचारांत उपलब्ध होती किंवा विकसत होती ते पहाणे. म्हणजेच सर्वांगीण ऐतिहासिक अभ्यास करून मूल्यमापन करणे होय. या पद्धतीला ऐतिहासिक विकासवादी पद्धती म्हणतात. ही पद्धती जेव्हां समाजविकासाच्या नियमांची दखल घेते तेव्हां तिला ऐतिहासिक भौतिकवादी पद्धती असें म्हणतात.

## वैज्ञानिक निकष

श्रीमती नातालिया गुसेवा या भारतविद्याभ्यासी सोविएत महिलेने ऐतिहासिक भौतिकवादी पद्धतीचा अवलंब करुन भारतातील एका अत्यंत जुन्या व महत्वाच्या धर्ममताचा अभ्यास आपल्या 'जैनमत' या पुस्तकांत सादर केलेला आहे.

आपल्या 'जैनमत' या पुस्तकांत लेखिकेने भारतीय चिंतनपरंपरेतील जैनमताचें वैज्ञानिक निकष लावून विश्लेषण केलेले असून तें मत उद्‌भवण्यास कोणकोणत्या गोष्टी कारणीभूत झाल्या त्याचा उलगडा केलेला आहे.

## अवैदिक परंपरा

भारतीय चिंतनपरंपरेत ब्राह्मण आणि श्रमण अशा दोन परंपरा आढळतात. पैकी ब्राह्मणपरंपरा वैदिक-यज्ञिक तर श्रमणपरंपरा अवैदिक अयज्ञिक. पाणिनीने सुद्धा हें ब्राह्मण-श्रमण द्वंद्व दर्शवलेलें आहे.

श्रमण म्हणजे आपल्या श्रमाने सफल सार्थ झालेला गृहस्थ. श्रमण परंपरा ही भारतांतील अतिशय जुनी आणि प्रतिष्ठित अशी आचारविचार परंपरा होती. आचार्य बृहस्पतींचें 'लोकायत' तत्वज्ञानात या परंपरेचा उगम सांपडतो. जैन व बुद्धमते हीं समणपरंपरेतील अतिशय प्रभावी मते होत.

भारताच्या गतेतिहासांत शक्तिपंथ आणि शैवपंथ जितका जुना तितकाच जैनपंथही जुना आहे. मोहनजोदारोमधील वटिकांवर 'कायोत्सर्ग' जैनासने आढळलेलीं आहेत. त्याचप्रमाणे जैनपंथाच्या इतर खुणाही आढळलेल्या आहेत. (पहा. 'हिंदु संस्कृति' भाग १–पृ २०–२१ ले. राधा कुमुद मुखर्जी)

## ब्राह्मणी वर्चस्वाला शह

जैन आणि बुद्धमतांमधल्या महावीर आणि सिद्धार्थाच्या असामान्य स्थानामुळें व त्याच्या बंडखोर वृत्तीमुळें या दोन्ही मतांना नवधर्म असेंही

गौरवाने म्हटलें जातें. तसेंच त्यांना 'क्षत्रीय धर्म' असेंही संबोधण्यात येतें.

वास्तविक उपनिषदांनी सुद्धा ब्राह्मण–वर्चस्वाला शह देण्याचा प्रयत्न केलेला आहे. बृहदारण्यक उपनिषदामध्यें 'क्षत्रियाहून श्रेष्ठ कोणी नाही. राजसूय यज्ञात ब्राह्मण खाली उभा राहून क्षत्रियाची उपासना करतो. (तस्मात् क्षत्रात परं नास्ति, तस्माद ब्राह्मणः क्षत्रियम् अधस्तात उपास्ते राजसूये.' पहा. मंत्र ५३) असें म्हटलें आहे.

## समंध म्हणजे समण

घरांत ब्रह्मचारी मुलगा वारल्यानंतर तो समंध होतो वगैरे जी खुळी कल्पना आहे त्या कल्पनेचा आधारही महावीराचा समणव्रतधारी पुरुष होय. समंध किंवा 'समन्न' हें पाली भाषेतील 'समण'चेंच कोंकणी–मराठी रुपांतर. भारतीय तमोयुगाच्या काळांत जैन आणि बुद्ध ह्या दोन्ही समण व्रतधाऱ्यांना तांत्रिक मांत्रिक स्वरुप प्राप्त होऊन ते पिशाच्च योनीतील प्रकार ठरले.

## लोकसमुदायांची संस्कृति

जैनमताच्या उद्भवाला कारणीभूत झालेल्या गोष्टींची चर्चा करताना प्रथम उत्तर भारताची सामाजिक–सांस्कृतिक पार्श्वभूमी तपासून पाहणे आवश्यक आहे. कारण उत्तर भारत हीच जैनमताची जन्मभूमी.

उत्तर भारतात रहाणाऱ्या लोकसमुदायांची संस्कृति कितपत आर्य–संस्कृतीला धरून होती किंवा आर्यसंस्कृति लोकसमुदायांमध्यें कितपत पसरली होती हा मुद्दा ह्या दृष्टीने फार महत्वाचा ठरतो.

उत्तर भारतामध्यें त्या काळी द्रविड लोक राहत होते. या गोष्टीला लेखिकेने दिलेलें महत्व वाजवी वाटतें. आर्यांच्या आक्रमणाच्या काळीं हिंदुस्थानचा उत्तर प्रदेश नागलोकांच्या अमलाखाली होता व अद्यापही ते लोक डोंगराळ प्रदेशांतून आपली सत्ता टिकवण्याची शिकस्त करीत असलेले दिसतात.

## आर्थिक सामाजिक संघर्ष हीच चिंतनाची जन्मभूमी

प्राचीन भारतीय संस्कृति ही आर्थिक-सामाजिक संघर्षाच्या परिणामी बनलेली आहे. या संघर्षाच्या परिणामीच चातुर्वण्य आणि जातिसंस्था उद्‌भवली. प्रथम संघर्ष आर्य-अनार्यांचा. या संघर्षांतून पहिला जातिभेद निर्माण झाला. परंतु आर्यां-आर्यांमध्यें तसेंच अनार्यां-अनार्यांमध्येंही अंतर्गत संघर्ष होताच.

हजारों वर्षांच्या आर्थिक-सामाजिक तसेंच राजकीय-सांस्कृतिक संघर्षाची जगांतील अगदी निवडक भूमी म्हणजे आपला भारत देश होय. आणि या संघर्षाचे प्रतिबिंबात्मक वैचारिक कोश म्हणजे आमचे धार्मिक ग्रंथ ! म्हणून हिंदूच्या केवळ बौद्धिक मंथनांतून जैनमताचा प्रादुर्भाव झाला हें प्रतिपादन मानवजाती शास्त्राच्या निकषावर मुळींच टिकत नाही.

## इतिहासाची नीट आठवण

आर्थिक-सामाजिक संघर्षाच्या वस्तुस्थितीकडे कानाडोळा केल्यास गतेतिहासाचा, परंपरागत संस्कृतीचा तसेंच वर्तमानकालीन विचारांचा आणि घडामोडींचाही नीट अर्थ समजणे शक्य नाही. म्हणून कार्ल मार्क्स, एंगल्स आणि लेनिन यांनी गतेतिहासाची नीट आठवण किती महत्वाची आहे आणि ती कशी ठेवावी तें शिकवलें आणि त्यासाठीं ऐतिहासिक भौतिकवादी सिद्धांत त्यांनी विकसित केला.

## ऋग्वेदांतील संघर्ष

ऋग्वेदांतील हजारों ऋचांमधून आर्य अनार्यांमधील वसाहतीकरणाचा मुख्य संघर्ष प्रितिबिंबित झाला आहे. आपल्या संवतीला पराभूत करण्याचे मंत्र, इंद्र-इंद्राणीचा संवाद, इंद्राचे अनैतिक जीवन, सोमरस करण्याच्या पद्धती, सोमरस पीण्याचे गुणगान व अवांतर विपुल कथाबरोबर अनार्यांना मारावें कसें तें ऋग्वेदांत दिसतें.

वाईटातले वाईट गुण, वाईटांतले वाईट रुप, वाईटांतला वाईट आवाज किंवा भाषाध्वनी अनार्य लोकांच्या माथी मारण्यात आलेला आहे. अनार्य वाईट नाकाचे (अनास), वाईट गुणाचे (अब्राह्मण), वाईट वर्तनाचे किंवा लिंगपूजक (शिश्नदेव:) वगैरे वगैरे.

## आर्यजनच असंस्कृत !

वास्तविक इतिहास वेगळा आहे. आर्यांनी द्रविडांवर स्वारी केली तेव्हां तथाकथित कुरुप नाकाचे ते लोक सुसंस्कृत होते. त्यांच्याकडून आर्यांनी ग्रामीण समाजव्यवस्थेची, जमीन महसुलाची आणि करवसुलीच्या प्रगत पद्धतीची माहिती करुन घेतली होती.

डॉ. सुनितीकुमार चतर्जी यांच्या म्हणण्यानुसार भारतीय संस्कृतीची रचना करण्याचे श्रेय एकटया आर्यजनांचे नसून त्यांत आर्येतर जनांचा भाग आहे. इतकेंच नव्हे तर पायाभरणीच्या कामात त्यांचा जास्त मोठा हिस्सा आहे. नागर व सुसंस्कृत आर्यपूर्व जनांच्या तुलनेने आर्यंजन हे अस्थिर असंस्कृत होते. (पहा. 'इंडो-आर्यन अॅन्ड हिंदी')

## व्रात्य क्षत्रीय

पहिल्याच प्रकरणामध्ये लेखिकेने खरे आर्य कोण होते व क्षत्रीय हे सर्व आर्य होते का हा प्रश्न उपस्थित करुन 'व्रात्य क्षत्रीयां'च्या वस्तु-स्थितीकडे लक्ष खेचले आहे. तसेच जीन, बुद्ध आणि बलराम यांच्यावर असलेलें सर्पांच्या फणेचे छत्र काय दर्शवते असा सवालही त्यानी केलेला आहे.

व्रात्यांविषयीचा सर्वात जुना उल्लेख अथर्ववेदांत आहे. गणा बाहेरच्या व्यक्तीला किंवा समूहाला गणरत सामींल करुन घ्यावयाच्या क्रियेला यज्ञ-विधीकर्मात 'व्रात्य स्तोम' म्हणतात. 'पंचविंशति ब्राह्मण' अनुसार व्रात्यांचे चार प्रकार होते. हीन, गर्गीर, समनीच मेघ्र तेलंग आणि ज्येष्ठ. मनुसंहितेच्या काळापर्यंत ह्या लोकांना 'सावित्री परिभ्रष्ट' म्हणजे यज्ञोपवितहिन मानीत असत. (पहा. १०-२०-२३)

## चंद्रगुप्त–बुद्ध–महावीर

ब्राह्मणांच्या निंदावाचक शब्दांत वृषलांचा, मुंडकांचा आणि श्रमण–कांचा अंतर्भाव होतो, पातंजलीने ब्राह्मणविरोधी वृषल अशी जोडी उभी केली आहे. ब्राम्हणी कर्मकांडावर विश्वास न ठेवणाऱ्या ब्राम्हणांना सुद्धा वृषलांमध्ये गणले जात असे. जे लोक वृषलांना, आजीवक तत्ववेत्त्यांना (नास्तिकांना) आणि शाक्यांना जेवण देत असत त्यांना दंड होत असे असें कौटिल्याने म्हटले आहे.

वैदिक कर्मकांड न मानणारे लोक भारतामध्यें किती प्रबळ होते तें चंद्रगुप्त वृषल होता, बुद्ध शाक्य होता आणि महावीर श्रमणक होता. या वस्तुस्थितीवरुन सहज लक्षात येतें.

## मुक्तिप्रित्यर्थ आंदोलने

श्रीमती गुसेवांच्या प्रतिपादनानुसार वैदिक पद्धती जनतेतील चार दोन योद्धयांना क्षत्रियांत घेऊन सर्वसामान्य लोकसमुदायांना शूद्रच गणत असे. आणि परिणामीं वैदिक पद्धतीच्या ब्राह्मण-क्षत्रिय वर्चस्ववादी चौकटीत न सामावलेली अफाट जनता मुक्तिप्रित्यर्थ प्रतिकार-आंदोलने उभारीत होती.

हीं प्रतिकार–आंदोलने प्रामुख्याने आर्यविरोधी, ब्राह्मणविरोधी आणि जातीयवादविरोधी होती. भागवतमत आंदोलन, कृष्णमत आंदोलन आणि जैनमत आंदोलन ही अशा प्रकारची लोक समुदायांनी उभी केलेली धार्मिक मुक्ति–आंदोलने होती.

## लोकसमुदाय संघटक कृष्ण

भागवतमताचा संघटक वासुदेव कृष्ण यज्ञहिंसा आणि जातीयवादा-विरुद्ध धार्मिक बंड करुन उठला होता. कृष्ण रंगाने, चालीरीतीने वैदिकां मधला खास नव्हता. त्याचे सांस्कृतिक संबंध अनार्यांशीच होते.

दक्षिणेतील मातुल पद्धतीप्रमाणे कंसाचा तोच वारसदार ठरत होता व आर्य प्रभुत्व झुगारणाऱ्या लोकसमुदायांचाही तोच संघटक होता.

प्राचीन भारतीय राज्यांतील अनेक राजे हे अनार्य जमातींतले होते. विश्वमित्र हा ब्राह्मण योद्धा मुंडतारा या अनार्य लोकांशी संबंधित होता. कर्णाचा तो पुरोहित होता. कर्णाला नंतर क्षत्रियांमध्ये सामील करून घेण्यात आलें, कर्णाची करुण कहाणी समजण्यास क्षत्रीय आणि व्रात्य क्षत्रीय यामधला फरक समजणे आवश्यक आहे.

## असुर, जैनांचे पुरोहित होते.

देवांसुरांचे युद्ध तर जगजाहीर आहे. असुरांना आर्य लोक राक्षस मानीत. (पहा. ‘राक्षोघ्न सूक्त’ ऋग्वेद १–१३३) पण जैनांचे आचार्य श्री. तुलसी असुरांना जैनांचे पुरोहित मानतात. श्रीमती गुसेवा असुरांचे आचारविचार जैनमताचे घटक असावेत असें म्हणतात.

## अयज्ञिक ‘पणी’

जैनामधील अहिंसातत्वाला अयज्ञिक ‘पणी’ जबाबदार असणे शक्य आहे. पणी लोक वैदिक आर्यांचे कट्टर शत्रू होते. ऋग्वेदांत त्यांना ‘अयज्वन्’ ( यज्ञ न करणारे ) ‘वेकनाट’ ( व्याज घेणारे ) ‘मृध्रवाच’ कटु भाषणी आणि ‘वैरदेय’ (मनुष्याहून हीन) म्हटले आहे.

‘पणी’ हे व्यापारी वृत्तीचे लोक असून यज्ञामधली व्यर्थ हिंसा त्याना आर्थिक दृष्टया हानिकारक वाटत असावी. प्राचीन भारतांतील अनेक विचारवंतही यज्ञ संस्थेविरुद्ध होते याचा विपुल पुरावा आज उपलब्ध आहे.

पणी लोक म्हणजे सिंधु संस्कृतीचे नागरी लोक असल्याचे अनुमान राहुल सांकृत्यायन यानी व्यक्त केले आहे. ( ‘ऋग्वेदिक आर्य’ पृ. ७६ )

## पेन पो पंथ

प्रस्तुत पुस्तकांत नेपाळ मधल्या ठाकूर लोकांचाही उल्लेख आहे. त्या लोकांच्या धर्मपंथाला 'पेन पो' असें म्हणतात. त्यांचा ईश्वर अगदी नागडा ( दिगंबर ) असतो त्यांचा तीर्थंकरही ( तारणारा ) असतो. आणि त्यांचा जीनही असतो. हा पंथ संपूर्णतया अहिंसक आणि शाकाहारी आहे !

## भारतविद्येचा विकास

१७८९ मध्यें विलियम जोन्स यानी कालिदासाच्या 'शाकुतलम' चे भाषांतर करून भारतविद्येला चालना दिली. १७९२ मध्ये पावलिनो वार्तोलोमिओ या आस्ट्रियन पंडिताने 'सिस्टिमा ब्राह्मनिका' हा ग्रंथ लिहिला. तर १८४४ मध्यें रशियन कवी झुकोवस्की यानी ' नल दमयंती' रशियन भाषेत अनुवादित केलें.

फ्रेंच पंडित वर्नुफ, त्याचा शिष्य मॅक्स मुल्लर आणि ऱ्हिस डेव्हिडस दांपत्याने बुद्ध दर्शनावर प्रकाश पाडण्याच्या कामी खूपच आघाडी मारली.

आइवान मिनाएव या रशियन पंडिताने बुद्धमतावर 'प्रतिमोक्ष सूत्त' रचलें. तर फिओदोर त्शेरेत्वास्की या दुसऱ्या एका रशियन पंडिताने बौद्ध तर्कशास्त्रावर दोन ग्रंथ लिहिले. पं. जवाहरलाल नेहरूंच्या मतानुसार 'बुद्ध भाष्यावर त्शेरेत्वास्कींच्या या ग्रंथापलीकडे कोणी मजल मारलेली नाहीं.'

## अभ्यासांतील फरक

भारत विषयक इतरेजनानी केलेला अभ्यास आणि सोविएत भारत-विद्याभ्यासी यांनी केलेला अभ्यास यांतील मूळ फरक म्हणजे सोविएत अभ्यास तत्त्वाचे व्यवहाराशी, चिंतनाचे जीवनाशी असणारे नाते उघड करणारा असतो. तो विघाडातून घडी बसवणारा, दुर्बलतेतून बलाकडे नेणारा असतो.

या ठिकाणी विवेकानंदांचे पुढील शद्ब आठवतात " माणसाची घडण

करणारा धर्म आपल्याला हवा आहे ..... .... दुर्बलता आणणारे गूढवाद सोडून द्या आणि सामर्थ्यशाली बना. आगामी पन्नास वर्षांत इतर सर्व देव आपल्या मनातून नाहींसे होऊं द्या. आपला मानववंश हा एकच जागृत ईश्वर आहे. तो सर्वत्र आहे. त्याचे हात पाय सर्वत्र आहेत."

## आत्मविस्मृतीचे कारण काय ?

जगाने आज विज्ञानयुगांत पदार्पण केले असले तरी त्याच या जगातील अंध स्वार्थामुळे भवितव्य हरवून बसलेले समाजाचे सडके भाग सध्या गूढवाद पिकवण्यात दग आहेत.

या लोकांपैकी कांहींना हरे कृष्णाचे खेळ पुढे आणावेसे वाटतात तर दुसऱ्या कांहींना हिप्पीवादाच्या कैफांत बुडलेली आत्मविस्मृती आणि अरा-जकत्व हवेसें वाटतें.

एकेकाळी वाघिणीचे दूध ठरलेली पाश्चात्यांची विद्या साम्राज्यवादी राजकर्त्यांच्या स्वार्थामुळे आत्मविश्वासाला मुकून आज शेळीहून शेळपट बनलेली आहे.

साम्राज्यवाद्यांची विद्या आज भारतासारख्या विकसनशील देशांतील लोकांना भवितव्याच्या संशयांत व गूढांच्या आश्चादनात लपेटून ठेवूं पहात आहे. त्यांच्या या असल्या प्रयत्नामुळेंच विसाव्या शकांतील त्यांचे तत्वज्ञान एक बुद्धिद्रोही विचारप्रवाह ठरला आहे.

## भारतीय जनतेला हे हवें !

अशा संधिकाळांत मानवजातीशास्त्राच्या ( एथ्नोग्राफिक सायन्स ) प्रकाशामध्यें भारताच्या भूतकाळाचे यथातथ्त दर्शन घडवण्याचा प्रयत्न कर-णारे 'जैनमता' सारखे ग्रंथ भारतीय जनतेला हवेसे वाटणे साहजिकच आहे.

अशा ग्रंथांनीं सदा सर्वकाळ, सर्वत्र असणाऱ्या मानववंशाचें खरें महात्म्य उजळ होतें आणि मानवजातीच्या भवितव्याचा मार्ग प्रकाशमान होतो.

● ● ●

# गुरु नानकांची शिकवणूक आणि नवभारताचा राष्ट्रधर्म

गुरु नानक हे भारतभूची निपज असून त्यांच्या विचारांचा मूलभूतपणा अत्यंत प्रभावी आहे.

गुरु नानक म्हणतात 'माझी जात पंचमहाभूतांची व माझा मार्ग सत्याचरणाचा.' गुरु नानकांच्या या मूलभूत शिकवणुकीचें जेव्हां जेव्हां मला स्मरण होतें तेव्हां तेव्हां कवि केशवसुतांच्या पुढील ओळी आठवतात "ब्राह्मण नाही, हिंदुही नाहीं न मी एक पंथाचा, तेच पतीत की जे आक्रमती प्रदेश साकल्याचा"

वास्तविक सामान्यजन आणि धर्मप्रणेतेसुद्धा एकाच मातीचे बनलेले असतात. ती माती म्हणजे विश्व हे एकच आमचें घर, मानवता ही एकच आमची जात व मानवधर्म हा एकच आमचा धर्म. ही जननी मातीच आम्हाला विश्वकुटुंबवादी नि मानवतावादी प्रेरणा देत असते.

## मानवतावादी नानक

गुरु नानकांचे विचार मानवतावादी व एका विशिष्ट धर्मापलीकडचे होते. तरीही त्यांच्या विचारांवर अधिष्ठित असा एक नवा धर्म उदयाला आलाच.

सर्वसाधारणपणे असे समजलें जातें की एखादा प्रेषित, पैगंबर किंवा धर्मगुरु जन्माला आला कीं धर्म तयार होतो. परंतु जगामध्यें अस्तित्वात असलेल्या नाना धर्मांची उत्पत्ती, स्थिती व लय यांचा शास्त्रशुद्ध अभ्यास करणाऱ्या वैज्ञानिक धर्मवेत्त्यांनी ही समजूत चुकीची ठरवली आहे.

ज्यावेळीं जनतेला विशिष्ट धर्माची गरज भासते तेव्हाच धर्मगुरु किंवा पैगंबर उदयाला येतात. आपत्तीच्या, संकटाच्या किंवा ग्लानीच्या काळांतच धर्मावतार होतात असेंच भगवद्गीतेतही म्हटलेलें नाही काय ? "यदा यदा ही धर्मस्य ग्लानिर्भवति भारत" म्हणजे वाटेल तेव्हां भगवान जन्म घेतो असा अर्थ नव्हे. धर्मग्लानीच्या काळांतच तो जन्म घेतो.

## दे धनधान्य भटा

गुरु नानकांच्या काळीं भारताच्या उत्तरेकडे एका नवीन धर्माची फारच गरज भासूं लागली होती. ही गरज त्यावेळी भासण्याची जीं अनेक कारणे होती त्यामध्यें दोन कारणे प्रमुख होती.

एक म्हणजे सनातन हिंदु धर्माचरणामध्ये कर्मकांडाचा जाच परा-कोटीला गेला होता. माणूस जन्माला आला की दे धनधान्य भटा–पुरोहितांना. मेला तरी तेच कर. व प्रत्येक धार्मिक संस्काराच्या वेळीही तेच.

ईश्वर आणि बहुजनसमाज किंवा जनार्दन आणि जनता यामध्यें निर्माण झालेल्या एका मध्यस्थ वर्गाने आपली उपजीविका गरीब जनतेवर सोपवल्यामुळें धर्म महागडा ठरला होता.

हा मध्यस्थ वर्ग प्रतिष्ठेची नि कायद्याची मक्तेदारीही आपल्याकडेच ठेवून होता. स्वतःलाच 'पृथ्वीतळीचे देव' (ज्ञानेश्वर) 'गुरु सकळासी ब्राह्मण, जरी झाला तो क्रियाहीन' (रामदास) असे म्हणवून घेवून नाना प्रकारे तो वर्ग स्वतःची तळी उचलून धरीत होता.

## वेदांचा अर्थ कोण जाणतो ?

परिणामी जनतेने भागवत संप्रदायाचें बंड उभारून स्वतःची मुक्ती करून घेण्याचे प्रयत्न केले. संतकवी हे या सामाजिक, धार्मिक मुक्तीच्या आंदोलनाचे नेते असून भक्तिमार्ग हे त्यांचे जनसुलभ असें तत्वज्ञान होतें.

जे विद्वान, पंडित, वेद केवळ आपणालाच समजतो असे म्हणवून जनसामान्यांना हिणवीत आणि तुडवीत असत त्यांना संत तुकारामानी ताकीद दिली "ब्रह्मज्ञान्या हातीं घोटवीन लाळ" आणि ठणकारून सांगितलें की जनतेला पीडणारा लटका वेदार्थ लावू नका. वेदार्थ उपेक्षितांच्या अंतःकरणपटलावरच योग्य तऱ्हेने कोरला जाऊं शकतो. "वेदाचा तो अर्थ आम्हासीच ठावा, येरानी वहावा भार माथा."

## क्रांतिकारी धर्म-आंदोलन

बिनखर्चाचे आणि पुरोहिताला वगळून साधणारे 'नामस्मरण' हे या धार्मिक आंदोलनाचे प्रभावी साधन होते. कोणालाही पैसा न देता व कोणाच्याही मध्यस्थिविना ईश्वराकडें जाण्याचा मार्ग या आंदोलनाने मोकळा केला. आणि हेच ह्या आंदोलनाच्या यशाचे मुख्य कारण होते. ह्या आंदोलनाने जबर संघर्ष छेडला त्याचेही कारण असेच आर्थिक–सामाजिकच होते.

संत तुकारामाचे अभंग नष्ट करणे ही काही कुणाची लहर किंवा फेफऱ्याचाहीं तो परिणाम नव्हता. ज्या वर्गाची उपजीविका तुकारामाच्या अभंगातील शिकवणुकीने मारली जात होती तो वर्ग आपल्या सर्व शक्तिनिशीं त्या शिकवणुकीला विरोध करण्यासाठीं उभा ठाकला होता. आणि

दुसऱ्या बाजूला जनताही तितक्याच हिरीरीने तो संघर्ष लढवीत होती. तुकारामासारख्या या संघर्षाच्या नेत्यांना त्यानी स्वर्गीय विमान बहाल केलें आणि स्वर्ग खुला केला तो सुद्धा यासाठींच.

भारतामध्ये भागवत संप्रदायाचें हे जें महान क्रांतिकारी धर्मआंदोलन घडत आलें त्याचेच अगदी अखेर अखेरचे किंवा दुसऱ्या शब्दांत अर्वाचीन प्रणेते गुरु नानक होत.

## मागासलेली सामंतशाही

गुरु नानकांच्या विचारांना त्या काळात मूर्तिमंत आशय किंवा सजीवता प्राप्त करून देणारे दुसरे प्रमुख कारण म्हणजे भारतामध्यें 'इस्लाम' धर्म जो आला तो समाजाची सामंतशाही रचना घेऊनच आला. ही सामंतशाही रचना अरब देशांसारख्या मागासलेल्या देशांतील सामंती रचना असल्यामुळें राजकीय दृष्ट्या ती हिणकस होती.

या सामंती–सरदारी नोकरशाहींत भारतीय जनतेला दिलासा मिळणे शक्यच नव्हते. उलट इथल्या सामंतशाहीला अतिशय अत्याचारी स्वरूप देण्याचेंच कार्य तिने केलें. भारतांत इस्लाम जो आला आणि राहिला तो मागासलेल्या राजकीय–सांस्कृतिक स्वरूपातच.

अशा प्रकारच्या मागासलेल्या सामंतशाही आक्रमणाला बळी पडलेला बहुजनसमाज नागवला व गांजला जाऊन त्या परिस्थितीतून सुटण्यासाठी अधीर झाला होता. परंतु प्रत्यक्ष आणि समोरासमोर एखादे आर्थिक किंवा राजकीय आंदोलन उभारण्याचा तो काळ नव्हता.

शिवाय छत्रपती शिवाजीसारखे जबरदस्त गनिमी आंदोलन उभारण्या आधींही वैचारिक धार्मिक आंदोलन उभारण्याची गरज असतेच. गुरुनानकांच्या विचारांनी पंजाबातील पुढील इतिहासाचा पाया घातला तो या दृष्टीनेच.

## वैष्णवमताचा प्रभाव

समाजाच्या ऐतिहासिक गरजातूनच पंजाबकडील प्रदेशाच्या परिसरात गुरु नानकांच्या जिवंत विचारांचा प्रभाव वाढत गेला व जीवनरस नष्ट होऊन हवालदील झालेल्या जनतेमध्यें सामाजिक अध्यात्मिक चैतन्य ओतण्याचे महान कार्य त्याना साधता आलें.

गुरु नानकांच्या विचारांवर प्रामुख्याने सुफी–इस्लामी व वैष्णव मतांचा प्रभाव होता. किंवहुना सूफी आणि वैष्णवतमताचा संयोग म्हणजेच गुरु नानकांचे विचारधन होय. अर्थात पुढे शीखधर्म वैशिष्टचे बनल्यानंतर पंथनिविष्ट संकुचितपणा किंवा शीख धर्माची स्वतंत्र वैशिष्टये तयार झालीच.

भागवत धर्म, वैष्णवमत नि भक्तिमार्ग या सर्वांची चौकट वैदिक धर्माचीच होती. व या चौकटीवर ब्राह्मणी अहंवादी किंवा व्यक्तिवादी तत्वज्ञानाचा जो पगडा होता त्यातून संपूर्णतया कोणीच सुटलेला नव्हता. कारण या गोष्टीला आवश्यक ते विज्ञान व इतिहासाचे शास्त्रशुद्ध आकलन त्यावेळी निर्माणच झाले नव्हते.

बुद्धाच्या शिकवणुकीमध्येहीं वैगुण्ये रहाण्याचे एक मुख्य कारण त्या काळांत विज्ञानाचा निसर्ग अभाव हेच होते. आणि ‘ख्रिस्त’ किंवा ‘इस्लाम’ वा ‘सुफी’ यांच्या विचारांचीही गत तीच.

गुरु नानकही या गोष्टीला अपवादभूत ठरणे शक्य नव्हते. त्या वेळच्या रंजलेल्या गाजलेल्या जनतेचे तें आंदोलन होतें आणि भक्कम मानवता–वादावर तें आधारलेलें होतें हेंच त्याचे महान कार्य होय.

## ब्राह्मण–मुल्लांचा विरोध

देवा-धर्माच्या नावावर तीर्थयात्रा होमहवने धर्मग्रंथ-पूजन तसेच प्राण्यांची व दगडांची पूजा यांविरुद्ध गुरु नानकांचा प्रचार चाले. त्यामुळें

हिंदू आणि मुसलमान दोघेही त्याला पाखंडी मानीत. बनारसचे ब्राह्मण आणि काबाचे मुल्ला दोन्ही त्याना सारखाच कडाडून विरोध करीत. नानकांचे मूलभूत तत्व म्हणजे मानव प्रेम. ' जो इतरांवर प्रेम करीत नाही त्याला परमेश्वराची ओळख काय दगड पटणार ? असा खडा सवाल ते करीत.

## श्रमजीवींचे दोस्त

तसेंच स्वतःच्या निढळाच्या घामाने जगणाऱ्या श्रमजीवी जनतेचे ते अंतःकरण पूर्वक दोस्त होते. जनतेच्या उपयोगी पडणे, त्यांच्या गरजा भागविणे ही सर्वश्रेष्ठ ईश्वर भक्ती असे ते मानीत असत.

ते जेव्हां नबाव दौलतखान लोदीकडे कोठावळयाची नोकरी करीत होते तेव्हां भुकेने व्याकुळ झालेल्या जनतेला त्यावेळी कोठी खुली करून त्यानीं आपल्यावर मालकाचा राग ओढवून घेतला होता.

## एक दंतकथा

ते जेव्हां मलिक भागोकडे भोजनासाठी म्हणून गेले होते तेव्हा त्यांनी त्यांच्याकडचे शिरापुरीचें जेवण पाहून पुऱ्या हातात घेतल्या आणि दाबून पाहिल्या तो काय त्यातून रक्त गळलें व स्वतःच्या श्रमावर जगणाऱ्या भाओ लालो यांच्या घरच्या कोंडा भाकरीतून दूध गळलें !

गुरु नानक कष्टार्जित संपत्तीला आणि तज्जन्य उपभोगाला किती धन्य मानीत होते व अकष्टार्जित धनोत्पादनाला किती हीन व अनर्थकारी समजत होते त्याची निदर्शक अशी ही दंतकथा आहे.

## जनतेचें प्रापंचिक हित

नानकांचे सारे विचार आणि कार्य हें जनतेच्या प्रापंचिक हिताला वाहिलेलें होतें. याच जन्मी याच डोळा कष्टकरी मानवतेचें ऐहिक आणि आत्मिक कल्याण साधावे अशीच त्यांची मनोमन इच्छा आणि तळमळ होती.

बंधुभाव आणि समता ह्या माणसांच्या आचरणातील चीजा ठराव्यात म्हणून त्यानी 'संगत' स्थापन केली तर विषमता व वर्गभेद नष्ट करण्यासाठी म्हणून 'गुरु का लंगर' मध्यें त्यानी मोफत सहभोजनाची 'पंगत' सुरु केली.

## पुरोहितशाहीला कडवा विरोध

पुरोहितशाहीकडून होत असलेल्या कर्मकांडावर ते कोरडे ओढीत त्याचाहीं उद्देश हाच होता. कारण कोणत्याही धर्मपंथातील पुरोहितशाही ही जनतेच्या कल्याणाच्या मार्गांपासून दूर जांऊन स्वतःच्या स्वार्थाची तजवीज करणाऱ्या शोषक वर्गाची बटीक बनून वावरत असते व आपल्या पोटाचा भारही ती जनतेवर घालीत असते. नानकांचा या दोन्हीं गोष्टीना सक्त विरोध होता. अर्थात गुरु नानकांच्या मूळ क्रांतिकारी विचारामध्ये व आजच्या शीखपंथीय विचारामध्यें खूपच तफावत आहे.

## 'ओम' खाऊ या 'ओम' पिऊ या

भक्तिमार्गाच्या उदयापूर्वीही भारतात पुरोहितशाहीला विरोध होत होता. उपनिषद कालामध्यें सुद्धा ही गोष्ट प्रकर्षाने घडत होती. छांदोग्य उपनिषदामध्यें दाल्भ्य गोत्राचा महान तत्वचिंतक बक याची जी शिकवणूक आहे ती प्रामुख्याने पुरोहितशाही विरोधीच आहे.

ओंकाराची उपासना म्हणजे फुकट बसून खाणे नव्हे. तत्वचिंतक बक विचारतो कीं यज्ञाभोवती बहिष्पवमान स्तोत्र म्हणत फिरणारे पुरोहित हे एका कुत्र्याने दुसऱ्या कुत्र्याचे शेपूट धरून 'ओम' खाऊ या, 'ओम' 'पिऊ या' 'ओम' निरुद्योगीपणाने जगू या असे म्हणणाऱ्या जनावरांसारखेच नाहीत काय ?

भारतामध्ये बकदाल्भ्य म्हणून विख्यात पावलेल्या या तत्ववेत्त्याची ही कठोर शिकवणूक पुढे स्वार्थी व सत्तापिपासू राज्यकर्त्या वर्गाच्या पाठिंब्यामुळें पुरोहितशाहीने नष्ट भ्रष्ट केली व म्हणूनच भक्तिमार्गाचे बंड व इतर बंडे आवश्यक ठरलीं.

## मक्तेदार खवळणारच !

नवभारतामध्यें धर्मनिरपेक्ष असा जो नव राष्ट्रधर्म बनत आहे त्याला पुष्ट बनविण्याच्या कामात संत कबीरा समवेत गुरुनानकांच्या शिकवणुकींचे महत्व अपार आहे.

परंतु, कबीर नानकांसारख्या थोर कामे साधूं पहाणाऱ्या महान व्यक्तींनी लोखंडाचे चणे पचवलेले असतात हे विसरता कामा नये.

जनतेला मूलभूत विचारांची देणगी देण्याचे ध्येय हें एक असिधारा व्रत असते. त्यासाठी छळाच्या अग्नीदिव्यांतून जाणे क्रमप्राप्तच असते. 'तुका झाला सांडा, विटंबिती पोरे रांडा' असे प्रसंग हरघडीं त्यांच्या जीवनात घडलेलें असतात,

गुरु नानकांनाही अग्निदिव्यांतून जावें लागले आहे. समाजाला नवीन ज्ञान देण्यासाठी समाजाच्या पूर्वज्ञानावर जबरदस्त प्रहार करावाच लागतो, व या प्रहारामुळें पुराणमतवादी व सत्ता संपत्तीचे मक्तेदार खवळून उठणारच !

## धन्य भारत भूमी

गुरु नानकांना निंदानालस्ती, देहदंड व कारावासही सहन करावा लागला आहे. परतु त्यांचा संयम ढळला असें मात्र कधीही घडलें नाही. बाबरच्या कारागृहांत असतांना सुद्धा त्यांचे वर्तन महान ध्येयवाद्याला शोभणारेंच झालें.

धन्य आहे भारतभूमी जिने आपले भावी उज्ज्वल भवितव्य घडविण्यासाठी म्हणून आधीच हजारों वर्षांपासून बृहस्पती, बक, अजित केशकंबलिन, विरोचन, संगय, पुराण काश्यप, महामुनी कपील, गौतम बुद्ध आणि कबीर–नानकांना जन्म दिला !

●●●

# युगधुरंधर कार्ल मार्क्स

मानवोद्धाराच्या काजासाठी काया झिजवणारे महाभाग आजवर अनेक होऊन गेले आहेत. त्यामध्ये धर्मचक्रपरिवर्तन करणारे आहेत, अवतारी समजल्या जाणाऱ्या विभूती आहेत, प्रेषित आहेत तसेच ऋषिमुनी, पंडित, महापंडित संत, महात्मेही आहेत. भिन्न भिन्न आचारविचार शिकवून ते गेलेले आहेत. पण समाजविकासाच्या वस्तुगत नियमांना धरुन समाजसंघटनेमध्ये इष्ट तो आमूलाग्र बदल कसा करावा व मानवतेची आर्थिक दास्याच्या बंधनातून कायमची सुटका करुन तिला स्वातंत्र्याच्या जगात कसे न्यावे तें संपूर्ण शास्त्र सांगणारा वैज्ञानिक तत्त्ववेत्ता मात्र कार्ल मार्क्स हाच. तो सर्वच बाबतीत निराळा. त्याच्याविषयी विख्यात इंग्रज साहित्यक बर्नार्ड शॉ लिहितात. " मार्क्सचे भाल देवतेसमान धीरोन्नत आहे. समाज विकासाचा नियम त्याने शोधून काढला आहे. आज काय हवे ते त्याला ठाऊक आहे. इतिहासाची धुरा त्याच्या हाती आहे. "

मार्क्सवादाच्या उदयाआधी समाजाचा अर्थव्यवहार हातात ठेवणारी मंडळी आणि त्यांचे भगतगण लोकांना नीतीचे आचरण करा, नेकीने वागा,

पिळणूक करु नका असा वरपांगी उपदेश करण्यास चुकत नसत. पण मार्क्सने 'नीतीशास्त्राचा पाया अर्थव्यवहार आहे' असे सांगून त्या व्यवहारांत पायाभूत परिवर्तन केल्याशिवाय समाजाची नीती कदापी बदलणे शक्य नाही असे सांगितले. तसेच भांडवलदारी अर्थशास्त्र मानवाच्या श्रमावर व त्याच्या योग्य मोबदल्यावर आधारलेले नसून ते 'भांडवला' वर म्हणजे श्रमजीवी जनतेच्या शोषणावर आधारलेले आहे हे त्यानेच प्रथम उघड केले.

'भांडवल' म्हणजे भाड्याला लावलेला पैसा. या विषयावर लिहलेल्या आपल्या विश्वविख्यात ग्रंथांत त्याने 'नफ्या' च्या रहस्याचा उलगडा केला. मानवी श्रमावर पैदा होणाऱ्या 'अतिरिक्त मूल्याचा' सिद्धांत विशद केला आणि भांडवलदारी ढोंगी भाडोत्री स्वरुपावर विदारक प्रकाश टाकला. 'भांडवलदार आहेत म्हणून कामगार जगतात' असे समजणाऱ्या जगाला त्याने दाखवून दिले की 'कामगार असतात म्हणून भांडवल निर्माण होते, जगते व वाढते.'

## सामान्य लोकच इतिहासाचे निर्माते

हीच गोष्ट त्याने इतिहासाच्या मीमांसेबाबत केली. राजा, महाराजा, वीर, मुत्सद्दी, ज्ञानी, महापुरुष हेच इतिहासाचे निर्माते होत हे तत्त्व त्याने खोडून काढले व महापुरुषांच्या कृत्यांनी इतिहास निर्माण होत नसून ज्यावेळी सामान्य लोक जागृत होतात व राजकीय मंचावर प्रवेश करतात त्यावेळीच त्यांच्या हातून खरा इतिहास निर्माण केला जातो असे प्रतिपादन केले.

इतिहासाच्या गतीची खुलावट करताना त्याने इतिहासाच्या भौतिक उपपत्तीचा सिद्धांत मांडला. आर्थिक, सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक दृष्ट्या मार्क्सचा हा सिद्धांत अनन्यसाधारण महत्त्वाचा मानला जातो. कम्युनिझमचे एक प्रखर अमेरिकन विरोधक प्रो. सिडने हूक म्हणतात "इतिहासाच्या भौतिक उपपत्तीचा मार्क्सने मांडलेला सिद्धांत ही संस्कृतिविषयक अभ्यासाला मार्क्सवादाची मौलिक आणि मूलभूत महत्त्वाची अशी देणगी होय." ( कम्युनिझमचा अभ्यास पृ. ४० )

## विश्व-दृष्टिकोनाचा पाया

तशीच गत त्याने तत्त्वज्ञानाचीही केली. तत्त्वज्ञानाचा मूलभूत प्रश्न म्हणजे जगताविषयींचा योग्य दृष्टिकोन ठरवण्याचा. यासंबंधीच्या विवेचनात 'विचार किंवा आत्मा आहे म्हणून प्रकृति किंवा जगत् आहे' असें म्हणणाऱ्या अध्यात्मवाद्याना मार्क्सने सांगितले, "बाबारे, प्रकृति, समाज, जग आहे म्हणून विचार, आत्मा आहे." म्हणजे अध्यात्मवाद्यांनी जगाला जे डोक्यावर उभे केले होते त्याला मार्क्सने पक्क्या वास्तवतेच्या पायावर उभे केले.

## अध्यात्माचा आक्रोश

जगाच्या दुःखाची वर्णने अध्यात्मवाद्यानी भरपूर केली आहेत पण तें बदलावे कसे तें त्यांना साधले नाही. महाबुद्धि व्यास असो, देवमार्गाचा उद्‌गाता लाओ त्से असो, सिद्धार्थ गौतम बुद्ध असो, ख्रिस्त किंवा महंमद असो, ज्ञानेश्वर किंवा शेक्सपीअर, रामदास किंवा तुकोबा असो, अंती त्यांच्या नशिबी आक्रोशच आला. महाव्यासांचा आक्रोश तर प्रसिद्धच आहे. 'धर्माद अर्थश्च कामश्च स्वधर्मः किं न सेव्यते ?' असे दुःखोद्‌गार त्यानी काढले.

धर्मसंस्थापक लाओ त्सेला म्हणावे लागले " ज्यांच्याजवळ पुष्कळ आहे त्यांच्याकडून काढून घेऊन ज्यांच्याजवळ पुरेसे नाही त्यांना देणे हा पुण्यमार्ग होय. पण ज्यांच्याकडे भरपूर आहे त्यांचीच आज भर केली जात आहे." बुद्धाचे 'सब्बं दुःखं' व 'ख्रिस्ताचे धनिकांना स्वर्गाचें द्वार बंद करणे' तर जगजाहीरच आहे. जगाचा प्यारा कवी शेक्सपीयर दुसरे काय सांगतो. तो म्हणतो, सुवर्ण ! पिवळे धमक, चकचकित मूल्यवान सुवर्ण ! ! काळ्याचे गोरे, वाईटाला बरे, अपराध्याला निरपराध, नीचाला उच्च, वृद्धाला तरुण, नामर्दाला मर्द बनविणारे हेच सुर्वण ? धिःकार असो या धरित्रीचा ! (तिमोन द अथेन्स) तर रामदास आपल्या कालाबद्दल लिहितात "पृथ्वीचा झाला गळाठा । एक लहान एक मोठा । कोण खरा कोण खोटा । कोण जाणे । माणसा खावया अन्न नाही । अंथरुण पांघरुण तेही नाहीं । घर कराया

सामुग्री नाही । काये करिती । " आणि आमचे तुकोबा म्हणतात 'दुष्काळे आटिलें, धन द्रव्ये नेला मान । स्त्री एकी अन्न अन्न करितां मेली.'

## कल्पनारम्य समतावाद

वास्तविक मार्क्सपूर्वी होऊन गेलेले मानवी द्रष्टे सुखदुःख विपाकाचे महान् दिग्दर्शक होते–मानवी मनाचे शिल्पकार होते. पण केवळ परमात्म्याच्या प्रार्थनेने नि अंतरात्म्याच्या मनधरणीने मानवतेचा आक्रोश रतिभरही कमी होऊ शकला नाही. कारण हा आक्रोश वास्तव परिस्थितीच्या शास्त्रशुद्ध आकलनावर, समाजविकासाच्या नियमांवर, विज्ञानाच्या पायावर, आधारलेला नव्हता. म्हणजे जगदुद्धाराचे हे सारे चित्र वस्तुनिष्टेवर आधारलेले नसून आत्मनिष्ठेवर आधारलेले होते. म्हणून ते फोल व कल्पनारम्य ठरले. मार्क्सने अशा प्रकारच्या स्वप्नांना 'कल्पनारम्य समतावादाचा प्रकार' असे म्हटलें आहे.

कार्ल मार्क्सनेच पहिल्याप्रथम एकसूत्र अशा वस्तुनिष्ठ तत्वज्ञानाची व वैज्ञानिक समाजशास्त्राची देणगी जगाला दिली. या बाबतींत जगप्रसिद्ध धर्मशास्त्राज्ञ तसेच बुद्ध व गांधीजीचे निष्ठावंत अनुयायी आणि गोमंतकाचे सुपुत्र धर्मानंद कोसांबी यांचे उद्गार महत्वाचे आहेत. ते म्हणतात, "सामाजिक विकासका उत्कृष्ट ज्ञान रखनेवाला कार्ल मार्क्स जैसा दूसरा तत्ववेत्ता क्वचितही हुवा होगा (पहा: 'संस्कृति और अहिंसा' पृ. २७३).

## खरे नास्तिक, पाखंडी, अश्रद्ध कोण ?

मानवता प्रामुख्याने श्रमजीवी वर्गाचीच बनलेली असते. या कष्टकरी मानवतेचे जीवनमान सुधरावे म्हणून समाजाची जी नव्याने उभारणी करावी लागते त्याबाबत अध्यात्मवादी तत्त्वज्ञान उदासिनच नव्हे तर विरोधीही असते आणि त्याचे कारण समाजातल्या स्वार्थी वर्गांशी ते निगडित झालेले असते हे होय. समाजांतला स्वार्थी वर्ग बाह्यात्कारी जरी देवभोळा वाटत असला तरी अंतर्यामी तो नास्तिक, पाखंडी व अश्रद्ध असतो. जग सुधारु शकते, मानवता पुढे जाऊ शकते असे त्या वर्गाला वाटतच नाही.

मानवतेच्या उद्धारावरील त्यांची श्रद्धाच हरवलेली असते. जग सुधारण्याचा प्रश्न आला व त्यामध्ये त्यांना चटका बसण्याचा संभव निर्माण झाला की नाना पाखंडे ते पुढे करतात व अध्यात्मवादी तत्त्वज्ञान या आप्पलपोटया वर्गाला पाठीशी घालण्यासाठी नाना युक्तिवाद शोधून काढते. म्हणून मार्क्सने अध्यात्मवादी तत्त्वज्ञान झिडकारलें. शिवाय विश्वाविषयीचे अध्यात्म-वादी आकलन विश्वांतर्गत घटनांबाबत विपर्यास करणारे व दिशाभूल करणारे आहे म्हणूनही त्याने ते त्याज्य ठरवले व भौतिकवादाचा स्वीकार केला.

## गत्यात्मक भौतिकवाद

पण मार्क्सपूर्व भौतिकवाद स्थितिवादी किंवा जड होता. मार्क्सने त्यात विकासतत्त्वाची चेतना ओतली व त्याला नवनवोन्मेषशाली बनवले. म्हणून मार्क्सच्या भौतिकवादाला गत्यात्मक किंवा द्वंद्वात्मक भौतिकवाद म्हणतात.

जगात भौतिकवादाची परंपरा फार जुनी आहे. भौतिकवादाची भारतीय परंपरा जुनी तर आहेच पण फार समृद्धही आहे. 'लोकायत' तत्त्वज्ञाने, तीर्थंकरांचे सिद्धांत, बुद्ध व जैन धर्माचा भौतिकवादी पाया व षडदर्शनांपैकी (वेदांत सोडले तर) बहुतेक सारी कमी अधिक मानाने भौतिकवादीच होत. चार्वाकाची परंपरा तर फार प्रभावी आहे. चार्वाका-मागे त्याच्या प्रबळ विरोधकांनी सुखवाद जोडला असला तरी ती गोष्ट असत्य आहे हे आता सिद्ध झालेले आहे. (पहाः 'चार्वाक तत्त्वज्ञान' ले. प्रो. आठवले) परंतु हा पुराणा भौतिकवाद फार सदोष होता. म्हणून मार्क्सने त्यात सुधा-रणा केली हे वर म्हटलेच आहे.

## व्यर्थाला सार्थ केले !

श्रमजीवी मानवतेचे खंबीर तत्त्वज्ञान निर्माण करुन मार्क्सने तत्त्व-ज्ञानाला व मानवतेला दोघांनाही सफल, समृद्ध केले. आजवर तत्त्वज्ञान हे स्वार्थी आप्पलपोटया वर्गाचे लांगुलचालन करणारे व प्रामुख्याने कष्टी मानवतेला विषमतेची उग्रता भासू नये म्हणून स्वप्नरंजनाच्या, गूढगुंजनाच्या

किंवा विभूतिपूजनाच्या कैफात बुडवणारे निष्क्रीय साधन होते. परंतु मार्क्सने त्याला कष्टकरी मानवतेच्या कार्याला कणखरपणे जुंपून दलित क्रांतीचे होकायंत्र बनवले. जे व्यर्थ होते त्याला सार्थ केले. तर दुसऱ्या बाजूने कष्टकरी मानवता आपल्याला चांगले जीवन प्राप्त करून घेण्याच्या प्रयत्नांत आजवर अयशस्वी होत आली असल्यामुळे कच खात होती. लुळी, पांगळी, मुकी जनावरे कुणीही हांका अशी ती बनली होतीं. कोटयवधी हातपाय असलेल्या व निढळाच्या घामाने जग घडवणाऱ्या त्या कष्टकरी मानवतेला मार्क्सने समाजविकासाचे नियम स्पष्ट करून सांगितले व त्या नियमांनुसार (कोणा महापुरुषाला हवे किंवा नको म्हणून नव्हे) भांडवलशाही समाज–व्यवस्थेचे उच्चाटन व समाजवादी व्यवस्थेचा विजय कशी अपरिहार्य आहेत ते शिकवले. त्यामुळे शोषणरहित, वर्गरहित नवे जग उभारण्याची हमी श्रमजीवी वर्गांना मिळाली व ते कृतिशील बनून आर्थिक, सामाजिक, राजकीय मंचावर येऊन उभे राहिले.

## अभूतपूर्व संयोग

मार्क्सवादामध्ये एका बाजूने जागतिक ज्ञानविज्ञान विकासाचे उत्तुंग शिखर व दुसऱ्या बाजूने कष्टकरी मानवतेचा नवसृष्टी निर्माण करू शकणारा विधायक नवोन्मेष यांचा शास्त्रशुद्धसंयोग साधला गेला आहे. किंवा खऱ्या विधायक तत्वज्ञानाने आपल्या साफल्यासाठी नवनवोन्मेषशाली कष्टकरी मानवतेला वरले आहे व कष्टकरी मानवतेने नवे जग निर्माण करण्याच्या कामात होकायंत्र म्हणून मार्क्सचे तत्त्वज्ञान अंगिकारले आहे असे म्हटले तरी चालेल. पण हा अपूर्व व अभूतपूर्व संयोग एवढा परिणामकारी ठरला आहे की वैज्ञानिक समाजवाद किंवा मार्क्सवाद–लेनिनवाद म्हणजें काय या प्रश्नाबाबत कोटयावधी लोकाना कुतुहल निर्माण झाले असून त्यांच्या जिज्ञासेचे समाधान करणे आज सर्वत्र भाग पडत आहे. अर्थात तत्त्वज्ञान जेवढे अधिक प्रभावी तेवढाच त्याचा विपर्यासही अधिक दुःखकारी असू शकतो हे सांगण्याची आवश्यकता नाही व त्या दृष्टीने मार्क्सवादाचा अभ्यास जेवढा अधिक होईल तेवढा विपर्यासाचा धोका कमी होईल असे आम्हाला वाटते.

## मार्क्सची व्यवहारदक्षता

मार्क्स अत्यंत प्रेमळ, खेळकर, विनोदप्रिय, उत्साही होता. त्याचे विचार व कार्य याविषयी कोटचवधि पुस्तके जगात वाचली जातात. त्या अद्वितीय विचारवंताचा जन्म ता. ५ मे १८१८ रोजी जर्मनीमध्ये झाला व २४ मार्च १८८३ मध्ये तो निधन पावला. शिक्षणामध्ये 'तत्त्वज्ञानाचे डॉक्टर' ही पदवी त्याने मिळवली. पण क्रांतिकारी विचार व कार्यामुळे अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत त्याला जीवन कंठावे लागले, स्वदेशातून परागंदा होणे भाग पडले. प्रथम इतर देशातही थारा न मिळणे व तात्कालिन समाजाची घोर उदासिनता या आपत्तींना त्याला तोंड द्यावे लागले.

अशा महाखडतर जीवनात त्याची सुशील पत्नी जेनी व जिवलग मित्र आणि सहकारी प्रख्यात तत्त्ववेत्ता फ्रेडेरिक एंगल्स यांचे त्याला फार सहाय्य मिळाले व म्हणूनच 'दास कॅपिटल' हा ग्रंथ निर्माण होऊ शकला. यासंबंधी एका सहानुभूतिदाराला लिहिलेल्या पत्रात मार्क्सने लिहिले आहे. "....मग तू म्हणशील की पत्राचे उत्तर पाठवले नाही, तर त्याचे कारण असे की, मी एकसारखा मृत्युच्या सीमेपर्यंत घिरटचा घालीत होतो आणि त्यामुळे मिळणारा प्रत्येक क्षण माझे पुस्तक संपविण्यासाठी खर्च करीत होतो. या पुस्तकासाठी मी माझी शरीर–प्रकृती, माझे सुख व कुटुंब यांचा बळी दिला आहे. "व्यवहारदक्ष" माणसांचे व त्यांच्या शहाणपणाचे मला फार हसूं येते. आपले मन फत्तरासारखे असेल तरच मानवजातीच्यां दुःखाकडे दुर्लक्ष करून स्वतःच्या सुखाकडे लक्ष देता येते. परंतु ते तसे नसल्यामुळे पुस्तक पूर्ण न करता मीं मरून गेलो असतो तर मी स्वतःला फार 'अव्यवहारी' समजलो असतो."

मार्क्सच्या मनाची घडण व मार्क्सवादी तात्त्विक प्रेरणा या पत्रात परिपूर्णतेने व्यक्त झाली आहे !

●●●

५९२५६ निबंध
२१९५ १२।९।८२

# लोकयुगाचे आरंभकर्ते लोकमान्य टिळक

बाळ गंगाधर टिळक या सर्वसामान्य भारतीय जनतेच्या असामान्य नेत्याला दिवंगत होऊन आता अर्धशतकाहून अधिक काळ लोटला आहे. त्यांच्याविना गेलेला हा भूतकाळ त्यांच्या जीवनकार्याविषयी अगदी निस्पृहतेने विचार करावयास पुरेसा आहे.

सर व्हॅलंटाइन चिरोल या लोकमान्य टिळकांच्या कट्टर विरोधकाने लोकमान्यांना भारतीय अशांतीचे जनक ठरविले होते आणि भारतीय स्वातंत्र्य-संग्रामाच्या अनेक इतिहासकारांनीही टिळकांच्या जीवनकार्याचा तो एक गौरव समजून तें मान्यही केले आहे. परंतु टिळकांच्या उदयकालापूर्वीच्या भारताकडे मागे वळून पाहिल्यास ते संपूर्णतया खरे असावेसे वाटत नाही.

## १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात

कारण १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात तत्कालीन समाजाच्या धडप

डीचा कार्यकारणसंबंध, समाजाचा चरितार्थ व चरित्र यातील अन्योन्यसंबंधाचे आकलन अथवा सामाजिक तत्वज्ञान किंवा समाजशास्त्र ह्यापैकी कशाचाही मागमूस होता असे म्हणता येणार नाही. बंगालमधील आंग्लशिक्षित तरुण वर्ग मात्र फ्रेंच क्रांतीच्या विचारांनी बराच प्रभावित झालेला होता.

भारतीय नवजीवन–आंदोलनाचे प्रथम उद्‌गाते आणि समाजसुधारणांचे प्रथम पुरस्कर्ते राजा राममोहन रॉय किसानांच्या अधिकारांसाठी व्यथित होते. सर्वधर्मएकता आणि सामाजिक राजकीय जीवनाची आंतरराष्ट्रीय बाजू त्यानीच भारतामध्ये प्रथम पुढे आणली. त्यांच्या प्रमाणेच त्यावेळच्या जागतिक विचारानें प्रभावित झालेले हेन्री विवीयन डेरोझियो, ताराचंद चक्रवर्ती, दक्षिणा रंजन मुखोपाध्याय, रसिक कृष्ण मल्लिक, रामगोपाल घोष आदी क्रांतिकारी विचारांची मंडळी बंगालात झाली. तशीच महाराष्ट्रातही होती. राजा राममोहन रॉय इंग्लंडला जाताना केप ऑफ गुड होप येथे त्यांच्या जहाजाच्या समोरच फ्रेंच जहाज उभें राहिलेले पाहून फ्रेंच कप्तानाला अभिवादन करून आले. स्वातंत्र्य, समता व बंधुत्व या तत्वांचा पुरस्कार करणाऱ्या फ्रान्सचा प्रतिनिधी म्हणून रॉय यानी हे अभिवादन त्या कप्तानाला केले होते.

१८५७ च्या पूर्वीसुद्धा उमाजी नाईकाचे बंड, बिहारमध्ये कोल शेतकऱ्यांचे बंड, तसेच सावंतवाडकरांचे आणि दक्षिणेतील शेतकऱ्यांचीं बंडें सतत चालू होती व कर्नल मालेसनने म्हटल्याप्रमाणे त्या बंडांचे पर्यवसानच पुढे १८५७ च्या विशाल बंडात झाले होते.

## असंतोष शिगेला पोहोचला

१८५७ ते १८८५ या कालखंडांत तर ब्रिटिश राजवटीविरुद्ध धुमसणारा बहुजनसमाजातील असंतोष शिगेला पोहोचला होता व त्या असंतोषामुळेच तर ब्रिटिशांनी भारतीय काँग्रेसच्या जन्माचे स्वागत केले होते. खुद्द ह्युमने या असंतोषाचे विदग्ध चित्र आपल्या निवेदनात प्रस्तुत केलेले आहे.

लोकमान्यांनी सुद्धा ह्युमची प्रशंसा केली आहे. ह्युम म्हणतात "गरीब लोक परिस्थितीला कंटाळले असून त्यांची खात्री पटली आहे की, भुकेने मरणे हेच आता त्यांचे भवितव्य. परंतु, एकमेकाना आधार देऊन काही-तरी करण्याचा त्यांचा निर्धार आहे आणि हे काहीतरी म्हणजे हिंसा. तलवारी, भाले, जमा होत असल्याच्या बातम्या पोहोचल्या आहेत. प्रथम सरकारविरुद्ध बंड होईल. शत्रूंची हत्या होईल. सावकारांच्या घरावर दरोडे पडतील. बाजार लुटले जातील. गरीब जनता भुकेकंगालीने मरत आहे म्हणून अशी अशांती फैलावत चालली आहे. अशी वेळ येईल की, सरकार व वरिष्ठ वर्ग मग काही करू शकणार नाही. बंड सुरू झाले की, काही शिक्षित पुढारी त्यांचे सूत्रचालन करतील व देशव्यापी राष्ट्रीय बंडाचा वणवा पेटेल ( पहा 'भारतवर्षके स्वातंत्र्य संग्राम का इतिहास' ले. सुखसंपत्तिराय भंडारी पृ, ३०५–३०६ ).

वरील अधिकृत स्वरूपाच्या उताऱ्यावरून बहुजनसमाजामध्ये त्या वेळीही केवढा उद्रेक व दुश्मनाविरुद्ध शस्त्राचा खेळ खेळण्याची हिंमत वावरत होती त्याची कल्पना येते. ब्रिटिश नोकरशाही या विद्रोहाची उघड दखल न घेता पुढारीच अशांती फैलावत आहेत असा स्वार्थी प्रचार करीत होते व लोकमान्यांच्या बाबतींतही ब्रिटिशांचा हाच प्रचार चाले.

## भयानक काळ

श्री. अँड्रयुज तर स्पष्टच कबूल करतात '१८५७ नंतर काँग्रेसच्या जन्म वेळेइतका ( १८८५ ) भयानक काळ कधीच आला नव्हता. इंग्रजी बुद्धिवंतांमध्ये ह्युम साहेबाने हे भावी संकट ओळखले आणि सिमल्याला जाऊन देशांतील जनतेची परिस्थिती किती बिघडली आहे त्याची सरकारला समज दिली. संभवतः व्हाइसरॉयने परिस्थितीचे गांभिर्य जाणले असावे. किसान वर्ग जर त्यावेळी बंड करून उठता तर मध्यम वर्गीयांची सहानुभूती त्या बंडाला मिळाली असती. परंतु काँग्रेसमुळे मध्यम वर्गीयाना व्यासपीठ मिळाले व एकंदरीत हिंसामय क्रांती रोकली गेली. ( पहा. 'काँग्रेसचा जन्म आणि विकास' ले. अँड्रयुज )

मि. अँड्रयूजच्या या वस्तुनिष्ठ कथनावरून भारतीय जनता अचेतन होऊन पडली होती व लो. टिळकांनी त्या निष्क्रीय जनतेमध्ये चैतन्य ओतले हे त्या वेळच्या सामाजिक राजकीय परिस्थितीचे आकलन किती कृत्रिम व साम्राज्यवादी प्रचाराचाच एक अंशभाग कसे होते ते सहज दिसून येते. खोलवर पाहू गेल्यास अतिशय कठोर परिस्थितीत दैनंदिन जीवन-संग्राम लढणारा आपला बहुजनसमाज नेहमीच तप्त व क्रांतिप्रवण राहिला आहे. ब्रिटिश इथें विजयीं ठरले याचे कारण सरदार, व्यापारी आणि पुरोहितानी ब्रिटिशाना जय मिळवून दिला हे होय. मराठ्यांच्या राजधानीत पुण्यात तर इंग्रजाना जय मिळावा म्हणून काहीं ' ब्राम्हण, तपस्वीं जागोजाग अनुष्ठानास बसले होते ' ( पहा. पृष्ठ १३.'नवरोजी ते नेहरू' ले. गोविंद तळवलकर.)

अर्थात ठराविक वर्गामधले काही लोक गोसावडे बनून कर्महीन जीबन व्यतित करण्याच्या मागे होते व त्याचीही सामाजिक–मानसिक कारणे होतीच. त्याचबरोबर तत्कालीन राजकीय आणि धार्मिक नेत्यांच्या भ्रष्ट राजवटीला, वाढत्या जातीभेदाला व वाढत्या विषमतेला कंटाळलेला, उबगलेला बहुजनसमाज इंग्रजाकडे सामाजिक समतेच्या आशेने आणि समाजसुधारणांसाठी बघू लागला होता हेंही खरे आहे. डोईजड राजकीय करांच्या जोडीला शंकराचार्यांच्या पाद्यपूजेच्या पट्टयाही रयतेला असह्य होत होत्या.

## नवी समाजरचना

ब्रिटिशांनी एक नवी भांडवली समाजरचना भारतामध्ये रुजविली व ती चालवण्यासाठी म्हणून एक नवा आंग्लशिक्षित हिंदी वर्ग तयार केला. ह्या नवशिक्षित वर्ग आणि बहुजन समाज या मध्ये फार मोठी खाई ब्रिटीशांच्याकाळी निर्माण झाली होती. नव शिक्षितांपैकी अगदी तुरळक मंडळीच जुन्यासाठी रडणारी होती. बहुसंख्य शिक्षित नवें डोक्यावर घेऊन नाचत होते. शेष मध्यमवर्ग त्या काळातील इंगित धड न समजल्यामुळे अगतिक झालेला होता. मध्यमवर्गाच्या या अगतिकतेचे वर्णन भारतीय समाज बर्फासारखा थंड गोळा होऊन पडला होता असे करण्यात आलें.

## लोकयुगाची नांदी

लोकमान्य टिळकांचे हे वैशिष्टय होते की, नवशिक्षित मंडळींपैकी समाजकार्य करावयास जे उत्सुक होते त्यांना त्यानी बहुजनसमाज व शिक्षितांमधली खाई भरुन काढण्यासाठी प्रवृत्त केले. शिक्षितांनी शेतकऱ्यांकडे कामगारांकडे, गरीब मध्यमवर्गीयांकडे जाऊन त्याना राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी आणि सामाजिक न्यायाच्या दिशेने जागवले पाहिजे, उठवले पाहिजे ही लोकमान्यांची प्रमुख आणि आग्रही शिकवणूक होती. ह्या शिकवणुकीपासून त्यांनी राजकारणाला प्रारंभ केला. अशी शिकवणूक ही भारतामध्ये उदयाला येणाऱ्या लोकयुगाची नांदी होती. लोकयुगाच्या प्राथमिक अवस्थेत बहुजन समाजाचे नेतृत्व शिक्षित मध्यमवर्गालाच करावे लागते. श्रमजीवी आपली ध्येये गाठण्यासाठी जेव्हा आपल्या वर्गातीलच पुढारी निर्माण करतो तेव्हा लोकयुगाने वरची पायरी गाठलेली असते.

## मुख्य लढा जाणला !

लोकमान्यांच्या लेखांत 'लोक' 'लोकांनी' 'लोकांसाठी' असे लोकसंग्राहक शब्द सर्रास वापरण्यात आले आहेत. इतकेच नव्हे तर त्यानी सत्याची व्याख्यासुद्धा बदलून टाकली. 'यल्लोकहितम् अत्यंतम् तत् सत्यमिती धारणा' (जे लोकहितकारी ते सत्य समजावे) तसेच अखिल भारत हे एक राष्ट्र आहे अशा प्रकारच्या राष्ट्रीय स्वातंत्र्याकडे नेणाऱ्या नवजागृतीला त्यांच्या प्रचारात फार मोठे स्थान होते.

लोकयुग आपल्याबरोबर राष्ट्रीय स्वातंत्र्याची भावना घेऊनच येत असतें. जगामध्ये लोकयुगाचा आणि राष्ट्रीय मुक्तिलढयांचा उदय एकसाथच झालेला आहे. भारतात लाल–बाल–पाल हे तिघेही लोकयुग आणि राष्ट्रीय स्वातंत्र्य या दोहोंचाही मिलाफ झालेल्या संयुक्त युगाचे नेते होते.

'दरिद्र–दुष्काळ–द्रव्यशोष' म्हणजे तीन 'द' चे ब्रिटिश राज्य ही लोकमान्यांची व्याख्या होती. लोकमान्यांनी साम्राज्यवादी ब्रिटिश हुकुमतीचे

अगदी मर्म जाणले होते. वासाहतिक शोषण हें तें मर्म होतें. म्हणजे, त्या काळचा मुख्य लढा कोणता व मुख्य शत्रू कोणता ते त्यानी जाणले होते.

## अमानुष नोकरशाही

लोकांमध्ये राष्ट्रीय स्वातंत्र्याचा प्रचार करण्यासाठी लोकमान्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यानी 'केसरी' आणि 'मराठा' ही दोन पत्रे काढली. ज्या मानाने राष्ट्रीय स्वातंत्र्याचे आवाहन लोकांमध्ये बेफाट रीतीने फैलावत गेले त्यामानाने ब्रिटिश नोकरशाही त्यांचा द्वेष करु लागली. १८९७ साली पुण्यात प्लेगने जेव्हा थैमान घातले त्यावेळची लोकमान्यांची लोकसेवा व त्यांचे संघटना-चातुर्य अत्यंत श्रेष्ठ दर्जाचे होते. त्यानी त्यावेळी राजरोस हैदोस घालणाऱ्या नोकरशाहीला सळो की पळो करुन सोडले. नोकशाहीने सूड घेऊन त्यांच्यावर राजद्रोहाचा आरोप ठेवला आणि ८ महिन्यांची शिक्षा दिली.

## नवा वर्ग, नवी जागृती

विसाव्या शतकाचा प्रारंभकाल हा राष्ट्रीय स्वातंत्र्य-संग्रामाच्या इतिहासात प्रक्षोभक कालखंड समजला जातो. टिळकांच्या कर्तृत्वाचा काल तो हाच. या कालखंडात बंगाल, महाराष्ट्रामध्ये तर नव जागृतीच्या लाटांवर लाटा उसळत होत्या. लॉर्ड कर्झनने बंगालची फाळणी जाहीर करुन पहिली आक्रमक तोफ डागली ती याच काळात. लोकमान्यांना सहा वर्षांची हद्दपारीची जबर शिक्षा ठोठावण्यात आली तीही याच कालात आणि रामाविना अयोध्या रडली तशी लोकमान्यांविना भारतमाता रडली तीही याच कालात.

या कालात मुंबईच्या कामगार वर्गाने आशिया खंडातील अभूतपूर्व असा राजकीय संप लढवला आणि मुंबईच्या रस्त्यारस्त्यावर ब्रिटीश बंदुकांच्या गोळ्यांशी समोरासमोर झुंज दिली. खुद्द लेनिनने त्यांच्या या शौर्यशाली राष्ट्रीय भावनेची दखल घेऊन लिहिले की, भारतातील कामगार वर्ग आता आपल्या लेखकांसाठी व नेत्यांसाठी लढा उभारण्यास पुढे सरसावला आहे. भारतामध्ये जाणीवपूर्ण राजकीय लढा उभारण्याइतपत कामगार वर्गाचा

विकास झाला असून रशियन पद्धतीच्या (झारकालीन) ब्रिटिश राजवटीचे दिवस आता भरले आहेत. (पहा.'पूर्वेकडील राष्ट्रीय मुक्ती आंदोलन' पृ.१५)

## भांडवलदारीचीं दोन रुपें

ब्रिटिश सत्ता हे ईश्वरी वरदान आहे ही महर्षी रानडे यानी प्रवर्तीत केलेल्या पंथाची वैचारिक बैठक होती. तर हे वरदान नसून हा ईश्वरी प्रकोप आहे असे लोकमान्यांचे जहाल मत होते. दोन श्रेष्ठ दर्जाच्या विचारवंतांमध्ये किंवा दोन प्रामाणिक पंथांमध्ये एवढी तफावत असण्याचे कारण म्हणजे ब्रिटिशांनी जी भांडवलदारी समाजरचना भारतामध्ये आणली होती त्याचीच ही दोन रूपे होती, दोन बाजू होत्या. व ह्या दोन्ही बाजू खऱ्या होत्या.

रानडे यांच्या प्रतिपादनानुसार इंग्रजी राज्यात प्रथमच देशामध्ये कायद्याची सार्वत्रिक व्यवस्था, अपराध्यांचा बंदोबस्त, सार्वजनिक आरोग्य, व्यापारवृद्धी, शेतकी सुधारणा, उद्‌भिज संपत्तीची अभिवृद्धी, विद्यादानाच्या अनुपम सोई, मर्यादित लेखन स्वातंत्र्य आदी अनेक फायदे लाभले होते.

लोकमान्यांना सुद्धा ही गोष्ट कबूल होती. पण वाढती लोकसंख्या, बुडता व्यापार, सरकारचा अवाढव्य खर्च, उत्तरोत्तर जमीन निःसत्व बनून अन्नदाता शेतकरी उपाशी आणि देश भकास हे चित्र लोकमान्यांना अधिक बेचैन करणारे वाटे.

वास्तविक, मुठभरांची चढती समृद्धी आणि बहुजन समाजाचे वाढते दारिद्र्य या भांडवलदारी समाजरचनेच्या दोन्ही बाजू खऱ्याच होत्या. पण भांडवलदारी समाजरचनेबाबत स्वच्छ प्रकाश कार्ल मार्क्सपूर्वी कोणालाच दिसला नव्हता. भांडवलदारी नाण्याच्या दोन्ही बाजूचे स्पष्ट विश्लेषण फक्त कार्ल मार्क्सनेच जगासमोर ठेवले.

## उदासवाणा समाज

रानडे–टिळकांच्या काळी इंग्रजी साहित्यामध्ये त्या बाबतची अगदी

पुसटशी कल्पनाच उपलब्ध होती. कार्ल मार्क्सचे लक्ष जेव्हा भारतीय परिस्थितीकडे वेधले तेव्हा त्याने मात्र १८५७ च्या उठावाआधी चार वर्षे 'डेली ट्रिब्युन' या अमेरिकन पत्रामध्ये लेख लिहून परिस्थितीचे अचूक विश्लेषण केले. कार्ल मार्क्स म्हणतात "हिंदुस्थानात यापूर्वी अनेक यादवी युद्धे झाली, परकी आक्रमणे झाली, पराभव पत्करले, क्रांत्याही घडल्या, दुष्काळ पडले व देशाचे भयंकर नुकसान झाले. परंतु या सगळ्याचा परिणाम वरवरच झाला. देशाच्या आर्थिक पायामध्ये त्यामुळे परिवर्तने झाली नाहीत. इंग्रजांनी मात्र देशाचा पायाच उखडून टाकला आहे. आणि त्या जागी ते कांही रचनात्मक पुनर्निमाण करीत आहेत अशी चिन्हे दिसत नाहीत. हिंदुस्थानात चाललेला हा जुन्या जगाचा संहार आणि तेवढ्याच सामर्थ्यशाली अशा नवीन उभारणीचा अभाव यामुळें हिंदु समाज आज उदासवाणा बनला आहे. ( पहा. 'आर्टिकल्स ऑन इंडिया' ले. कार्ल मार्क्स. संपादक डॉ. मुल्कराज आनंद )

## फरकाचे मूळ

नेमस्त आणि जहाल पंथांमधल्या फरकाचे मूळ कारण म्हणजे नेमस्ताना कर्तुम अकर्तुम अशा ब्रिटिश सत्तेचें भांडवलवादी आणि साम्राज्यवादी मूळ दिसू शकले नव्हते, त्याचबरोबर भांडवलशाहीच्या उदरांत वाढणाऱ्या कामगार वर्गाच्या शक्तीचे व भवितव्याचे निदानही त्याना झाले नव्हते.

परंतु जहाल पंथियांना या महान घटनांची पुसटशी का होईना पण कल्पना आलेली होती. लाला लजपतराय आणि बिपिनचंद्र पाल यांच्या अनेक भाषणात कामगार राज्य, बोल्शेविक क्रांति आदी गोष्टींचे स्पष्ट उल्लेख सांपडतात.

लाला लजपतराय हे तर अखिल भारतीय ट्रेड युनियन काँग्रेसचे पहिले अध्यक्ष होते. अध्यक्षपदावरून ते म्हणाले, 'साम्राज्यशाही व लष्करशाही ही भांडवलशाहीची जुळी लेकरे आहेत.' बाबू बिपिनचंद्र पाल यानीही अमेरिकन भांडवलशाहीवर कोरडे ओढले आणि लोकमान्यांनी दि. १९

जानेवारी १९१८ च्या ‘केसरी’ च्या अंकांत ‘रशियाचा पुढारी लेनिन’ या शीर्षकाखाली समाजसत्तावादी स्थित्यंतराचे स्वागत करून लेनिनची बदनामी करणाऱ्याना चोख उत्तर दिले. अर्थात लाल-बाल-पालांचा काल काहीसा अलिकडचा होता हे मात्र लक्षात घ्यावे लागते.

## तेल्या तांबोळ्यांचे पुढारी

लोकमान्यानी लोकांचे लढे उभे केले. राष्ट्रीय स्वातंत्र्याचा लढा पुढें नेण्यासाठी लोकांमध्ये परदास्याबद्दलची चीड वाढविली. लोकांचा आत्मविश्वास जागृत केला व स्वतः ते तेल्या–तांबोळयांचे पुढारी बनले. आजवर जो वर्ग राजमान्य राजश्री होण्यात धन्यता मानीत होता, ‘राव-बहाद्दुरी’, ‘सर’ की आणि राजेशाही किताबांच्या मागे लागला होता त्या वर्गाला लोकांकडून लोकसेवेने पदव्या घ्या अशी लोकयुगाची नवी दिक्षा लोकमान्यांनी दिली.

लोकयुगाचा हा संदेश होता व तो पुढे नेण्यात लोकमान्यांनी अपूर्व यश मिळविले. म्हणून भारतीय स्वातंत्र्यसंग्रामाच्या इतिहासात ते लोक-युगाचे आरंभकर्ते म्हणून अमर राहातील. नेमस्त पंथीयांना लोकयुगाचे मर्म भांडवलशाहीच्या त्यांच्या कच्च्या आकलनामुळे समजले नाही आणि म्हणून पुढे नेमस्त राजकारण काळाने बाद ठरवले.

नेमस्त–जहाल राजकारणाविषयी अरविंद घोष आपल्या विवेचनात म्हणतात, “बाळ गंगाधर टिळक अथवा चिदंबरम पिल्ले आपल्या राष्ट्रीय जीवनातील अपवाद नव्हेत. सर्व देशातील सामान्य जनतेचा जो सागर खवळला आहे त्यांतीलच या भरतीच्या लाटा आहेत. सध्याची मोहीम पाहून लोकांची अशी खात्री होईल की, हे पुढारी ज्या उच्च ध्येयाकरिता झगडत आहेत त्याची प्राप्ती होणे हिंदुस्थानातून ब्रिटीश गेल्याशिवाय शक्य नाही. बहुधा त्यामुळे देशातील जहाल लोक अधिक वाढतील आणि नेमस्त प्रचार समूळ नष्ट होईल.”

## जातीयवादाला मूठमाती

लोकमान्य टिळकांच्या जाहिरनाम्यामध्यें कारखान्यांत काम करणाऱ्या शेतमजूरांना जीवनावश्यक वेतनाची शाश्वती देण्यांत आली होती. त्याचप्रमाणे भाषावार विभागणीच्या तत्वावर प्रांतांच्या पुनर्रचनेचे लोकशाही महत्व त्यांनी ओळखले होते व विशेष म्हणजे लोकयुगाच्या विकासाला पायाभूत असें जे जातीयतादाच्या निर्मूलनाचें तत्व तेही बॅ. जीनाबरोबर लखनौ करार करून लोकमान्यानी आचरणात आणून दाखविले होते. या कराराचे समर्थन करताना लोकमान्य म्हणाले “कांही लोक म्हणतात कीं हिंदुंनी मुसलमानांपुढे शरणांगती पत्करली पण मला तसे वाटत नाहीं.

## मागास धार्मिक प्रवृत्ती

लोकमान्य टिळकांच्या धार्मिक समजुती आणि सामाजिक सुधारणाबाबतच्या त्यांच्या प्रतिगामी दृष्टिकोणाविषयी पुरोगामी लोकानी नाकें मुरडणे चूक आहे. मागासलेल्या देशांतील स्वातंत्र्य–संग्रामामध्ये प्रथम प्रथम धार्मिक शक्ति जागवण्याची एक मागास प्रवृत्ती सर्वत्रच दिसून येते. तुर्कस्थान, इराण, इजिप्त, इन्डोनेशीया, अफगाणिस्थान आदी देशांमध्ये विशाल इस्लामवाद, अरबवाद, इस्लामी राष्ट्रवाद, इस्लामी समाजवाद वगैरे रूपांनी अशा प्रवृत्ती बळावलेल्या होत्या.

लोकांच्या कल्पना घेऊन त्यानुसार राजकीय डाव खेळणे हे लोकांना खड्डयात घालणारे ठरत असते. म्हणून लोकांचे हितसंबंध घेऊन राजकारण ठरवणेच अधिक योग्य असते. तथापी लोकयुगाच्या प्रारंभी आणि स्वातंत्र्यसंग्रामाच्या त्या अवस्थेत लोकमान्यांनी भौतिकवाद व समाज सुधारणा दुय्यम महत्वाच्या ठरवून साम्राज्यवादाशी मुकाबला हाच आपल्या जीवन-कार्याचा आणि देशाच्या उज्जीवनाचा पाया ठरवला ते गेल्या अर्धशतकाच्या अनुभवावरून चूक होतें असे मात्र म्हणता येणार नाही.

●●●

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
क्रमांक ५८२५८ वि. निबंध
क्र. ३९८५ दि. १२।९।८२

# मॅक्झीम गॉर्की

जनसागरावर काळ्या मेघांचे आच्छादन घनदाट होऊन खाली खाली येत होते. विजा कडाडत होत्या आणि सागराच्या लाटा झंझावाताशी झुंज घेत होत्या. रशियन इतिहासाच्या अशा मोक्याच्या कालखंडात क्रांतिकारी मानवतावादाचा प्रतिभाशाली उद्गाता म्हणून गॉर्की पुढे आले. मॅक्झीम गॉर्की म्हणजे क्रांतिकारी रशियन मनाचे ठसठशीत प्रतिबिंब !

## मानवतावादी परंपरा

वास्तविक पहाता गॉर्कीनी महान रशियन साहित्याची मानवतावादी परंपराच पुढे नेली. रशियन साहित्य म्हणजे चैतन्यसृष्टीला सहधर्मी समजून धगधगणाऱ्या हृदयाचे मानवी धर्म उत्कटतेने उजळणारें कणखर साहित्य ! सैरावैरा वहाणाऱ्या जीवनाच्या मूल स्त्रोताला मानव्याने घडवायची, मानव्यामध्ये वहायची, मानव्यात वाढवायची जिगीषा रशियन साहित्याने नेहमीच उराशीं बाळगली. मानवाने प्रयत्नशील राहिले पाहिजे हाच जणू रशियन साहित्याचा संदेश ! आणि म्हणूनच पुष्किन, लेर्मेन्तोव, तुर्गेनेव, गोगोल, टॉल्स्टॉय, दोस्तोयेवस्की, क्युप्रिन हे रशियामध्येच ख्यातनाम झाले असे नव्हे तर ते विश्वविख्यातही झाले.

## श्रद्धावान साहित्यकार

परंतु गॉर्कीचे साहित्य आणखी आगळे, आणखीन् न्यारे; कारण त्यांनी श्रमजीवी मानवाची क्रांतिकारी भूमिका पुष्ट केली. माणूस ! ओहो ! ! केवढा गौरव आहे या शब्दात नि केवढे उत्थान पण ! माणसाला माणूस म्हणून जगता यावे, माणूस म्हणून त्याला विकसित होता यावे व तेवढी त्याची क्षमता असून त्यासाठीच तो जन्मला आहे ही क्रांतिकारी मानवता-वादाची शिकवणूक गॉर्कीच्या साहित्यात ओतप्रोत भरलेली आहे. या शिकवणुकीसाठीच तर त्यांनी आपले महान साहित्य रचले. पण माणूस किंवा माणसे म्हणजे चिखलात रुतलेल्या गाई असून कोणीतरी त्यांच्याकडे अनुकंपेने पाहिले पाहिजे, कोणीतरी त्यांना हात दिला पाहिजे, अशा दृष्टीने गॉर्की लोकांकडे पहात नव्हते.

ज्या युगात आपण कोण आहोत हे श्रमजीवी जनतेला परिस्थितीच शिकवीत असते त्या युगात लाज, संताप, संस्कृती, धैर्य यांची बीजे जर जनतेच्या हृदयामध्ये रुजवली, तर उदात्त जीवन जगण्याची तिची शक्ती वाढू शकते व अशा रीतीने समाजाचा योग्य घटक बनलेला माणूस समा-जाशी फटकून न वागता समाजजीवनाला समृद्ध करणारा ठरू शकतो. समाजोद्धाराचा हा महामंत्र गॉर्कीनी आपल्या साहित्यात प्रभावीपणे ओतला.

भविष्यकाळातील माणसे सुंदर जग बनवतील अशी जबरदस्त श्रद्धा बाळगून लिहिणे हे तर गॉर्कीचे मुख्य वैशिष्टय होते. रशियाचे ज्येष्ठ आणि श्रेष्ठ साहित्यिक टॉल्स्टॉय यांच्याशी झालेल्या भेटीत आपण निरीश्वरवादी आहोत असे जेव्हा गॉर्की म्हणाले, तेव्हा टॉल्स्टॉय झटकन उद्गारले 'नाही, नाही. माझ्या तरुण मित्रा, तुझी सत्यावर अढळ निष्ठा आहे, मानवतेच्या भविष्यावर नितांत श्रद्धा आहे, ही निष्ठा नि श्रद्धा हाच ईश्वर.'

## गांठाळ लाकडाशी गांठ !

गॉर्की—साहित्याचा साकल्याने अर्थवेध घेतल्यास त्यामध्ये ही गोष्ट

स्पष्ट दिसते की, इतिहासाच्या सध्याच्या अवस्थेत सापडलेले मनुष्यजीवन म्हणजे गाठाळ लाकडाशी गाठ आहे. आणि म्हणून योग्य तीं हत्यारें बरोबर घेऊनच त्याच्याशी मुकाबला केला पाहिजे. या बाबतीत कल्पनारम्यतेत वावरणे म्हणजे पराभूत होणे होय. या जाणिवेतूनच गॉर्कीची प्रारंभीची कल्पनारम्यता नाहीशी होऊन ते वास्तववादी बनले व लेनिनना त्यांनी गुरू मानले.

## उग्र संघर्षाचा आरसा

जेवढे हृदयाने उच्चारलेले असते तेवढेच फक्त इतरांची हृदयें तुमच्याकडे जिंकून घेऊ शकते. गॉर्कीच्या साहित्याने सर्व जगातील वाचकांना जिंकून घेतले ते याच गुणामुळे. दलितांच्या जीवनाचे चित्रण करणारे विपुल कथासाहित्य त्यांनी लिहिले आहे. पैकी चेलकाश, म्हातारी इझेरगेल माकार चुद्रा, फोमा गोर्देयेव इत्यादी तर विश्वसाहित्यात जमा झालेले आहे. त्यांची 'आई' ही कलाकृती अमर मानली जाते. वास्तविक ही एक गरीब मायलेकांची गोष्ट. पण मानवी इतिहासातील एका संघर्षमय टप्प्याचा इतिहास त्यामध्ये सारभूत होऊन राहिलेला असून जीवनाच्या उग्र संघर्षाचा ती आरसा ठरलेली आहे.

पावेलची आई, जी प्रतिकूल परिस्थितीमुळे भेदरलेली अशी एक कामगार-स्त्री होती, तीच त्या परिस्थितीच्या चक्रव्यूहाचा योग्य तो बोध झाल्यानंतर, तो व्यूह भेदण्यासाठी क्रांतीच्या भात्यातून सुटलेला सणसणत जाणारा बाण बनते.

## बेताल वास्तववादापासून दूर

गॉर्की समाजसत्तावादी वास्तववादाचे जनक मानले जातात. पण साहित्यातला वास्तववाद ही काय चीज आहे बरे ? या वास्तववादाविषयी अँब्रोस बीअर्स म्हणतो, "वास्तववाद म्हणजे बेडकांना जसा दिसला तसा निसर्ग रंगविण्याची कला. एकाद्या चिचुंद्रीने जर निसर्गदृश्यांचे चित्र काढले

तर त्यातील सौंदर्य किंवा एखाद्या किडयाने लिहिलेली कथा म्हणजे वास्तववाद !"

अर्थात, गॉर्कीचा वास्तववाद असा बेताल नव्हता हे वेगळे सांगण्याची आवश्यकताच नाही. कारण समाजसत्तावादी वास्तववादात खरीखुरी माणसेच वावरतात. खरीखुरी भुते असली तर त्यांना माणसात आणण्याची भावना व त्यासाटी भगीरथ प्रयत्न हा समाजसत्तावादी आकलनाचा गाभा असतो. समाजसत्तावादी वास्तववादामध्ये दृश्याबरोबरच दृष्टीलाही तेवढेच महत्व दिले जाते व वैयक्तिक अस्मितेबरोबरच सामाजिक अस्मिताही त्यामध्ये अंतर्भूत झालेली असते.

## समाजसत्तावादी ध्येयवाद

समाजसत्तावादी वास्तववाद हा ध्येयवादी असतो. परंतु ध्येयवाद म्हणजे केवळ कल्पनारम्यता नव्हे. ध्येयें पृथ्वीवरचीच असली पाहिजेत व तीं युगाला धरुन असली पाहिजेत. जी ध्येयें गॉर्कींच्या साहित्यात प्रकट होतात तीं ध्येयें मानवतेने आणि रशियन जनतेने आधीच निर्माण केलेली होती. गॉर्कींनी तीं त्याच जनतेसमोर अगदी आरशाप्रमाणे धरली एवढेच. हजारो वर्षांच्या कालावधीत जनतेने पोसलेले आदर्श समर्थपणे जनतेसमोर ठेवण्याचे काम फक्त साहित्यकारच करु शकतो व ते त्याचे कर्तव्यकर्म असते.

शिवाय, प्रतिभावान साहित्यकाराचे केवळ चालू घडीचा वास्तव पाहून भागत नाही. तर इतिहासाच्या उदरात आज बंदिस्त होऊन पडलेला, पण उद्या अवनीतलावर उतरु शकणारा वास्तवही त्याला दिसणे आवश्यक असते. समाजसत्तावादी उत्तुंग ध्येयवादी बाजू सुरु होते ती इथून.

## जनता मालमसाला नव्हे !

गॉर्कीच्या काळचें रशियातील मूर्तिमंत जीवन म्हणजे घाण्याला जुंपलेल्या बैलाप्रमाणे मरमरेतो काम करून जे थकलेले आहेत व आशेचा किरण पहाण्याची ज्यांची आशा मावळत चालली आहे, अशा हताश बहुजनसमाजाचे

जीवन होते. काय, या बहुजनसमाजाच्या जीवनातून कधीच काही निष्पन्न होणार नाही ? काय, बांधलेल्या हातांनी जीवनाची चोरी, नागवणूक आणि पराभव पहाण्यासाठीच केवळ प्रतिभेचा जन्म झालेला आहे ? काय, मूठभरांची भर आणि खंडोगणतीच्या जीवनाची उधळमाधळ, नासधूस, खूनखरावी मुकाटचाने पहावयाची आणि परिस्थितीने किडे बनलेल्या जनतेचे चिचुंद्रीच्या दृष्टीतून वास्तववादी वर्णन करण्यात प्रतिभेने धन्य मानावयाचे ? गॉर्कीनी साफ उत्तर दिले. नाही. कदापी नाही. जग जगणारा मानव हा चालू काळाच्या वाङमयातील मुख्य नायक असला पाहिजे. या नायकाच्या उक्तीत व कृतीत मेळ असला पाहिजे असे गार्की मानीत.

लेखकाच्या वैयक्तिक आशाआकांक्षांपेक्षा समाजाच्या आकांक्षा श्रेष्ठ आहेत. लेखकापेक्षा जनता श्रेष्ठ आहे. केवळ लेखकांच्या पुस्तकांचा भार डोक्यावर वहाण्यासाठीं व आपल्या हृदयसिंहासनावर लेखकाला विराजमान करण्यासाठीच जनता नाही. म्हणून गॉर्कीनी वैयक्तिक सुखावर निखारे ठेवले आणि आयुष्यभर सामाजिक ध्येयासाठी ते जगले, निवर्तले.

# गांधी-लेनिन

नजर न पोचण्याइतक्या दूर ओसाड वाळवंटात शीतळ चंद्राने भरतीची पहिली लाट उठवलेली असते व ही लाट पुढे आजूबाजूच्या खाड्यांत व नद्य-नाल्यांत शिरते, तशीच गांधीजीमुळे राष्ट्रीय स्वातंत्र्य-लढ्याची लाट उभ्या भारतांत व लेनिनच्या कर्तृत्वामुळें समाजसत्तावादाची लाट अलम दुनियेंत उठली आहे. या लाटा एकमेकांत मिसळून आता जगभर पसरत आहेत.

भारतामागून पन्नासावर राष्ट्रांनी स्वातंत्र्य हस्तगत केले आणि रशियातील विजयी आक्टोबर क्रांतीनंतर अमेरिकेतील क्युबासकट १६ समाजसत्तावादी राष्ट्रे जलद गतीने प्रगति करीत आहेत. शिवाय, अल्जेरिया संयुक्त अरब राष्ट्र, गिनी, ब्राझाव्हीय, तान्झानिया, बर्मा आदि नव-स्वतंत्र राष्ट्रांनी समाजसत्तावाद स्वीकारला नसला तरी भांडवलदारी मार्ग बहुतांशी सोडला असून भारतही त्या दिशेने आज प्रयत्नशील आहे.

पश्चिम युरोपांतील इटली, फ्रान्स, प. जर्मनी आदी जुन्या भांडवलदारी राष्ट्रांत कम्युनिस्ट पक्ष बलाढ्य बनत आहेत तर जपान, इंग्लंड,

अमेरिका आदी साम्राज्यवाद्यांच्या बालेकिल्ल्यांत बेकारी, गुन्हेगारी, असुरक्षितता व बेसुमार वाढणारी आर्थिक विषमता यामुळे प्रचंड असंतोषाचे उद्रेक उठत आहेत. आणि भरीला हिप्पींचे संस्कृतीविनाशक चाळेही चालू आहेत.

शस्त्रास्त्रांच्या कारखानदारांना गबर बनवण्याकरता व्हिएतनाम, पॅलेस्टाइन वगैरे ठिकाणची अन्यायी युद्धे चालू ठेवण्यांत आल्याने अमेरिकेतला युवक चवताळला आहे. एवढेच नव्हे तर हजारोंच्या संख्येने ते सैन्यातून पळ काढून इतर देशांत वसाहती स्थापून जगत आहेत. खुद्द अमेरिकेत राष्ट्राध्यक्षांचे, शासनाधिकाऱ्यांचे आणि परराष्ट्रीय राजदूतांचेहि खूनामागून खून पडत आहेत. धनकुबेर वाटणाऱ्या अमेरिकेची दुर्दशा आतां सुरू झाली आहे.

लेनिनच्यावेळी कम्युनिस्टांची संख्या मूठभर होती व ते गचाळ आणि गुंड लोक आहेत असेच विरोधकांना वाटे. त्यामुळे रशियन क्रांति औट घटकेत खतम होईल असे भाकीत चर्चिल साहेबांनी वर्तवले होते. परंतु जगांतील कष्टकरी वर्गाच्या पाठिंब्याने रशियन क्रांति यशस्वी झाली हेच त्याचे एकमेव वैशिष्टच नव्हे. अमेरिकन व फ्रेंच क्रांत्याही कमी महत्वाच्या नव्हत्या व त्यानीही मानवी इतिहासाला एका टप्प्याने वर खेचले. पण रशियन क्रांतीचे मुख्य वैशिष्टच म्हणजे आज पन्नास वर्षांनंतरदेखील ती क्रांती चिरतरुण व नवनवोन्मेषाने ओतप्रोत भरली आहे. इतर क्रांत्या लगेच विरल्या आणि जिरल्या. पण लेनिनची क्रांती मूलतः विधायक असल्यामुळे फोफावत आहे.

जगभर वाढणारी कम्युनिस्टांची संख्या आज पाच कोटीवर गेली असून 'युनेस्को' ह्या जागतिक संघटनेच्या अहवालानुसार लेनिनच्या पुस्तकांइतकी मागणी व खप दुसऱ्या कशालाही नाहीं. लेनिन साहित्याच्या जागतिक खपाने बायबलादी धर्मग्रंथांनासुद्धां मागे टाकले आहे.

गांधीजींच्या तत्त्वज्ञानाचा प्रभावही जगांत अनेक ठिकाणी अनेक

लोकांच्या मुखांतून व सरहद्दगांधी गफारखान, दि. मार्टिन ल्युथर किंग वगैरे सारख्यांच्या कृतींतूनही व्यक्त होत असतो.

गांधीजी आणि लेनिन ह्या दोघांचीही जीवने म्हणजे शोषित, पद-दलीत मानवतेने जनसेवेच्या वेदीवर अर्पिलेलीं महामंगल फुलेंच जणू ! त्यांना कष्टकरी मानवतेविना दुसरे काय दिसले ? त्या दोघांनीही उराशी बाळगलेली गोष्ट म्हणजे निर्भय नीतीयुक्त मानवाचे पुर्ननिर्माण. शोषणरहीत अशा न्यायी जगाची प्रस्थापना. भव्योदात्त मानव्याची उभारणी.

भारतांत गांधीजीपूर्वी व जगांत लेनिनपूर्वी, स्वातंत्र्याचे व समाज-सत्तावादाचे अनेक उद्‌गाते व नेते होऊन गेले. त्यानी बजावलेली कामगिरीही कमी महत्वाची नव्हती. लेनिनपूर्वी समाजसत्तावादी तत्त्वज्ञा-नाचे विश्वविख्यात प्रणेते कार्ल मार्क्स आणि फ्रेडरिक एंगल्स हेही होऊन गेले. भारतांत राजा राममोहन रॉय, दादाभाई नवरोजी, महर्षी रानडे, लोकमान्य टिळक, स्वा. सावरकर, देशभक्त भगतसिंग, नेताजी सुभाष आदि घनगंभीर व्यक्तिमत्वें चमकलीं. कित्येकांनी पारतंत्र्याची खंत बाळगली, कांहीनी वासाहतीक मागासलेपणाची मीमांसा केली, तर कांही बंड करून उठले व पडलेही.

भारताच्या उत्थापनाचीं स्वप्ने बाळगणारे हे असामान्य पुरुष प्रामु-ख्याने भारतांतील दारिद्र्य–नाशाकरताच झटणारे होते. फरक इतकाच कीं महर्षी रानडे व लोकहितवादींसारखे विचारवंत, भारताचे दारिद्र्य फार जुनाट असून भारतीय समाजरचनेतच तें अंगभूत आहे असें मानीत व त्याचे सर्व पाप ब्रिटिश हुकमतीवर लादायला तयार नसत; तर रमेशचंद्र, दादा-भाई नवरोजी, जवाहरलाल नेहरु, समाजवादी आणि कम्युनिस्ट, ब्रिटिशांनीं चालवलेल्या लुटीवर अधिक भर देत.

गांधीजीहि साम्राज्यवाद्यांवर तूटून पडत. पण आधुनिक भांडवलदारी समाजरचनेचे शास्त्रशुद्ध ज्ञान त्यांच्यापाशी नसल्यामुळे ते प्राचीन भारताकडे आणि विशेषतः ग्रामीण समाजजीवनाकडे लोभस नजरेने बघत.

त्यामुळें गांधीजी मानवजातीला शोषणरहित समाजरचनेच्या निर्मितीकडे खेंचू शकले नाहीत.

परंतु लेनिन, भांडवलशाही व साम्राज्यशाही ह्यांचेंच विश्लेषण करुन थांबले नाहीत. तर तत्पूर्वीच्या समाजरचनांचेंही तितक्याच शास्त्रशुद्ध पद्धतीने त्यांनी विश्लेषण केले व गतकालीन समाजरचना आंतां दुरुन कितीही गोंडस वाटत असल्या तरी भांडवलदारी लोकशाही समाजरचनेच्या मानाने त्या निकृष्ट होत्या. व मूठभर राजेलोकांच्या अगर जात–जमात प्रमुखांच्या जुलूमशाहीखाली वांकलेल्या होत्या असे सिद्ध केले. आणि चालू भांडवलदारी समाजरचनेतूनच अटळपणे उद्‌भवणाऱ्या समाजवादी समाजरचनेकडे धाव घेतली. मानवी भवितव्याच्या अशा प्रकारच्या दिग्दर्शनामुळेंच वर्तमान इतिहासाला ते जागतिक चालना देऊं शकले.

दुनियेतील कोपरान् कोपरा आज लेनिनच्या बिचारांनी घुमत आहे. साम्राज्यवाद्यांच्या मगरमिठींतून सुटलेली कष्टकरी जनता आपल्या भवितव्याच्या घडणुकीसाठी जुन्या रानवट टोळयांच्या समाजरचनेकडे किंवा पूर्वीच्या सरंजामी निमसरंजामी समाजरचनेकडे न वळतां आपापल्या देशांच्या त्वरित औद्योगीकरणाकडे, त्यांतून निपजणाऱ्या कामगार वर्गाकडे व समाजसत्तावादाकडे आगेकूच करीत आहे.

गांधीजीना यंत्र व शोषण दिसलें. पण कामगार वर्गाची वाढती शक्ती व त्या वर्गाच्या हातून निर्माण होऊं शकणारा नवसमाज दिसलाच नाही. म्हणून, तुम्ही पुण्यवान बना असें यंत्रांच्या व भांडवलाच्या मालकांना आर्जवून आर्जवून सांगून त्यांच्या पदरांतच मोठमोठ्या उद्योगधंद्यांचे विश्वस्तपद टाकून ते मोकळे झाले.

भांडवलदारी जीवनातील भयानकतेला भेदरून कधी यंत्राला शाप दे, कधीं आधुनिकतेवर कोरडे ओढ, कधी भौतिक प्रगतीच कुचकामी ठरव व शेवटी मानवातील आत्म्याला आळव, अशा प्रकारची परिणामशून्य विचारसरणीच गांधीजी पुढे करीत राहिले. आणि अशा सामाजिक व्यवस्थेच्या परि-

स्थितीत त्यांना आशेचा किरण कुठें दिसला तर तो ग्रामीण शेतकरी जीवनामध्ये !

म्हणून सामाजिक दृष्टचा गांधीजी मागे पहाणारे व लेनिन पुढे पहाणारे असा या दोन महापुरुषांच्या विचारांत फरक दिसतो व हा फरक दोघांच्या समग्र विचारसरणीत स्पष्टपणे जाणवतो.

लेनिन व्यक्तिगत दैववादाऐवजी मानवी सामुदायिक प्रयत्नांचे फळ चाखू पाहाणारे, भोळेपणाऐवजी बुद्धिवाद कामाला लावणारे, गूढाऐवजी वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारणारे, प्राथमिक अवस्थेतील स्वैर असंघटित जीवनाऐवजी समाजविकासाच्या नियमांनी संयमित झालेल्या व्यक्तिजीवनाचा पुरस्कार करणारे, तर गांधीजी नवसमाजरचनेचे सामाजिक दिग्दर्शनच करुं शकले नाहीत. त्यांचा सारा भर व्यक्तीच्या व्यक्तिगत नि आत्मिक जीवनावरच राहिला. उच्च दर्जाच्या सामाजिक विश्लेषणाची शक्ती गांधीजीपाशी एकंदरित कमीच होती असेंच मत जवाहरलाल नेहरु, राम मनोहर लोहिया, धर्मानंद कोसंबी, साने गुरूजी, आचार्य अत्रे आणि रवींद्रनाथ टागोर यांनीसुद्धां व्यक्त केले आहे. म्हणून, गांधीजी रोग्याच्या रोगाबाबत विशेष ज्ञान नसणाऱ्या आप्तासारखे वाटतात, तर लेनिन रोग्याचें व रोगाचेंही सखोल ज्ञान असलेल्या धन्वंतरी आप्तासारखे वाटतात.

देशाला स्वातंत्र्य प्राप्त होऊन वीस वर्षांचा अवधी लोटला तरीही भारतांत नवे–जुने जे महत्त्वाचे प्रश्न आहेत त्याबाबत गांधींजींचे उपाय फळें न येणाऱ्या सुकलेल्या वृक्षाप्रमाणेंच भासतात. खुद्द गांधींजींनी एकदा म्हटलें आहे कीं, "ज्या झाडाला फळें येईनाशी होतात तें मरतें, त्याचप्रमाणे माझ्या सेवेलाही जर फळें येत नसतील तर हे सारे काय कामाचें ?"

गांधीजी व लेनिनविषयीं वरवर दृष्टीने विचार करणारे लोक गांधींजी अहिंसक मार्गाचे उपासक होते, तर लेनिन हिंसाचारी मार्गाचे पुरस्कर्ते होते असे प्रतिपादन करतांना आढळतात. त्यांच्या या प्रतिपादनाइतकें भोंगळ प्रतिपादन दुसरें असू शकत नाही. एकतर, कोणत्याही परि-

स्थितीत अहिंसाच योग्य असते, असें सांगण्याचा ठोकळेबाजपणा गांधींजीवर लादणें सत्याला सोडून होईल. कारण, भारतातून बऱ्या मार्गानी इंग्रज गेले नाहींत तर प्रसंगी हिंसेचा अवलंब करुनही त्यांना घालवायला आपण मागेपुढें पहाणार नाही, असे त्यांनीं स्पष्ट बजावले होतें.

तसेंच लेनिननेही हिंसा हेंच समाजसत्तावादी स्थित्यंतर घडवून आण—ण्याचें एकमेव साधन आहे असें कधींच शिकवलेलें नाहीं. समाजसत्तावादी क्रांतीच्या सिद्धिसाठीं शत्रूंना पराभूत करण्याच्या कामी जेव्हां जीं साधनें परिणामकारी ठरतील तीं वापरावींत, असेंच लेनिनचें वास्तववादी तत्त्वज्ञान आहे. कोणता मार्ग केव्हां चोखाळावा हें त्या त्या देशांतील अंतर्गत परिस्थिति आणि आंतरराष्ट्रीय परिस्थितीवर अवलंबून राहील, असेंच लेनिनचें म्हणणें आहे.

वस्तुत: गांधीजी हे मुरब्बी मुत्सद्दी होते. त्यांना अहिंसेची पोपटपंची करणारे बालबोध असामी समजणे चूक आहे. तसेंच लेनिन हे महामानवता-वादी, क्रांतिकारकांचे मुकुटमणी. त्यांनाही रक्तपिपासु, हिंसाचारी ठरवणे सत्याचा अपलाप करणे होय.

महात्मा गांधी आणि लेनिन दोघांचेही ध्येय अतीं जरी समान असलें तरी प्राप्त परिस्थितीला धरुन समाजसत्तावाद साध्य करण्यासाठी आज नि उद्या गांधीजींच्या शिकवणुकीपेक्षा लेनिनची शिकवणूकच शास्त्रशुद्ध असून इप्सित फळ देणारी आहे – समाजक्रांतीला पुढे नेणारी आहे.

●●●

१८०८४
स्थळ प्रत

# लेनिन : सजीव, सर्वव्यापी

आज या पृथ्वीतलावर ३०० कोटींवर जनता रहात आहे. पैकी १०० कोटीवर जनता समाजसत्तावादाची उभारणी करण्यात व्यग्र आहे. महान ऑक्टोबर क्रांतीच्या विजयाने प्रथम रशियामध्ये आणि तदनंतर साऱ्या जगात समाजसत्तावादाची उद्दिष्टयें वास्तवात उतरविण्याचा मार्ग मोकळा केला.

ऐतिहासिक दृष्टया अल्पशा काळामध्ये सोविएत संघराज्याने आपला शतकानुशतकांचा मागासलेपणा नाहीसा करून एक सामर्थ्यवान प्रगत राष्ट्र म्हणून विकास घडवून आणला, तो आपल्या निढळाच्या घामाने, रक्ताने आणि लेनिनच्या शास्त्रशुद्ध विचारांनीच होय.

युगकर्त्या लेनिनचे आचारविचार आज समाजसत्तावादी जगाच्या बाहेर जी कोटयवधी जनता आहे त्या कोटयवधी जनतेचे शक्तिस्थान नि स्फूर्तिस्थान बनलेले आहेत. कमीअधिक प्रमाणात भांडवलदारी समाजसत्ता असलेल्या या जगात लेनिनच्या विचारांशी उघड सामना करण्याची ताकद कमी कमी होत चालली आहे आणि त्याचे मुख्य कारण म्हणजे वस्तुतःच

भांडवलदारी रचनेचा पाया संकुचित होत असून जागतिक भांडवलशाही आज उतरंडीला लागलेली आहे हे होय.

दुसरे कारण म्हणजे साक्षरता नि विज्ञान यांच्या वाढीमुळे कोटयवधी लोक डोळे उघडून जीवनाकडे आज पाहू लागले आहेत किंवा लेनिनच्या शब्दांत त्यांना प्रकाश व स्वातंत्र्य याची जाण आली आहे. कांहीही असले तरी आज आम्ही रहातो त्या लेनिन–युगात भांडवलदारी विचार निर्जीव नि निःसत्व ठरत चालले आहेत हे स्पष्ट दिसतें.

## वैचारिक बाण मोडला

वसाहतवादाचें जगांत नामोनिशाणही उरता नये या लेनिनवादी आचारविचाराशी साम्राज्यवादी कसा सामना देणार ? सशक्ताने अशक्तावर सत्ता गाजविणे हा नैसर्गिक धर्म आहे, हा जंगली राज्यातील नियम घोकूनच ना ? पण आम्ही कोटयवधी माणसे संस्कृतीच्या राज्यात रहातो, जंगलात नव्हे याची जाणीव पांचही खंडांतील जनतेला आज होऊ लागल्यामुळे गुलामगिरीच्या पुरस्कर्त्यांच्या भात्यातील तो ओंगळ वैचारिक बाण आज मोडून पडला आहे व साम्राज्यवादी राजकारणात निव्वळ प्यादी बनून राहिलेले वसाहती देश एकामागून एक मुक्त होत चालले आहेत.

लेनिनच्या नवजात सोविएत देशापुढे प्रचंड आर्थिक अडचणी होत्या. तो देश आक्रमकांनी वेढलेला होता. तरी देखील साम्राज्यशाहीसमोर दंड थोपटून उभ्या असलेल्या वसाहतीतील स्वातंत्र्यवादी जनतेच्या लढ्यांना मदत देण्याचे आपले कर्तव्य त्या देशाने पार पाडले. भारताला आणि भारतासारख्या अन्य देशांना नैतिक, राजनैतिक आणि अतिशय महत्वाची अशी इतर मदत तो देश सतत देत आला आहे. या उलट, साम्राज्यवादी रक्तपिपासू आपल्या स्वार्थी वृत्तीचेंच उघडे नागडे स्वरूप अजूनही मोसांबिक, अंगोला आदि पोर्तुगीज वसाहतींमध्ये आणि इतरत्र दाखवीतच आहेत.

## अविकसित राष्ट्रांना मदत

विकसित राष्ट्रांनी अविकसित राष्ट्रांना मदत केली पाहिजे व तीही कोणत्याच प्रकारच्या शोषणाची दृष्टी न ठेवता केवळ सद्भाव नि दोस्तीने प्रेरित होऊन, या लेनिनवादी थोर विचाराची परिणतीच आज अरब जग नि विएतनाम, क्युबा आणि बांगला देश धरून जगातील इतर राष्ट्राना होणाऱ्या समाजसत्तावादी राष्ट्रकुलाच्या भरीव सहाय्यात दृग्गोचर झाली आहे.

ही मदत सार्वजनिक विभागातील उद्योगधंद्यांनाच होत असते. या उलट नवस्वतंत्र राष्ट्रांना नेहमीच आपल्या आर्थिक पंजाखाली ठेवण्याच्या पद्धतीने साम्राज्यवादी व्यवहार चालत असतो.

परंतु, साम्राज्यवाद्यांच्या या स्वार्थी कृत्यांनी वासाहतिक व्यवस्थेची दाणादाण झाली आहे. अर्थात हा काही योगायोग नव्हे. आर्थिकच नव्हे तर सांस्कृतिक उभारणीतला आपला अनुभव सर्व लेनिनवादी राष्ट्रें अविकसित पण विकसनशील अशा देशांना उदारपणे देत असतात याचाच तो परिणाम आहे.

लॅटिन अमेरिकेतील राष्ट्रांना स्वतंत्र होऊन १५० वर वर्षें लोटली. तरी त्यांच्यापैकी एकाही राष्ट्राला आपली स्वतंत्र उन्नती तर सोडाच पण धड आपले आर्थिक स्वातंत्र्यही टिकविता आलेले नाही व त्याचे कारण म्हणजे तीं राष्ट्रे लेनिन युगाच्या उदयाआधी आणि लेनिनवादी राष्ट्रें त्यांना मदत करू शकण्याच्या परिस्थितीपूर्वी स्वतंत्र झाली होती. लेनिन-युगाच्या वाढत्या ताकदीमुळेच समाजसत्तावादी क्युबाचे अस्तित्व नि दैदिप्य-मान विकास जगाला आज दिसतो आहे.

नवस्वतंत्र देशांना समाजसत्तावादाकडे आगेकूच करता येणे जर शक्य झाले नाही, तर त्या त्या देशांतील भांडवलदार आपापले आर्थिक आणि राजकीय स्थान भक्कम करू लागतात आणि भांडवलशाहीतील दुष्ट प्रवृत्ती वाढत्या प्रमाणात प्रत्ययास येऊ लागतात.

## राष्ट्रीयीकरण ही किमान गरज

या कालखंडांत बिगर-भांडवलदारी मार्गाचा अवलंब करून आपला विकास साधण्याचा निर्धार व तयारी विकसनशील देशांना करणे आवश्यक असते. राष्ट्रीय विकासाचा बिगर-भांडवलदारी मार्ग ही एके काळी असंभवनीय वाटणारी गोष्ट समाजसत्तावादी राष्ट्रांच्या मदतीने आज शक्यतेच्या कोटींत आली आहे.

परंतु ज्या नवस्वतंत्र देशांमध्ये बिगर-भांडवलदारी मार्ग स्वीकारण्यात येत नाही तिथे देशांतर्गत मक्तेदारी भांडवलशाही अतोनात वाढते आणि कष्टकरी व मध्यमवर्गीय जनतेची बेसुमार पिळवणूक होते.

अशावेळी मक्तेदारी नष्ट करण्यासाठी बड्या उद्योगधंद्यांचे लोकशाही-वादी राष्ट्रीयीकरण करणे हीच गरीब व शोषित जनतेला वांचविण्याची किमान गरज असते.

नवस्वतंत्र देशांतील भांडवलशाही म्हणजे एकसंध वर्ग अजिबात नसतो. त्यांच्यातील गटागटांत अंतर्विरोध असतात. क्रांतिकारी शक्तींनी हे अंतर्विरोध हेरून त्यांचा पुरेपूर फायदा घेणे आवश्यक असते. नवस्वतंत्र देशांच्या विकासमार्गासंबंधीची ही बहुमोल लेनिनवादी शिकवणूक आज आपला भारत धरून सर्व नवस्वतंत्र देशांमध्ये उघड होत आहे.

## जगाला आदर्श

युद्ध आणि शांततेच्या प्रश्नांबाबत लेनिनचे आचारविचार तर अग्नी-तून तावूनसुलाखून निघालेल्या सुवर्णासारखे आहेत. सर्व जगातील जनता शांतताप्रिय असून तिला शांतताच हवी आहे. तसेच इतिहासाची समाज-सत्तावादी धारणा युद्धाची अटळता मुळींच मानीत नाही असे लेनिन यांचे प्रतिपादन होते. इतकेच नव्हे तर या धारणेवरच शांततामय सह अस्तित्वाचा सिद्धांतही त्यांनी आधारला.

या उलट, विश्वयुद्ध झाल्यास कोणत्याही क्षणी बळी पडू शकणाऱ्या कोटयवधी प्रापंचिक जनतेला साम्राज्यवादी युद्धखोर काय सांगतात ? तर युद्धखोरी ही माणसाच्या स्वभावातच आहे. मानव मानव असेतोवर युद्धे खेळतच रहाणार; एक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्राला खतम करीतच रहाणार; आणि युद्ध सामग्रीचे उत्पादन करणारे कारखानदार अमाप पैसा लाटतच रहाणार ! केवळ लेनिनवादी राष्ट्रांची पक्की मती व भक्कम कृती यामुळेच युद्धखोर शक्तींना विश्वयुद्ध छेडण्याची आज हिंमत होत नाही.

हीच गोष्ट जातीयवाद, वर्णवाद, दलितांचे भाषा–उपभाषांचे प्रश्न आणि राष्ट्रीयत्वाच्या प्रश्नांबाबत आहे. या सर्व प्रश्नांवर लेनिनचे विचार पायाभूत आणि प्रदीर्घ काल मार्गदर्शन करणारे आहेत. तें मार्गदर्शन लाभलेला सोविएत देश या सर्व प्रश्नांच्या बाबतीत जगातील संपूर्ण दलित, पीडित, शोषित जनतेचा आज आदर्श बनला आहे.

## गणित सुटले !

अमेरिकेत महात्मा मार्टिन ल्युथर किंगच्या झालेल्या शोकांतिकेने कुणाच्या हृदयाला पाझर फुटल्याशिवाय राहील ? मार्टिन ल्युथर किंगच्या वडिलांचा आवडता विषय गणित होता असे सांगतात. परंतु त्यांच्या देशांतील एक गणित मात्र त्यांना कधीच सुटलेलें नाही. आई वगळून कुटुंबातील सगळी मंडळी दिवसभर राबतात. रविवार हा फक्त सुट्टीचा दिवस. म्हणजे बाराजण आठवडयातील सहा दिवस शेतात काम करतात. बाराला तासांनी आणि दिवसांनी गुणले म्हणजे कितीतरी मोठा आकडा होतो आणि शेताचा तो गोरा मालक आपल्या अर्ध्याइतकेदेखील श्रम करीत नाही. पण उत्पन्नाचा अर्धा वाटा मात्र खुशाल लंपास करतो. बारा माणसांची राबणूक एका बाजूला आणि त्याच्या अर्धा वेळ एका माणसाचे श्रम दुसऱ्या बाजूला. हे ते महात्मा ल्युथर किंगच्या पित्याला न सुटलेले गणित. हे गणित समाजसत्तावादी क्रांतीने सोडवलें.

## मार्गदर्शक विवेचन

क्रांति का होते ? क्रांतीची आवश्यकताच काय ? क्रांति कशी साध्य

होते ? इथून क्रांतिशास्त्राची सुरवात होते. क्रांतिकारकांना हवीशी वाटली म्हणून क्रांति होते काय ? नाहीं. क्रांतीचा जयघोष करून खूप हैदोसहुल्ला केला तरिहि ती होत नाहीं. कारण क्रांति ही फक्त क्रांतिकारकांच्या मनावर, त्यागावर, निर्धारावर अवलंबून नाहीं. तसेच क्रांतिकारकांची इच्छा किंवा निर्धार म्हणजे क्रांतिसाधना असेहि नव्हे. क्रांतिकारी महत्वाकांक्षा, जिद्द, वज्रनिर्धार हे गुण क्रांतिकालामध्यें फार महत्वाचे असले तरी लेनिनच्या शिकवणुकीनुसार क्रांतिकारक परिस्थितिविना क्रांति सिद्ध होत नाहीं. त्यासाठीं काल्पनिक क्रांतिवाद ( Subjective revolutionism ) किंवा सदिच्छावाद बाजूला सारून क्रांतिकारकांनी वास्तव परिस्थितीलाच गुरु मानले पाहिजे.

कुठल्याहि देशांत क्रांतिकारक परिस्थिती तयार झाली आहे हे कसें ओळखावे व त्याचीं लक्षणें काय, तेहि लेनिनने सविस्तर सांगितले आहे. लेनिनचे हें विवेचन जगातील सर्व क्रांतिकारी पक्षांना आफ्रिकेपासून लॅटिन अमेरिकेपर्यंत आजहि कमीअधिक प्रमाणात मार्गदर्शक ठरत आहे.

क्रांतिकार्यांत साहसबाजी व दहशतवाद लेनिनने त्याज्य मानला. त्याचप्रमाणे पंथवादी प्रवृत्ति, पोथी–प्रामाण्य, ठोकळेबाजी याहि गोष्टी क्रांतीचा विकास रोखून धरतात. अतिरेकी कम्युनिझम आणि अतिरेकी घोषणाबाजीला तर लेनिनचा सख्त विरोध होता. अतिरेकी (ट्रॉटस्कीवादी) घोषणाबाजीच्या मोहाने क्रांतिकारक क्रांति हातची घालवून बसले, असें सांगण्याची पाळी इतिहासावर आणू नका असे क्रांतिकारकांना त्यानी बजावून सांगितले आहे. ( पहा. ‘ Left Communism an Infantile Desorder ’ ले. लेनिन )

## बंड आणि क्रांती

प्रत्येक समाजामध्ये जो असंतोष असतो त्या असंतोषाविरुद्ध उठाव करणे वेगळे व त्या असंतोषाची कारणे इतिहासजमा करून त्या जागीं विधायक उभारणी करणें वेगळे. पहिल्या गोष्टीला बंड म्हणतात तर दुसऱ्या गोष्टीला क्रांति म्हणतात.

विशिष्ट जुने नष्ट करणे एवढाच बंडाचा विधि असतो. तर प्रामुख्याने संपूर्ण नवी घडी बसवणें व त्या अनुषंगाने जुने टाकून देणे असा क्रांतीचा कार्यक्रम असतो. यावरून केवळ असंतोषाचा परिस्फोट व मोडतोड म्हणजें क्रांति नव्हे हे स्पष्ट होते. नाही तर आज हिप्पींचा चाललेला गोंधळ हीहि क्रांति ठरली असती !

## सजीव, सर्वव्यापी !

मानवजातीची पिळवणुकीपासून कायमची मुक्तता करणे; दैन्य, उपासमार, क्लेश, हालअपेष्टा, विध्वंस व युद्धापासून मुक्तता करणें; जनतेला भरपूर भौतिक आणि अध्यात्मिक मूल्यांचा लाभ उपलब्ध करून देणे; या सर्व गोष्टी घडवून आणणारीं क्रांतिकारी स्थित्यंतरें इतिहासाच्या पोटी चालू असून तीं आता सामोरीं येण्याचा हा काळ आहे.

या स्थित्यंतरांतून निर्माण होणारी समाजसत्तावादी क्रांती म्हणजे प्रत्येक देशात तेथील भांडवलदारांविरुद्ध क्रांतिकारी कामगारवर्गाचा चाललेला एकमेव लढा नव्हे–तो साम्राज्यवादाने दडपलेल्या सर्व वसाहतींचा व देशांचा लढा असेल.

समाजसत्तावादासाठी श्रमिक वर्गाने चालविलेला संघर्ष आणि व्यापक लोकशाहीवादीं चळवळ हीं एकाच संघर्षांची दोन अंगें असून ती अतूटपणे निगडित झालेली असतात. लोकशाहीसाठी होणाऱ्या या संघर्षामुळे श्रमिकवर्ग समाजसत्तावादी क्रांतिपासून विचलित होईल असे मानणे किंवा या संघर्षांमुळे समाजसत्तावादी क्रांती मागे पडेल किंवा दृष्टिपथात येणारच नाही असे मानणे हे विचार म्हणजे अतिजहालवादी चुका होत अशी लेनिनची शिकवणूक आहे.

क्रांतिकारी स्थित्यंतरांतून समाजसत्तावादी समाज निर्माण करण्याचे लेनिनवादी नियम परिस्थितिनुरूप कसे लागू करावेत या बाबतीतही लेनिनने आपल्या स्वतःच्या उदाहरणाने धडा घालून दिला आहे.

स्वत: लेनिन, कार्ल मार्क्स आणि एंगल्स या आपल्या गुरुंच्या तत्वांना निर्जीव मृत पोथीचे स्वरूप देण्याच्या प्रयत्नांविरुद्ध होते. त्या त्या देशाची राष्ट्रीय वैशिष्टयें, परंपरा, आर्थिक-सामाजिक आणि सांस्कृतिक विकासाची पातळी, तसेच जगांत होणारे नवीन बदल जमेला धरूनच पुढे जावयाचे असतें असें लेनिनने शिकविले.

युगकर्त्यां लेनिनचीं अशा प्रकारची सजीव आणि सर्वव्यापी शिकवणूक हीच समाजसत्तावादासाठी चाललेल्या जागतिक लढयाला लेनिनची सर्वोत्कृष्ट साथ आहे.

●●●

# स्त्री - पुरुषसंबंध आणि समाज विकास

आपल्या जीवनात मूलभूत अशा ज्या काही गोष्टी आहेत त्यामध्ये आपले श्रम आणि आपलें प्रेम ह्या गोष्टी सर्वप्रथम आहेत. मानवाच्या श्रमाने नि मानवाच्या प्रेमामुळेच आपलें प्रपंचविश्व उभें आहे. श्रम-शक्तीच्या बरोबर मनुष्याच्या अंतःकरणात जिवंत नि जागृत प्रेमभावना वास करत नसली तर जीवन शुष्क नि जगण्याला सुद्धा लायक उरणार नाही. परंतु, प्रेमभावना अनेक मानवी संबंधांच्या मुळाशी असली तरी तिचा मनोहारी आविष्कार मात्र स्त्री–पुरुषसंबंधांतच व्यक्त होत असतो.

## मनमोकळा परिचय

सध्याचे स्त्रीपुरुषसंबंध म्हटले म्हणजे सकृतदर्शनी पतिपत्नीचे संबंध असेच समजण्यात येतें. तथापी, स्त्रीपुरुषांमधले नैसर्गिक संबंध फक्त पति-पत्नीच्या किंवा कौटुंबिक नात्यापुरतेच मर्यादित असतात किंवा असावेत असे समजणे चूक आहे. पतिपत्नीच्या किंवा आप्तस्वकीयांच्या संबंधांपेक्षा

सामाजिक सहकार्याचे संबंध अधिक स्वाभाविक आणि व्यापक असतात. तसेच ते वयोमर्यादेचे बंधन नसलेले व बाळपणापासून वृद्धापकाळापर्यंत वृद्धिंगत होणारे नि बदलणारेही असतात. शिवाय, मनाच्या निकोप विकासाला आणि नैसर्गिक आवेगाच्या उदात्तिकरणाला त्यांची आवश्यकताही असते.

पुरातन संस्कृती, रुढी, लोकप्रवाद आदीच्या परिणामीं स्त्री–पुरुषसंबंध जिथे बंदिस्त राहिले तिथे स्त्री–पुरुषांमधील स्वाभाविक ओढ कमी झाली आणि जीवनप्रवाह संथ नि शांतपणे पुढे जात राहिला असे घडले नाही. उलट तिथें या संबंधांना रोगट व विकृत स्वरुप प्राप्त झाले असेच आढळते. कामविकाराला वाजवीपेक्षा फाजील महत्व देणाऱ्या फ्रॉइडने देखील स्त्री–पुरुषांमधील मनमोकळ्या परिचयाने रोगट भावना नाहीशा होतात असेच मानलें आहे.

## पतिपत्नीचे नाते

तथापी, पतिपत्नीचे नाते मात्र नैंसिगक आकर्षणाहून काहीतरी अधिक प्रगाढ असे असले पाहिजे. तें नातें स्वाभाविक आकर्षणाची स्थायी परिणती असावी लागते. राष्ट्राच्या भावी नागरिकांना जन्म देऊन तत्कालीन समाजविकासाला पोषक अशा रीतीने त्यांचे पालन पोषण करणारे एक नवे कौटुंबिक आणि सामाजिक नाते म्हणजे पती–पत्नीचे नातें.

सामाजिक दृष्टया जबाबदार असलेले नागरिकच पती व पिता म्हणून आणि पत्नी व माता म्हणून आपलीं कर्तव्यें व जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडू शकतात. समाजविकासाबाबत उदासीन असलेला आत्मकेंद्रित नागरीक कदापी आपली कर्तव्यें पार पाडण्यात यशस्वी होऊ शकणार नाही. कारण, जबाबदारी, संयम आणि कर्तव्यें हे निसर्ग–आवेग नसून तीं सामाजिक मूल्यें आहेत.

समाजाकडूनच व्यक्तीला मूल्यें घ्यावीं लागतात व व्यक्तीने आपल्या जीवनात तीं विकसित करून परत समाजाकडे पोहोचवायची असतात.

व्यक्ती व समाज यांच्या परस्पर देवघेवीच्या प्रक्रियेमध्येच व्यक्तीचे स्वातंत्र्य आणि व्यक्तिमत्वाचा आविष्कार अंतर्भूत असतो.

## धिक जीणे–हुंडा घेणे !

परंतु, समाज अजूनही ‘यस्यास्ति वित्तं स नरः कुलिनः’ म्हणजे पैशालाच देव मानून चालणारा किंवा जुन्या मराठी कवींनी वर्णिल्याप्रमाणे ‘बने धनाने नर तो कुलीन, गुणज्ञ, विद्वान, बहु ज्ञानवान; वक्ताही तो, सुंदर तो, सारे रहाती गुण कांचनात’ अशा प्रकारचा धनवादी समाजच असल्यामुळे वैवाहिक नीतीचे आदर्श पोकळ ठरलेले आहेत. वेश्याव्यवसाय आणि अविवाहित मातांनी टाकलेली अर्भकें हें याचें प्रत्यंतर आहे.

धनिक आणि पांढरपेशा वर्गात राजरोस चालणाऱ्या हुंडा-पद्धतीमुळे तर विवाहाला बाजारी सौद्याचे स्वरूप आले असून जपानसारख्या देशामध्ये काही माता–पिताच आपल्या मुलींना त्यानी आपल्या हुंड्याची व्यवस्था परभारे करावी म्हणून लग्नाच्या आधी काही काळ वेश्या व्यवसायात ढकलतात. (पहा. ‘रसेलनीती’ ले. अनंत काणेकर).

पाश्चात्य युरोप आणि अमेरिकेमध्ये तर सामाजिक नीतीमत्तेच्या ऱ्हासाबरोबर गुन्हेगारीची आत्यंतिक वाढ चालू आहे. अनेक प्रकारचे अराजकी पंथ तिथे कार्यरत असून हिप्पी स्त्री-पुरुष हे त्यांपैकीच आहेत. अमेरिकन शासनसंस्थेला या वाढत्या गुन्हेगारीपासून धोका प्राप्त झाला आहे असा इशारा तेथील राज्यकर्त्यांनाही द्यावा लागला आहे.

## सांस्कृतिक इतिहास

स्त्री-पुरुष संबंधाविषयीचा सांस्कृतिक इतिहास म्हणजे स्त्री ही नरकाची खाण, ‘देवो न जानाति’ असे चंचल स्त्री–चरित्र, ‘स्त्री देहाचा कणनकण हा लिंग विकाराचा जणू खंदकच’ (सेंट ऑगस्टिन) वगैरे पुरुषी वर्चस्वाचा इतिहास होय.

अर्थात, संस्कृतिपूर्व कालातील स्त्री–पुरुषसंबंध आदर्श होते असे प्रस्तुत लेखकाला सुचवायचे नाहीं. कारण पशुवत अवस्थेत विवाहरहित ( Agamy ) अवस्था होती. रानटी अवस्थेत सांघिक विवाह चाले. शेतीच्या शोधानंतर तात्पुरते एकत्र राहणे व नंतर बहुपती–बहुपत्नीत्व, एकपती–एकपत्नित्व व संमिश्र प्रकारहि दिसतात.

परंतु, सुसंस्कृत समाज या सर्व अवस्थांमधून एकपति एकपत्नीत्वाच्या आदर्शाकडे जात आहे यात मात्र शंका नाही. फ्रेडेरिक एंगल्स या समाज–सत्तावादी तत्ववेत्त्याच्या मतानुसार खरी स्वतंत्र झालेली स्त्री मनःपूर्वक एकपतित्वाचे आचरण करणारी स्त्री असणार. (पहा. ‘ Origin of Family and Property ’)

रॉबर्ट ब्रिफॉल्ट या मानववंशशास्त्रज्ञाच्या मते आईबाप व मुले यानी बनलेलें सद्यकालीन कुटुंब प्राचीन काळी अस्तित्वातच नव्हते. स्त्रीप्रधान मानवी टोळी हा अगदी प्राथमिक मानवी संघ होय. हा संघ प्रथम भटक्या व स्वैराचारी होता. परंतु स्त्रीच्या असामान्य अपत्यप्रेमामुळे या स्वैराचाराला आळा बसला. स्त्रीनेच आईबाप व मुले आणि भाऊ, वहीण यांच्या संबंधांना लैंगिक शिस्त लावली आहे.

## पुरुषी वर्चस्वाचे प्रयत्न

तथापि आपले वर्चस्व प्रस्थापित करणाऱ्या पुरुषाने मात्र स्त्रीला विश्वासपात्र मानलें असे क्वचितच दिसते. ‘यत्र नार्यस्तु पूज्यन्ते’ ही स्त्रीची अगदी दिखाऊ व फसवी पूजा आहे. या बाबतीत साऱ्या धर्मसंप्रदायांची कुळी एकच मानली पाहिजे.

बौद्ध-जैनांनी भिक्षुणी आणि साध्वींचे संघ स्थापन केले खरे, परंतु सामाजिक जीवनात स्त्री-स्वातंत्र्य अमलात आणणे त्यांनाही साधलेले नाही. ख्रिस्ती मठांची नि जोगिणीचीही तीच गत. वस्तुतः स्त्रीने वेदाध्ययन करणे हे गोंधळाचे लक्षण मानणारें महाभारत, स्त्रियांना बायबल वाचू देण्यास

नाखूष असणारा मध्ययुगीन पाद्री आणि स्त्रियांना बुरख्याआड लोटणारा मुल्ला हे सारे एकाच माळेचे मणी आहेत.

बंडखोर भागवत धर्माने सुद्धा केवळ पारमार्थिक भावनेची समानता राखून उच्चनीच मानणाऱ्या संस्कृतीला संमतीच दिली होती. तसे पाहिल्यास, लोकशाही आणि समाजवादाच्या उदयाआधी समतानिष्ठ नि व्यापक आकार धारण करणारी संस्कृती कुठेच नव्हती.

## भारतीय संस्कृती

भारतीय संस्कृतीविषयी समतोल बुद्धीने लिहिणाऱ्या विल ड्युरांट या अमेरिकन तत्वज्ञाला सुद्धा भारतीय स्त्रीची अवस्था शोचनीय होती असेच कबुल करावे लागले आहे. तो म्हणतो "इतकी सारी सामुग्री असूनही हिंदुस्थानातील स्त्रीची अवस्था निकृष्ट होती. ब्राह्मण वर्गांचा प्रभाव आणि मुसलमानांचे उदाहरण यानी तिचे वैदिक काळातील उच्चस्थान नाहीसे झाले होते. ('भारतीय संस्कृती' पृ. १०६–१०७)

## मनु आणि रामदास

स्त्री हीच सर्व अप्रतिष्ठेचे, कलहाचे मूळ आहे तिला टाळा व स्वातंत्र्य देऊ नका. पती दुर्गुणाचा पुतळा असला तरी त्याला दुःख होईल असें स्त्रीने कांहीही करतां नये एवढें सांगूनच मनु थांबला नाही तर स्त्री–शूद्र–वैश्य–क्षत्रीय यांची हत्या हें उपपातक म्हणजे क्षुल्लक अपराध असा धार्मिक कायदाही त्याने केला (पहा. 'मनुस्मृति' ११–६७ ) मनूचा हा कायदा रामदासांच्या गुरुबोधाची आठवण करून देतो. 'गुरु तो सकलासी ब्राह्मण, जरी तो झाला क्रियाहीन, तरी तयाशीच शरण अनन्यभावे असावे ॥ (६–५) ब्राह्मण वेद मूर्तिमंत । ब्राह्मण तोची भगवंत, पूर्ण होती मनोरथ विप्रवाक्यें करूनी. ॥

जमिनीची मालकी ब्राह्मणांना व स्त्रियांची मालकी पुरुषांना देऊन टाकणारा मनु आणि ब्राह्मणांना भगवंत मानून त्यांच्याशिवाय कोणतेही

धार्मिक क्रियाकर्म करता नये (कर्म मार्ग ब्राह्मणाविणे होणार नाही) असे सांगणारा रामदास या दोघांच्याही वेळकाळामध्ये शेकडो वर्षांचे अंतर असूनही ते एकाच वृत्तीचे ठेकेदार होते हे लक्षात ठेवण्यासारखे आहे.

## प्रजोत्पादक यंत्र !

भारतीय संस्कृतीमधल्या ब्राह्मणी विचारसरणीने कोटयावधी अंत्यज, हरिजन, गिरीजन यांनाच गुन्हेगार आणि पापयोनी ठरविले असे नव्हे तर वैश्यशूद्रांसकट सर्व स्त्री वर्गाला तुच्छ लेखून भारतीय संस्कृतीचा मुडदाच पाडला आहे. अशा परिस्थितीत स्त्रीपुरुषसंबंध सुधारणे, चातुर्वण्य पुरते मोडणे आणि भारतीय संस्कृतीचा विकास साधणे या हेतूंसाठी स्वामी विवेकानंदांच्या पुढील शब्दांचा गंभीर विचार होणे आवश्यक आहे " त्रैवर्णिकांना वेदाध्ययन अधर्म्य ठरविण्याच्या अध:पतनकालात त्यांच्याबरोबरच साऱ्या नारी जातीचेही अधिकार धर्मगुरुंनी हिरावून घेतले....नाना स्मृतिग्रंथ रचून आणि नाना कठोर नियम बंधनानी जखडून टाकून पुरुषाने स्त्रीला केवळ प्रजोत्पादक यंत्र करुन ठेवले. " (पहा. 'शिक्षण' पृ. ३८)

## लैंगिक उपासमारी

लैंगिक तृप्ती आणि लैंगिक शिस्त ही वैवाहिक नीतीचा पाया आहे. अर्थात, सध्या ज्या पद्धतीने विवाह होतात त्या विवाहांच्या परिणामी लैंगिक तृप्तीची पातळी कुठवर मजल मारते आणि लैंगिक शिस्त किती अस्तित्वात येते याबाबतीत मतभेद असू शकेल. परंतु चालू समाजातील बेकारी, अशाश्वती, घरटंचाई, दरिद्रता आदी गोष्टींमुळे भारतांतील कोटयावधी लोकांची लैंगिक उपासमारी होत रहाते याबाबत दुमत होणे शक्य नाही.

उपासमार व्यक्तीकडून स्त्री-पुरुषसंबंधाबाबत योग्य वर्तनाची अपेक्षा करणे कितपत योग्य आहे ? या विषयातला तज्ञ हॅवलॉक एलिस म्हणतो, " सहजप्रवृत्ती फक्त लैंगिक तृप्तीची संधी निर्माण झाल्यानंतरच जागृत होते व त्यापासून बचणे शक्य आहे. परंतु जी लैंगिकता उपास-

मारीच्या स्वरुपात असते तिला आंतून वेग असतो. बाहेरुन नव्हे." ( पहा. "मनोविज्ञान" पृ. ३३७ )

## एकांगी महिलावाद

आजवर पुरुषांनी स्त्रियांवर जूलूम केला असला व शक्य तितक्या लवकर स्त्रियांनीं आपली स्वतंत्रता व विकास साधला पाहिजे हे खरे असले तरी आता आपण पुरुषांविरुद्ध लढले पाहिजे वगैरे लढाऊ महिलावादी विचार मात्र एकांगी वाटितात.

कारण, वस्तुस्थिती अशी आहे की स्त्री-पुरुषसंबंध हे इतिहासकाळातील समाजरचनेने घडविले असल्यामुळे समाजरचना बदलल्याशिवाय ते बदलणे शक्य नाही. मातृसत्ताक व पितृसत्ताक समाजपद्धती, स्वैर समागम, समुदाय विवाह, युगुल विवाह, बहुपती बहुपत्निक विवाह वगैरे स्त्री-पुरुषसंबंधी परिवर्तनें, समाजाची अर्थोत्पादक साधने व तदनुसारी बदललेल्या समाज-व्यवस्थेप्रमाणे घडत आलेली आहेत.

तेव्हा स्त्रीं-पुरुषांनी एक होऊन समाजाचा एक नंबरचा शत्रू जो सामाजिक मागासलेपणा, जनतेचे दारिद्र्य आणि वर्णवाद-जातीयवाद त्यां-विरुद्ध लढले पाहिजे. आजच्या काळातील अत्यंत महत्वाचा असा हा राष्ट्रीय लोकशाहीचा लढा आहे. हा समाजसत्तावादाचा लढा आहे. अखेर हाच लढा स्त्रियांच्या स्वातंत्र्याचा मार्ग खुला करु शकणार आहे. एकांगी महिला-वादाने काहीही साधणे शक्य नाही.

## शक्तिसंचयाने समाजविकास

व्यक्तीच्या मुख्य भुका योग्य तऱ्हेने तृप्त करुन स्त्री-स्वातंत्र्यावर आधारलेली समाजविकासाची उच्च पातळी गाठणे वेगळें व स्त्री-पुरुष संबंध ही खाण्यापिण्याइतकी नैसर्गिक गोष्ट समजून कामतृप्ती जितक्या सुलभ रितीने होईल तितका समाज अधिक सुखी समजणे आणि स्वैराचार आचरणे वेगळें.

बुद्धिवादी नि पुरोगामी तत्वांवर राष्ट्र-उभारणी करणारी नीती स्त्री-पुरुषसंबधाबाबत सैल असून उपयोगी नाही. लैंगिक शिथिलता समाजाला शीलहीन, अराजकी व दुर्बल बनवते. राष्ट्रामध्ये शक्तिसंचय होण्याऐवजी शक्तिक्षय होतो.

ज्या समाजसत्तावादी राष्ट्रांमध्ये बुद्धिवादी नीतीचा अवलंब करुन समाजविकास साधला जातो त्या राष्ट्रांमध्यें लैंगिक शिथिलतेने समाजविकासाएवजी समाजाचे पतन होते असेच मानण्यात येतें.

# भारत राष्ट्राचे वैरी !

भारतीय समाजामध्यें वर्ग आहेत व त्या त्या वर्गाचे परस्परविरोधी स्वार्थ आहेत ही गोष्ट गांधीजींनी सुद्धा मान्य केली होती. ज्या समाजांत वर्गीय स्वार्थ आपआपल्या वर्गहितासाठीं जपत असतात त्या समाजामध्ये त्या त्या वर्गाचे राजकीय पक्षही असतात व प्रत्येक राजकीय पक्षाकडन आपआपल्या वर्गाला उपकारक असे वातावरण तयार करण्यात येते व त्यानुसार राजकीय घटना घडून येत असतात.

या देशातले सर्वांत मोठे सामर्थ्य म्हणजे कष्टकरी वर्गाचें सामर्थ्य. या वर्गाचे सामर्थ्य त्यांच्या एकजुटीत असतें. आपल्या पिळणुकीला आळा घालण्यासाठी शोषकांविरुद्ध, मालकांविरुद्ध संप, मोर्चे, हरताळ, बंद इत्यादी हत्यारें त्यांना तयार ठेवावीं लागतात. आणि कष्टकरी वर्गांचा जो खरा पक्ष असतो तो या हत्यारांच्या वापराला योग्य असें जनवादी आणि जमीनदार-भांडवलदार विरोधी वातावरण तयार करीत असतो.

कष्टकऱ्यांनी आपआपसांत लढता कामा नये याची खबरदारी कष्टकऱ्यांचा खरा पक्ष नेहमी घेत असतो. याउलट, कष्टकरी वर्गात फूट पाडणे

मालकशाहीच्या हिताचे असतें. म्हणून जातीयवादी वातावरण तयार करण्यासाठीं मालक वर्ग उत्सुक असतो. तो हिंदू कामगाराला मुसलमान कामगारापासून तसेच तामिळ, मल्याळी, कानडी, बिहारी, उत्तर प्रदेशीय, बंगाली आदि कामगाराला मराठी कामगारापासून तोडण्याचा प्रयत्न करतो आणि कष्टकरी वर्गाच्या संप, मोर्चे आदि हत्यारांना जातीय दंगलीच्या प्रतिहत्याराने रोकून धरण्याचें राजकारण खेळतो. त्यासाठीं जातीयवादी, संकुचितवादी राजकारण तो पोसतो.

कष्टकरी वर्गाचा जागतिक नेता लेनिन, कामगार वर्गाची एकजूट आणि ट्रेड युनियन चळवळ ही क्रांतीची शाळा आहे असें शिकवतो, तर अत्यंत प्रतिगामी वर्गाचा गुरु हिटलर, कष्टकरी कामकरी वर्गाची फूट आणि जातीय दंगली या प्रतिक्रांतिकारक उठावाची पूर्व तयारी आहे असें शिकवतो.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक डॉ. हेडगेवार यांनी जर्मन भांडवलदार वर्गाचा वैचारिक पुढारी नित्शे आणि राजकीय पुढारी हिटलर यांच्या शिकवणुकीचा उदोउदो केला तो सुद्धा या देशांतील प्रतिगामित्व आणि भांडवलशाही मजबूत करण्यासाठींच. देशाबाहेरील भांडवलदारी तंत्रमंत्रांची पूजा हे 'राष्ट्रीय' म्हणवणाऱ्या समाजक्रांतिविरोधी पक्षाचें खास वैशिष्टच आहे.

या देशांतील इरसाल प्रतिगाम्यांना, भारतीय जनतेला ललामभूत ठरलेले भारतीय रक्ताचे नि भारतीय संस्कृतीचे महात्मा गांधी नकोत; भारतीय लोकशाहीचे शिल्पकार पंडित जवाहरलाल नेहरू नकोत; त्यांना आज पाहिजे कोण ठाऊक आहे ? जगाला दुसऱ्या महायुद्धाच्या खाईंत लोटून कोटचवधी लोकांचा बळी घेणारा, भारतीयांना झाडू मारण्याच्या लायकीचे मानणारा शुद्ध जर्मन वंशवादी हेर हिटलर ! कारण, तो भांडवलशाहीचा कट्टर पुरस्कर्ता असून समाजवादाचा उभा डावेदार होता म्हणून. आणि हें सारे कधी शिवरायांच्या नावाने तर कधी स्वामी विवेकानंदांच्या जयघोषाने चालत असतें.

शिवरायांना मुसलमानांच्या भारतीयकरणाची अजब कल्पना शिवली-ही नव्हती. त्यांचें जर तसें राजकारण असतें तर महाराष्ट्रांत एवढे मुसलमान आज दिसले नसते. तसेंच, गोब्राह्मण प्रतिपालन ब्राह्मणांना कितीही हवेसें वाटलें तरी वस्तुतः शिवाजीचें राजकारण गोब्राह्मणी नव्हतें. तीच गोष्ट स्वामी विवेकानंदांच्या शिकवणुकीची.

स्वामी विवेकानंदांनी हिंदूमुस्लीम एकता ही भारताची पायाभूत गरज असल्याचे प्रतिपादन केलें. एवढेंच नव्हे, तर भारताचा देह इस्लामी असून भारताचा आत्मा हिंदू आहे असे हिंदु मुस्लीम एकतेचें एकरस वर्णन त्यांनीं केलें आहे. नेताजी सुभाषचंद्र बोस यांनीही हिंदु-मुस्लीम ऐक्याचाच पुरस्कार केला ही सत्य वस्तुस्थिती आहे. जातीयवादी विचारांची कीड आमच्या महान् राष्ट्रभक्तांच्या हृदयाला कधींच लागली नाहीं. कारण अस्सल भारतीय संस्कृतीनेच त्यांचीं हृदयें व्यापलेलीं होती.

जातीयवादाचा पुरस्कार करणाऱ्यांना खऱ्या भारतीय संस्कृतीचे सोयरसुतक जसें नाहीं, तसेंच भारतीय समाजाबद्दलही त्यांना बिलकूल प्रेम नाहीं; भारतीय स्वातंत्र्याविषयी ही नव्हते. खुद्द स्वातंत्र्यवीर सावरकरांचे विचार सुद्धा या हिटलरवादी कंपूच्या विचारांपेक्षां कितीतरी अधिक पुरोगामी आहेत.

आजच्या जातीयवाद्यांना आणि संकुचितवाद्यांना प्रेम आहे तें फक्त प्रतिगामित्वाचे. पण प्रतिगामित्व म्हणजे काय तें प्रथम पाहू या. प्रतिगामित्व म्हणजे ब्रिटिशकालापूर्वी जे उच्चाधिकार आपल्या जातीला आपल्या वर्गाला होते ते परत मिळवण्याचे राजकारण होय. हें प्रतिगामी राजकारण, सर्व भांडवलदारांना सुद्धा रुचतें असे नव्हे. कारण भांडवरदार वर्ग देखील आधुनिक कालांत बनलेला व आधुनिक कालांत वावरणारा वर्ग आहे. शिवाय, जातीयवादी वातावरण भांडवलदारीच्या उत्कर्षालादेखील विशेष पोषक नसते. परंतु कष्टकरी वर्गाची वाढती शक्ति आणि समाजवादी राजकारणाच्या वाढत्या जागतिक प्रभावामुळें भीतीचा गोळा भांडवलदारांच्या पोटांत हल्ली उभा राहतो आणि जातीयवादी पक्षांना ते हाताशी धरतात.

परंतु, राष्ट्रीय वृत्तीचा भांडवलदार सुद्धा असूं शकतो. इतकेच नव्हे तर तो अमेरिकन साम्राज्यवाद्यांच्या विस्तारवादी धोरणाला आणि राष्ट्रांतर्गत जातीयवादाला विरोधही करूं शकतो. भांडवलदार वर्गामध्यें सगळ्या जातींचे व धर्मांचे लोक असल्यामुळे एकूण भांडवलदार वर्ग जातीयवादी राजकारणाच्या खातेऱ्यांत पडेलच असें नाही. व हीच तर या देशांतील हिटलरी राजकारणाला मोठी चिंतेची बाब वाटते !

अर्थात, ही गोष्ट कष्टकरी वर्गांच्या आणि त्यांच्या पक्षांच्या कृतीवरही बरीच अवलंबून असते. निरर्थक हिंसेचा वापर करणाऱ्या पक्षांचे प्राबल्य वाढल्यास भांडवलदार वर्ग सर्वच्या सर्व जातीयवादी पक्षांच्या जाळ्यांत अडकणें शक्य आहे. परंतु, खऱ्या पुरोगामी पक्षाच्या राजकारणाने ही गोष्ट टाळली पाहिजे आणि राष्ट्रीय लोकशाहीचे आणि संयुक्त आघाडीचे राजकारण अंमलात आणून सर्व देशप्रेमी, जनवादी आणि डाव्या शक्तींची एकजूट उभारली पाहिजे. केरळमध्यें आज हें घडत आहे. तेथे जातीयवादाला मुळीच थारा नाहीं. एका बाजूला अतिरेकी आणि बालिश डाव्या शक्तींना शह देण्याचे काम, तर दुसऱ्या बाजूला जातीयवाद्यांना तीव्र विरोध करून प्रतिगाम्यांच्या हुकूमशाहीला दूर ठेवण्याचेंही काम तेथें चालू आहे.

परंतु, अतिरेकी डावे आणि जातीयवादी उजवे यांमध्यें मूलभूत फरक आहे तो मात्र जाणला पाहिजे. या देशांतील अतिरेकी डावे, हे मार्ग चुकलेले क्रांतिकारक आहेत. जनतेवरील प्रेमामुळेंच ते निरर्थक हिंसेच्या भजनी लागलेले आहेत. त्यांचे राजकारण घातकी आहे यांत संशयच नाहीं. तथापि, दहशतवादी क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके यांना लोकमान्यांनी वाट चुकलेला देशभक्त म्हटले होते हें विसरता कामा नये. देशभक्त भगतसिंग आणि इतर दहशतवादी देशभक्तांना देखील महात्मा गांधीजी असेंच संबोधित असत. नेताजी सुभाषचंद्र बोस, देशाच्या मुक्तीसाठी जेव्हां जपानी फॅसिस्टाबरोबर संगनमत करूं लागले तेव्हां जवाहरलाल नेहरूंनी त्यांना सुद्धा वाट चुकलेले देशभक्त असेच म्हटले होते.

पण जातीयवादी या कोटींतले नव्हेत. ते हजारों वर्षें या देशांतील जनतेला छळणाऱ्या शक्तींचे प्रतिनिधी आहेत. जातीयवादाचा पुरस्कार करणाऱ्यांमध्यें राजे लोक, देशातील शेती–सुधारणा व इतर सुधारणामुळे दुखावलेले वरच्या जातींचे लोक, श्रमजीवींना प्राप्त झालेल्या हक्कांविरुद्ध एक होऊन जातीयवाद वाढवीत असतात. त्यांच्या राजकारणाचा रोख सध्याची लोकशाही पाडून जनतेला खाली ओढण्याचा व वरच्या वर्गांना पुराण्या भारतात होत होतें त्याप्रमाणें वर खेंचण्याचा आहे.

जातीयवादी राजकारण आणि दंगली हें त्यांचें हत्यार आहे. हें हत्यार लोकशाही विरोधी आहे. समाजवादविरोधी आहे. समाजक्रांतीविरोधी आहे. तसेच, जातीयवाद्यांचा हिटलरी मार्ग सर्वनाशाकडे नेणारा, तर लोक-शाही व समाजवादाचा मार्ग हा नव्या जगाच्या निर्मितीकडे नेणारा मार्ग आहे. जातीयवादाचे विष अंगांत न भिनलेल्या बहुजनसमाजाने हें ध्यानांत ठेवणे आजच्या घडीला अत्यावश्यक आहे.

जगांतील कोणतेंही आधुनिक राष्ट्र घ्या. त्या राष्ट्रामध्यें अनेक लहानथोर धर्मपंथ असतात. परंतु, त्यांपैकी कुठलाही धर्मपंथ दुसऱ्याचे इंग्लडीकरण किंवा अमेरिकीकरण किंवा फ्रेंचीकरण झाले पाहिजे असें म्हणत नाही. एका धर्मपंथातील लोक तो अधिकार स्वतःकडे मुळींच घेणार नाहीत. कारण, आधुनिक राष्ट्र हें कुठल्याही एका धर्मपंथाचें राष्ट्र असत नाही. तसें होणें, म्हणजे इतर धर्मपंथीयांना नष्ट तरी व्हावें लागेल, किंवा त्यांच्या नशिबीं दुय्यम नागरिकत्व तरी मारलें जाईल. आधुनिक जगांत ही गोष्ट सुतराम अशक्य व निंद्य आहे.

त्याचप्रमाणे, जगांत एकाच धर्मपंथाची अनेक राष्ट्रें आहेत. पण त्या सर्वांचें एक धर्मपंथीय राष्ट्र बनवा असेंही कुणीच म्हणत नाहीं. कारण आधुनिक कालामध्यें धर्मपंथीय भावनांवर राष्ट्रें उभारलीं जात नाहीत. धर्मपंथीय भावनांपेक्षा श्रेष्ठ भावना जी राष्ट्रीयत्वाची भावना त्या भावने–वर आधुनिक राष्ट्रें उभी आहेत. ज्यांच्यामध्यें राष्ट्रीयत्वाच्या भावनेचा

वेगच मुळांत कमी त्याच लोकांना आपली जात, आपला धर्म वगैरे गोष्टींवर राज्याची उभारणी व्हावीशी वाटत असते हें या बाबतीतलें मर्म आहे.

चालू घटनांतून बोध घेण्यासारखी गोष्ट ही आहे कीं, स्वतःला 'राष्ट्रीय' 'राष्ट्रीय' म्हणवून घेऊन कितीही ऊर बडवले तरी जातीयवादी लोक हे खरे राष्ट्रवादी असूंच शकत नाहीत.

भारतराष्ट्राची शपथ घेतलेल्या भारतीयांनी भारतराष्ट्रामध्यें हिंदुराष्ट्र, ख्रिस्तीराष्ट्र, इस्लामीराष्ट्र, बौद्धराष्ट्र, पारशीराष्ट्र, शिखराष्ट्र आदि संकुचित कल्पनांना आपल्या मनात मुळींच थारा देता नये. ह्या कल्पनांचा प्रचार करणारे लोक हेच भारतराष्ट्राचे वैरी आहेत.

●●●

# कशासाठी ?

# धार्मिक खुळेपणा कशासाठीं ?

आज पृथ्वीच्या पाठीवर हिंदू आहेत. बौद्ध आहेत. ख्रिस्ती आहेत. मुसलमान आहेत. इतर आहेत. त्याचबरोबर भारतामध्यें शीख, जैन, पारशी, नवबौद्ध व इतर धर्मीय आणि इतर पंथीय आहेत.

आतां आमच्यासमोर निर्वाणीचा सवाल आ वासून उभा आहे. अखेर आम्ही कोण होणार ? खुळे हिंदू, की शहाणे हिंदू ? खुळे बौद्ध, कीं शहाणे बौद्ध ? खुळे मुसलमान, कीं शहाणे मुसलमान ? खुळे ख्रिस्ती, खुळे शिख, खुळे जैन, खुळे पारशी की शहाणे ख्रिस्ती, शहाणे शिख, शहाणे जैन, शहाणे पारशी ?

ख्रिस्ती जेव्हां पोपच्या सार्वभौम धार्मिक आणि राजकीय सत्तेखाली होते तेव्हां ते मुसलमानांचा नायनाट करण्याकरितां कट्टर धर्मयुद्धें लढले.

जो ख्रिस्ती राजा, पोपचा बडेजाव नि चैन राखायला पुरेसा पैसा

देई त्या बाजूला पोपचा न्याय झुके. या काळांत ख्रिस्त्यांमधील परस्पर वैराला आणि मारकुटीला तर सुमारच राहिला नव्हता.

अखेर ख्रिस्त्यांनी धर्मवेड टाकून देवून पोपची राजकीय सत्ताही झुगारली व भाषा, प्रदेश आणि राष्ट्रीयत्वावर आधारलेली आधुनिक राज्यें स्थापून काळानुरूप ख्रिस्त्यांचे हितही साधलें.

ख्रिस्ती बहुजनसमाज त्यावेळीं जागृत होऊन व एकजुटीने अमीर उमरावांचा आणि नंतर भांडवलदारांचा जर योग्य बंदोबस्त करता तर पुढें घडलेलीं साम्राज्यवादी युद्धें तो रोखू शकला असता व युरोपांतील जनतेचे अपरंपार हित साधलें असते. आणि नंतर हिटलर-मुसोलिनी सारखे जे नरसंहारक निर्माण झाले ते दिसलेच नसते.

असे घडते तर ख्रिस्ती लोक जगांत खरेच शहाणे ठरते. तथापि, तसें घडलें नसतांही ख्रिस्ती लोक जे पुढें आले, ते बायबलचे जुनाट विचार सोडून विज्ञानाची उपासना त्यानी आंरभली म्हणून.

बायबलच्या खुळचा विचारसरणीविरुद्ध कोपर्निकस, ब्रुनो, गॅलिलियो आदि ज्या महान पुरोगामी विचारवंतांनी प्राणांतिक विचारसंघर्ष छेडला त्यामुळेंच युरोप पुढें गेला. त्यासाठी असंख्य बुद्धिवाद्यांना अनन्वित छळाला बळी पडावें लागलें. सांराश, पुरोगामी किंवा शहाण्या ख्रिस्त्यांमुळेंच त्यांच्या हातांमध्यें जागतिक प्रगतीची धुरा आज अनेक शतकें राहिली आहे.

परंतु, मुस्लिम लोकांनी धर्मवेड सोडायला बरेच आढेवेढे घेतले. त्यामुळें ते दीर्घकाळ मागासलेलें राहिले आहेत. अरब राष्ट्रांकडे पहा. अगदी इवलेसें इसरायल त्याना भारी होऊन बसलें आहे.

इसरायल साम्राज्यवाद्यांचे हस्तक बनून, अरब राष्ट्रांच्या पाठींत खंजीर खुपसण्याचेंच काम करीत असले तरी बहुतेक यहुद्यांमध्यें त्यांच्या युरोपमधील दीर्घ वास्तव्यामुळें विज्ञानाची व प्रगतीची जी उपासना आहे ती अरबांजवळ अजूनही पुरेशा प्रमाणात दिसत नाही.

अरबांच्या मागासलेपणाचा फायदा युरोपीय साम्राज्यवाद्यांनी पुरे-पूर घेतला असून शतकानुशतके त्यांनी अरबांना लुटलें. आणि अजूनही लुबाडतां यावें म्हणूनच ते इसरायलचा हस्तक म्हणून वापर करताहेत.

तेल हें अरबी देशांच्या धमन्यांतून वाहणारें जणूं त्यांचें रक्तच. तेंच त्यांचे रक्त दोन चार शेखसाहेबांच्या हातावर मूठभर सोनेचांदी टाकून साम्राज्यवादी लुटताहेत.

परंतु, उशीरा का होईना गेल्या पांचपंचवीस वर्षांत सीरिया, इजिप्त, अल्जेरिया येमेन, लिबीया आणि सुदान सारखीं अरब राष्ट्रे धार्मिक खुळेपणा टाकून पुरोगामी बनत आहेत. कायरोमधील आमच्या वास्तव्यांत ही गोष्ट आम्हाला स्पष्ट दिसली. तिथल्या विश्वविद्यालयांतून, तंत्र-विद्येच्या शाळांतून आधुनिक विचारसरणीचा अभ्यास होत असलेला आम्हाला आढळला.

वर्तमान मुस्लिम जगत बदलत आहे. कुराणात नसलेल्या अनेक गोष्टी सध्याचें समाजजीवन त्यांना नव्याने शिकवीत आहे. नवीन शिकल्या-विना आणि बदलल्याविना नवयुगांत तरणोपायच नाही. चालू विज्ञानवादी युगांत नवीन शिकणार नाहीत ते मागास ठरुन नष्ट होणार.

जगातील मुसलमानांना आतां मागासलेले राहून परवडत नाही. चीन, रशिया, अल्बानिया आणि अनेक समाजसत्तावादी देशांतील मुसलमान आज पूर्वीइतका धर्मवेडा राहिलेला नाही, कुराण मागे टाकून तो खचितच पुढे पोहोंचला आहे.

तसेंच, चीन आणि सिलोन सारख्या राष्ट्रांतील बौद्धही पूर्वीचा धार्मिक खुळेपणा टाकून नवीन युगधर्माप्रमाणे वागत आहेत. आपआपल्या राष्ट्रांतून नवीन प्रकारची समाजरचना उभारण्याचा प्रयत्न त्यानी चाल-वला आहे. सिलोनी बौद्धांनी व तिथल्या इतर धर्मीयांनी आपल्या राष्ट्रीय हितासाठीं डावी राजकीय एकजूट उभारली आहे. बौद्ध लोक आतां पूर्वी-प्रमाणे धर्मखुळे राहून साम्राज्यवादी शक्तींना आपल्या राष्ट्राचे तुकडे पाडूं देण्यास तयार नाहीत.

साम्राज्यवाद्यांनी चीनसारख्या एका महाकाय देशाचे किती तुकडे पाडावेत ? इंग्रज, फ्रेंच, जर्मन, अमेरिका, झारचा रशिया, जपान आदि सर्व साम्राज्यवाद्यांनी चीनवर मांड ठोकून त्याला निमवसाहत बनवलें होतें. त्या देशांतल्या बौद्ध धर्मीय जात्यंधतेने चीनी लोकांना मुळीच त्राण दिलें नाही. धर्मवेड मग तें कोणत्याही धर्माचे वा प्रकारचें असो. तें प्रतिगाम्यांच्या बाजूनेच कार्यरत असतें. त्यामुळें कष्टकरी जनतेचे पंच प्राण शोषून घेण्याचेंच काम चालू राहतें.

धर्म म्हटला कीं कर्म उभें राहतें. कर्मांबरोबर कर्मकांड येतें व कर्मकांडाचे ठेकेदार पुरोहित, पंडे, पंडित, पाद्री, मुल्ला, मौलवी बहुजन समाजाला शोषून घेतात. देवाधर्माच्या नांवावर हें सारे चालतें व खपतें. धर्मखुळाने नाश होतो व राज्यें बुडतात तीं अशीं.

जपानमध्यें राजेशाहीच्या व भांडवलशाहीच्या जवळ असलेले बौद्ध व इतर पंथीय लोक आपला स्वार्थ टिकवण्यासाठी अजूनही अमेरिकेचे मांडलिक बनून राहिलेले आहेत. तर कष्टाळू जपानी कामगार दयनीय अवस्थेंत कसाबसा आपला प्रपंच सांभाळतो आहे.

माओच्या नेतृत्वांतील अतिराष्ट्रवाद किंवा 'अति महान चीनवाद' या दोषामुळे चीनी जनतेचें अपरिमित नुकसान होत असलें तरी सुद्धा चीनमध्यें जातीयवादाला बिलकूल थारा नसल्यामुळें चीन प्रबळ राष्ट्र बनलें आहे.

आता आम्ही आमचें पाहू या. ब्रिटिशांनी आपला प्राचीन देश व्यापला आणि सुधारणेच्या एका नव्या टप्प्यांत आम्ही प्रवेश केला खरा. पण साम्राज्यवादी शोषण करून त्यांनी आमचा देश दारिद्री ठेवला. इतकेच नव्हे तर आपली सल्तनत कायम करण्यासाठी त्यांनी आमच्यामध्यें जातीय भांडणे लावून दिलीं.

हिंदू-मुस्लिम या प्रमुख जमातींना त्यानी एकमेकांवर घातलें. ही गोष्ट लो. टिळकांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी हिंदू-मुस्लिम भेद

स्वातंत्र्याआड येत असेल तर मुसलमान बंधूंच्या हातांत हा देश सोपवून तुम्ही चालते व्हा. आमचे आम्ही पाहून घेंऊ असें ब्रिटिशांना बजावलें. नामदार गोखले यांनीही हिंदू–मुस्लिम ऐक्यावर भर देऊनच राजकारण चालवलें.

नेताजीनी तर हिंदुत्ववादाचे आणि मुस्लिम जातीयवादाचे भांडवल करणाऱ्यांना दोषच दिला. साम्राज्यवादाशीं दोन हात करण्याची ज्यांना हिंमत नाही त्या लोकांचें सुखरूपपणे राजकारण करण्याचें व्यासपीठ म्हणजे हिंदुत्ववाद अशी त्यांनी हिंदुत्ववादाची चिकित्सा केली.

मुस्लिम जातीयवाद्यांनी मुस्लिम धर्मखुळाच्या पायावर पाकिस्तानची निर्मिती आरंभली. पण पाकिस्तानच्या बहुजनसमाजावर त्यांच्या धर्मखुळाचा परिणाम काय झाला याचा विचार हिंदु जातीयवादी कधीच करीत नाहीत.

श्रीमंत हिंदु व्यापारी भारतात येऊ शकले पण बहुजनसमाजांतील हिंदु-मुस्लिम जनतेला जमीनदार भांडवलदारांच्या शोषणाला बळी पडावें लागलें. मुल्ला-मौलवींच्या ऐषो आरामासाठीं बहुजन समाजाला दिनरात राबावें लागलें याची खंत हिंदु जातीयवाद्यांना नाही.

धर्म-खुळामुळेंच पाकिस्तानी राष्ट्र बुडालें हें स्पष्ट नाहीं काय ? शिवाय धर्मखुळामुळें बुडालेलें पाकिस्तान हें पहिलें राज्य आहे काय ? प्राचीन भारतामध्येही धर्मखुळामुळें का कमी राज्यें बुडालीं ? धर्मखुळामुळें जगात किती राज्यें बुडालीं त्याची खानेसुमारी धर्मखुळयांना कदाचित ठाऊकही नसेल. पण ती प्रचंड आहे. त्याचप्रमाणे जेवढीं देवळें हिंदूंची हिंदूंनी मोडली, जेवढया मशिदी मुसलमानांच्या मुसलमानांनीं पाडल्या, जेवढीं प्रार्थनामंदिरे ख्रिस्त्यांचीं ख्रिस्त्यांनी जमीनदोस्त केलीं, तेवढीं देवळें, तेवढया मशिदी, तेवढी प्रार्थनामंदिरें एका धर्मातील लोकांनी दुसऱ्या धर्मातील लोकांची मोडलीं, पाडलीं, तोडलीं नसतील.

नव्या जगाच्या निर्मितीला साधक, अगदी आमच्या घराजवळ आणि तीही आपल्या साह्याने निर्माण झालेली घटना म्हणजे 'बांगला

देशाचा' उदय. ह्या नवनिर्मितीकडे उघडचा डोळयांनी आणि स्वच्छ अंतःकरणाने पाहिल्यास नव्या जगाच्या भावना कोणत्या ते स्पष्ट होर्ते.

हिंदु-मुसलमानांचें रक्तच वेगळे आहे. ते एकत्र येऊच शकत नाही असे कोण सांगतात ? हिंदुंमधले व मुसलमानांमधले प्रतिगामी पुढारी. वास्तविक, मुसलमानांचे व आमचे रक्त एकच आहे. कारण, या देशांतले हिंदुच मुसलमान झालेले आहेत. परंतु, जनतेच्या धर्मखुळाचा पुरेपूर फायदा घेऊन ब्रिटीश कालापूर्वी जसा आपला स्वार्थ निरंकुश चाले आणि बहुजन समाजावर आपली मक्तेदारी चाले तसेच यावच्चंद्रदिवाकरौ आपलें चालावें असे वाटणारी प्रतिगामी मंडळीच जातीयवादी राजकारणाच्या रुपाने लोकांमध्ये धर्मखुळ पसरवित असते.

जगांतील व भारतांतील गतयुगाचा अभ्यास केल्यास समतेचे, धर्मसहिष्णुतेचें, विज्ञानाचें, जें युग दृष्टिक्षेपात आले आहे त्या युगांत शांती समाधानाने जगण्यास आणि इतरांना जगू देण्यास कोण लायक असतील तर ती सर्वसाधारण हिंदु जनताच. परंतु, हिंदु जनतेचा हा अुदारपणा हिंदुंपैकी वर्ग स्वार्थाने अंध झालेले जे वरिष्ट आहेत त्यांना खपत नाहीं. म्हणून हिंदु जनतेला धर्मखुळामध्ये बुडवण्याची शिकस्त त्यांच्याकडून होत आहे.

या लोकांनी आपल्या स्वार्थासाठी एक बनावटी तत्व उचलून धरले आहे. तें तत्व म्हणजे, पाकिस्तान हे जसे मुस्लिम धर्मवेडावर आधारलेले राष्ट्र आहे तसेच भारताला हिंदु धर्मवेडावर आधारलेले राष्ट्र बनवणे. म्हणजे, पाकिस्तान जसें अमीर-उमराव, जमीनदार, भांडवलदार, मुल्ला-मौलवी आणि बुरसटलेल्या मियांखानांचे राज्य आहे तसेंच इथल्या भटाबामणांचें, जमीनदारांचें, भांडवलदारांचें, लष्करांतल्या सिंगाबिंगाचे राज्य भारत व्हावे ही त्यांची खटपट.

त्यांची ही सारी खटपट आपल्या देशांतील राष्टीय एकात्मता, धर्मनिरपेक्षता समाजवाद आणि लोकशाही धुळीला मिळवणारी आहे. परंतु, मूठभर वर्गाच्या भल्यासाठी ही सारी खटपट करणारे लोक खुळे आहेत असें म्हणणे मात्र बरोबर होणार नाही.

कारण, त्यांची करामत आहे बहुजन समाजाला खुळा बनवण्याची व बहुजनसमाज जातीयवाद्यांच्या नादाला लागेल तर तो निश्चितच खुळा बनेल. मुस्लीम जातीयवाद्यांच्या नादाला लागून पाकिस्तानी जनतेला काय मिळाले? सर्वनाश!

धर्मवेडाने मुठभर लोकांचा स्वार्थ साधतो व ते मूठभर लोक शहाणे ठरतात आणि बहुजनसमाज मात्र खुळा ठरतो, हा समाजविकासाचा प्रमुख जागतिक नियम आहे! त्या नियमाला गतेतिहाची आणि आधुनिक इतिहासाची पण साक्ष आहे.

सर्वसामान्य जनतेला कष्टाची भाकरी, प्रेम आणि शांती हवी असेल तर हिंदू पैकी शहाणे हिंदु, ख्रिस्त्यांपैकी शहाणे ख्रिस्ती, बौद्धांपैकी शहाणे बौद्ध, आणि मुस्लीमांपैकी शहाणे मुस्लीम ह्यांनी एकत्रपणे, एकदिलाने जगातील प्रापंचिकांच्या बरकतीचा विषयच प्रमुख विषय मानला पाहिजे. असे मानणारे तेच खरे शहाणे. त्यांना शास्त्रीय परिभाषेत पुरोगामी दृष्टीचे म्हणतात व जातीयवाद्यांना प्रतिगामी म्हणतात.

छत्रपती शिवाजी, विवेकानंद, लो. टिळक, महात्मा फुले, आगरकर, राममोहन रॉय, नेताजी, टागोर, डॉ. आंबेडकर, नेहरु, इंदिरा गांधी, कॉ. डांगे आदि श्रेष्ठ हिंदू हे शहाणे व पुरोगामी हिंदू होत.

जातीयवादी हिंदू केवळ या देशाचेच शत्रू आहेत असें नव्हे तर ते हिंदू जमातीचे सुद्धा शत्रू आहेत. भारतीय संस्कृतीचा आत्मा छिन्न भिन्न करणारे, तिला विकृत, बिभत्स स्वरुप देणारे, ती नासवणारे ते लोक आहेत. या देशातील धर्मामध्यें, संस्कृतीमध्यें, राष्ट्राच्या दैदिप्यमान समाजवादी उभारणीमध्यें, त्यांना काडीचेहि स्थान नाही.

प्रस्तुत युग शहाण्या जनतेचे आहे. शहाणी जनता आज गुण्यागोविंदाने प्रपंच करुन विज्ञान व समाजवादाच्या सहाय्याने धीरे धीरे समृद्धीकडे जाऊं शकते.

वसंती ग्रंथ संग्रहालय, ठाणे. ... ५८२५८ निबंध २९८९ १२।८।७८

ख्रिस्ती, बौद्ध आणि मुसलमानसुद्धा अनेक देशांतून कसे बदलत आहेत, काळाला कसे सामोरे जात आहेत, धर्मनिरपेक्षतेकडे आणि, समाजवादाकडे कसे खेचले जात आहेत तें आपण वर पाहिले आहे. मग काय पूर्व पाकिस्तानी मुसलमान तेवढे सदैव तसेच रहाणार ? जर का तें तसेच राहिले तर ते काळाच्या भक्ष्यस्थानी पडून खतम होतील.

तेव्हां, पूर्व पाकिस्तानातील मुसलमानांना बदलावेच लागेल आणि हिंदुनी मात्र आज हजारो वर्षे जे गुण त्यांच्यामध्ये आहेत म्हणून अभिमान बाळगावा ते उदार मनाचे गुण सोडून देऊन धर्मांध, धर्मपिसाट बनावे हें योग्य होईल काय ?

काळाच्या मागें जाऊन हिंदू काय साधणार आहेत ? काळ हिंदूना हिंदू आहेत म्हणून क्षमा करील काय ? नाही. फक्त खुळे लोक आणि आम्हाला खुळे करण्यात जे राजकीय आणि आर्थिक वर्गस्वार्थ साधूं पाहातात ते जातीयवादी पक्षांचे पुढारी ( ते स्वतः मात्र मुळीच खुळे नसतात) हेच काय ते भारतामध्ये काळाला मागें खेंचू पहात आहेत.

मुसलमानांना ठोकून काढून किंवा त्यांना हिंदुंचें चेले बनवून हिंदूंच्या आणि मुस्लिम जनतेच्या प्रपंचाचें प्रश्न कसे हलके होतात तें धर्म-खुळावर आधारलेल्या जातीयवादाला सांगता येईल काय ? मुसलमानांना आणि ख्रिस्त्यांना व इतर सर्व अल्पमतवाल्यांना बिलकूल नामोहरम किंवा सुतासारखे सरळ करून आमच्या देशाचें उत्पादन वाढणार आहे काय ? तसेंच देशांतील उत्पादनाच्या वांटपांत किंचित तरी समानता त्यामुळे येणार आहे काय ? देशाच्या कारभारात त्यामुळें सुसूत्रता किंवा चोखपणा येण्याचा संभव आहे काय ? त्यामुळें कोटयवधी बेकारांची संख्या कमी होणार आहे काय ? आपल्या देशाचे संरक्षण भक्कम होणार आहे काय ? मुतराम नाही. सुतराम नाहीं. तर मग धार्मिक खुळेपणा हो कशासाठी ?

१९८८५

REFBK-0018445
REFBK-0018445

# मी समाजवादी !

लेखक : **स्वामी विवेकानंद**
विवेचन : **नारायण देसाई**
दुसरी आवृत्ती छापत आहे.
मूल्य : **एक रुपया**

★

"स्वामीजींच्या विचारसंपदेतील तेजस्वी अनमोल रत्न जिज्ञासू वाचकांना उपलब्ध करून दिल्याबद्दल श्री. नारायण देसाई यांचे अभिनंदन."

**—श्रीकांत लाड**
संपादक 'युगांतर' मुंबई–४

★

"श्री. नारायण देसाई यांचा 'शास्त्रीय तत्वज्ञान' हा अपूर्व असा ग्रंथ आहे. त्यांचें 'मी समाजवादी' हे पुस्तकही आकाराने लहान असले तरी आशयाने मोठे आहे. श्री. नारायण देसाई यांच्या बुद्धिमत्तेची, भारतीय अध्यात्मासंबंधीच्या त्यांच्या ज्ञानाची आणि या अध्यात्माची साम्यवादानुसार चिकित्सा करण्याच्या त्यांच्या समृद्धतेची साक्ष या त्यांच्या छोटयाशा पुस्तकांत दिसून येते."

**—प्रा. वि. स. जोग**
'दैनिक महाराष्ट्र' नागपूर
५ ऑगस्ट १९७१

---

**अभिनव प्रकाशन**
गुरु नानक मार्केट, मुंबई–१४